जुलै २०१९/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य

## अधिकतेकडून उत्तमतेकडे...



सत्यमेव जयते

1 NATION TAX MARKET
GST



श्री. नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री



श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री

# वस्तू व सेवा कराच्या प्रभावी अमंलबजावणीमध्ये सहभागी करदाते आणि नागरिक यांचे हार्दिक आभार !

## "सक्षम - सुलभ - लोकाभिमुख कर प्रशासनाचे द्वितीय वर्ष"

## जीएसटीचा द्वितीय वर्धापन दिन

### १ जुलै, २०१९

### लोकाभिमुखता

- १७२ वस्तूंवरील कराचा दर २८ टक्के वरुन १८ टक्के किंवा त्यापेक्षा ही कमी करण्यात आला.
- जास्तीत जास्त वस्तू या १८ टक्के किंवा त्या खालील कर दरात समाविष्ट
- सामान्य वापराच्या वस्तूंवर ० टक्के ते ५ टक्के कर
- परवडणाऱ्या घरांसाठी कमीतकमी कर

### अर्थव्यवस्थेस फायदा

- प्रामाणिक निर्यातदारांसाठी त्वरीत परताव्याची हमी
- वर्ष २०१८-१९ मध्ये २८,३८९ प्रकरणामध्ये ६००९ कोटी इतका परतावा मंजूर करण्यात आला
- महाराष्ट्र राज्याचे कर संकलन १.७० लाख कोटींवर
- महाराष्ट्राच्या कर महसूलामध्ये १३ टक्के इतकी वाढ
- मेक इन इंडिया साठी प्रेरणादायी

### सुलभ कर रचना

- एक राष्ट्र, एक कर, एक बाजारपेठ
- वस्तू व सेवा यांच्या वर्गीकरणासाठी एकसमान पध्दती
- देशभरातील उत्पादकांसाठी एकत्रित बाजारपेठ
- विवरण पत्र सादर करण्यासाठी नवीन सुलभ पद्धती
- एकसमान कायदा व कार्यपध्दती
- सुलभ आंतरराज्यीय व्यापार
- ई-वे बीलाद्वारे एक राष्ट्र एक दस्तऐवज

वस्तू व सेवा कर विभाग, महाराष्ट्र शासन
www.mahagst.gov.in

केंद्रीय अप्रत्यक्ष कर व सीमाशुल्क मंडळ
www.cbic.gov.in/www.cbic-gst.gov.in

वस्तू व सेवा कर, सरळ व सुलभ कर

# अंतरंग



**संकल्प आणि सिद्धी ६**

राष्ट्रीय वननीतीनुसार एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के वन आवश्यक आहे. सध्या महाराष्ट्रात ही टक्केवारी २० आहे. ती ३३ टक्क्यांपर्यंत वाढवायची असेल तर आपल्याला ४०० कोटी वृक्ष लावण्याची आणि ती जगवण्याची गरज आहे. यासाठी हवी आहे लोकचळवळ. लोकांच्या मनात वृक्षलागवडीचे बीज आपल्याला रुजवायचे आहे. हाच प्रयत्न या ५० कोटी वृक्षलागवडीच्या संकल्पादरम्यान केला आहे.

**शेतकऱ्यांच्या हितासाठी २०**



शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे, उन्नत शेती समृद्ध शेतकरी, प्रधानमंत्री पीक विमा योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना अशा विविध योजना राबवल्या आहेत. या योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी प्रगती साधली आहे.

**समृद्धीच्या फळबागा... २४**

बरेच शेतकरी पारंपरिक पिकांपेक्षा फळबाग लागवड आणि फुलशेतीकडे वळले आहेत. या शेतीसाठी त्यांना शासनाकडून विविध प्रकारे साहाय्य केले जाते. या साहाय्याद्वारे शेतकऱ्यांना उत्तमरीत्या फळशेती आणि फुलशेती करणे शक्य झाले आहे. या शेतीतून त्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे.

**उन्नत शेती... २८**

शासनाने उन्नत शेती, समृद्ध शेतकरी या मोहिमेंतर्गत कृषी यांत्रिकीकरणासाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या अंतर्गत अनेक शेतकऱ्यांना शेतीसाठी उपयुक्त असणारी आधुनिक अवजारे व यंत्रे मिळाली आहेत.


| | |
|---|---|
| **संकल्प आणि सिद्धी** | **६** |
| **लोकचळवळीचे यश** | **१२** |
| **नवे पर्व लोकोत्सवाचे...** | **१३** |
| **सर्वजन सुखाय** | **१६** |
| **शेतकऱ्यांच्या हितासाठी** | **२०** |
| **समृद्धीच्या फळबागा...** | **२४** |
| **उन्नत शेती...** | **२८** |
| **जलसमृद्धी** | **३२** |
| **मिशन 'शौर्य'** | **३७** |
| **स्वत:च्या घराचे सुख** | **३८** |
| **स्वाधार : शिकणे सुलभ** | **४२** |
| **कौशल्यातून रोजगाराकडे** | **४४** |
| **आता, 'आम्ही समर्थ'** | **४६** |
| **सुरक्षित आरोग्य** | **५२** |
| **लक्ष्मी आली दारी...** | **५४** |
| **कामगार कल्याण** | **५६** |
| **विठुरायाच्या दर्शनासाठी, एसटीची सुविधा** | **५८** |




**स्वत:च्या घराचे सुख ३८**

कुटुंबांची आर्थिक-सामाजिक प्रगती समजायची असेल तर, त्याचे घर बघितले जाते. निवाऱ्याच्या स्थितीवरून त्याच्या प्रगतीचा लेखाजोखा काढण्यात येतो. प्रत्येक बेघराला निवारा मिळण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना, केंद्र सरकार मार्फत राबवण्यात येते. या योजनेंतर्गत अनेक गरजुंना हक्काचे घर मिळाले आहे.

वर्ष ७१ वे | अंक १ | जुलै २०१९

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- प्रबंध संपादक — अजय अंबेकर
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — अनिल आलूरकर
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर
- प्रशासन — मीनल जोगळेकर
- वितरण — मनीषा पिंगळे, मंगेश वरकड, अश्विनी पुजारी
- साहाय्य — स्वप्नाली जाधव, भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., महापे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ९३७२२३०३२०
(सकाळी १०.३० ते ५.३० कार्यालयीन कामकाजा दिवशी)


ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

# स्टार्टअप इंडिया योजनेत महाराष्ट्राची आघाडी

'स्टार्टअप इंडिया' योजनेंतर्गत गेल्या चार वर्षात देशभरात १९ हजार ३५१ स्टार्टअप उद्योगांची नोंदणी झाली असून सर्वाधिक ३ हजार ६६१ स्टार्टअप उद्योगांची नोंदणी महाराष्ट्रात झाली आहे. देशातील राज्यांमध्ये स्टार्टअप उद्योगात झालेल्या वैकल्पिक गुंतवणुकीतही या योजनेंतर्गत महाराष्ट्राने आघाडी घेत देशात दुसरा क्रमांक मिळवला आहे. राज्यात एकूण ६८ स्टार्टअपमध्ये ४४० कोटी ३८ लाखांची वैकल्पिक गुंतवणूक झाली आहे.

केंद्रीय उद्योग व वाणिज्य मंत्रालयाच्यावतीने १६ जानेवारी २०१६ पासून देशभरात 'स्टार्टअप इंडिया' योजनेची अंमलबजावणी सुरू झाली. एकूण १९ कृती आराखड्यानुसार सुरू असलेल्या या कार्यक्रमावर देखरेख ठेवणाऱ्या केंद्रीय उद्योग व वाणिज्य मंत्रालयाच्या उद्योग व देशांतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाने २४ जून २०१९ रोजी राज्यनिहाय स्टार्टअप उद्योगांची यादी जाहीर केली आहे. या यादीत देशातील २९ राज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेशांची आकडेवारी जाहीर करण्यात आली असून ३ हजार ६६१ स्टार्टअप उद्योगांसह महाराष्ट्र पहिल्या स्थानावर आहे. या यादीत महाराष्ट्रापाठोपाठ कर्नाटक (२,८४७), दिल्ली (२,५५२), उत्तर प्रदेश (१,५६६) तर १ हजार ८० स्टार्टअपसह तेलंगना पाचव्या स्थानावर आहे.




## वैकल्पिक गुंतवणूक निधीत महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर

लघु उद्योग विकास बँकेने भांडवली बाजारावर देखरेख ठेवणाऱ्या 'सेबी' संस्थेकडे नोंदणीकृत संस्थांच्या माध्यमातून स्टार्टअप उद्योगांसाठी वैकल्पिक गुंतवणूक निधी उभारला आहे. या निधीच्या माध्यमातून देशभरात १३ राज्ये आणि दिल्ली या केंद्रशासित प्रदेशात २४७ स्टार्टअप उद्योगांत १ हजार ६२५ कोटी ७३ लाखांची वैकल्पिक गुंतवणूक केली आहे. या यादीत महाराष्ट्र ६८ स्टार्टअपमधील ४४० कोटी ३८ लाखांच्या वैकल्पिक गुंतवणुकीसह दुसऱ्या स्थानावर आहे. तर ७५ स्टार्टअपमधील ४९९ कोटी ८५ लाखांच्या वैकल्पिक गुंतवणुकीसह कर्नाटक पहिल्या स्थानावर आहे.

स्टार्टअप इंडिया योजनेंतर्गत स्टार्टअप उद्योग उभारण्यासाठी 'फंड ऑफ फंड फॉर स्टार्टअप' (एफएफएस) नावाने १० हजार कोटींचा निधी उभारला आहे. उद्योग व देशांतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग देशातील स्टार्टअप उद्योगांवर देखरेख ठेवतो तर लघुउद्योग विकास बँक ही स्टार्टअप उद्योगांना वितरित करावयाच्या 'फंड ऑफ फंड फॉर स्टार्टअप' संदर्भातील संवितरण संस्था आहे.

# नवमहाराष्ट्राची पायाभरणी



**डॉ. परिणय फुके**
राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), वने, आदिवासी विकास

प्रत्येक व्यक्तीचे एक स्वप्न असते. कुणाला घर हवे असते. कुणाला शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, वसतिगृहात राहण्यासाठी साहाय्य हवे असते. कुणाला शेतीसाठी वीजपंप, अवजारे हवे असतात. कुणाला रोजगार स्वयंरोजगारासाठी कौशल्य प्राप्त करून देणारे प्रशिक्षण आणि आर्थिक मदत हवी असते. ही स्वप्नपूर्ती होईल अशी आशा मनात ठेवून या व्यक्ती आपले जीवन जगत असतात. अशा व्यक्तींना एके दिवशी मग आपले स्वप्न पूर्ण करण्याचा मार्ग दिसतो. या मार्गावरून आत्मविश्वासाने पाऊल टाकत ते आपल्या जीवनात परिवर्तन घडवून आणतात. हा मार्ग असतो, विविध शासकीय योजनांचा.

गेल्या पाच वर्षात शासनाने अनेक महत्त्वाकांक्षी योजना आखल्या. निर्णय घेतले आणि त्यांची तत्परतेने अंमलबजावणी केली. त्यासाठी निधीची कमतरता पडू दिली नाही. नियमात सुलभता आणली. कागदपत्रांमधील क्लिष्टता कमी केली. योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता राहावी, यासाठी लाभार्थ्यांच्या खात्यात थेट रक्कम देण्यात आली. त्यामुळे राज्यातील सर्वच भागातील सर्वसामान्य व्यक्ती, विद्यार्थी, शेतकरी, महिला, कामगार या सर्व घटकांना वेगवेगळ्या योजनांचा लाभ मिळून त्यांना जगण्याची नवी उमेद प्राप्त झाली आहे. अशाच काही लाभार्थ्यांच्या यशकथा आम्ही या अंकात समाविष्ट केल्या आहेत. या यशकथा गेल्या पाच वर्षांत या शासनाने सर्वसामान्यांचे आयुष्य उत्तमरीतीने बदलून टाकण्याचा जो निर्धार केला होता, त्याचा ठोस पुरावा आहे. शासनाच्या योजना या कशा, परिवर्तनाच्या नव्या वाटा दाखवतात, हे सिद्ध करणाऱ्या या यशकथा आहेत. या यशकथांमुळे इतरांना प्रेरणा मिळून तेसुद्धा याच मार्गाने जाऊन स्वतःच्या आयुष्याला सक्षम आणि समर्थ करू शकतात.



पर्यावरणाचा नाश, प्रदूषणात वाढ, हवामानात झालेले आणि होत असलेले बदल त्यामुळे ऋतुचक्राची बिघडलेली घडी, या नव्या समस्या सध्या आपल्यापुढे आ वासून उभ्या ठाकल्या आहेत. या सर्वांच्या मुळाशी मानवाने केलेली वनांची कत्तल आहे. वनांमुळे निसर्गाचे चक्र हे सुव्यवस्थितरीत्या फिरते, हे प्रामुख्याने लक्षात घेतले पाहिजे. महाराष्ट्रातील वनक्षेत्र कमी होत चालले आहे. त्याचे वाईट परिणामही आपल्यासमोर आहेत. हे सर्व टाळण्यासाठी गेल्या चार वर्षांपासून शासन वृक्षलागवडीची मोहीम राबवत आहे. ही मोहीम केवळ वन विभाग व राज्य शासनापुरती मर्यादित न राहता ती लोकचळवळ व्हावी यावर मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि वनमंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे प्रत्येक वर्षी या मोहिमेला मोठे यश मिळाले. वृक्षलागवडीची ही मोहीम आता लोकोत्सव झाली आहे. दरवर्षी या लोकोत्सवाला सुजाण नागरिकांचा सहभाग वाढत चालला आहे. यंदा ३३ कोटी वृक्षलागवडीचा निर्धार करण्यात आला आहे. १ जुलै ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीत हा निर्धार पूर्णत्वास न्यायचा आहे. वन विभागाने त्यासाठी सर्व जय्यत तयारी केली आहे. नावीन्यपूर्ण योजना आखल्या आहेत. मागेल त्याला वृक्षाचे रोपटे देण्याची व्यवस्था केली आहे. या सर्वांचा आपण उपयोग करून वृक्षलागवडीच्या कामात झोकून द्यायला हवे. वृक्षलागवड जशी महत्त्वाची आहे, त्याचबरोबर त्याची जोपासनाही महत्त्वाची ठरते. वृक्ष जगले तरच राज्याचे वृक्षाच्छादन वाढणार आहे. ते वाढले तरच पर्यावरण व निसर्गाचे संतुलन कायम राहील. त्यामुळे अधिकाधिक वृक्ष जगवण्याचा संकल्प सर्वांनी करायला हवा. लावलेले वृक्ष हे आपले अपत्यच आहे, असे समजले तर त्याचे संगोपन आनंदाने व उत्साहाने करता येईल.

यंदाचा अर्थसंकल्प नुकताच विधिमंडळात मांडण्यात आला. हा अर्थसंकल्प समाजातील सर्व घटकांच्या जीवनाला अधिक अर्थपूर्ण करणारा, सर्वांना प्रगती आणि समृद्धीच्या संधी देणारा आहे. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी, 'सर्वांची सोबत, सर्वांचा विकास आणि सर्वांचा विश्वास' हा मंत्र दिला आहे. त्याचे प्रतिबिंब या अर्थसंकल्पात उमटले आहे. हा अर्थसंकल्प विकासाचा असला तरी त्यात सर्वांच्या विश्वासाचा अर्थ यात दडलेला आहे. समाजातील सर्व घटकांचा जेव्हा समन्यायी विकास होईल, तेव्हाच नवमहाराष्ट्राची उभारणी होईल. या उभारणीची पायाभरणी यंदाच्या अर्थसंकल्पाने केली आहे.

लोकराज्यचा हा अंक वाचकांना नवमहाराष्ट्राच्या निर्मितीसाठी प्रेरणा देईल, अशी आशा आहे.

**डॉ. परिणय फुके**
(अतिथी संपादक)



पर्यावरण दिनानिमित्त राजभवन परिसरात वृक्षारोपण करताना राज्यपाल सी. विद्यासागर राव. सोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वने मंत्री सुधीर मुनगंटीवार, राज्यपालांचे प्रधान सचिव वेणूगोपाल रेड्डी, वन विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, ईशा फाऊंडेशनचे श्री. सद्‍गुरू जग्गी वासुदेव आदी.

# संकल्प आणि सिद्धी

**राष्ट्रीय वननीतीनुसार एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के वन आवश्यक आहे. सध्या महाराष्ट्रात ही टक्केवारी २० आहे. ती ३३ टक्क्यांपर्यंत वाढवायची असेल तर आपल्याला ४०० कोटी वृक्ष लावण्याची आणि ती जगवण्याची गरज आहे. मग इतके वृक्ष एकट्या वन विभागाला लावणे शक्य आहे का? वन विभागाकडे तेवढी जागा आणि मनुष्यबळ आहे का? नाही. हा कुण्या एका व्यक्तीचा, विभागाचा किंवा संस्थेचा विषय नाही. यासाठी हवी आहे लोकचळवळ. लोकांच्या मनात वृक्षलागवडीचे बीज आपल्याला रुजवायचे आहे. हाच प्रयत्न या ५० कोटी वृक्षलागवडीच्या संकल्पादरम्यान केला आहे.**



**सुधीर मुनगंटीवार,** वित्त आणि नियोजन, वने मंत्री

'चाहते हो यदी जीवन बचाना, मत भूलो फिर वृक्ष लगाना', या संदेशाची पताका खांद्यावर घेऊन मनामनांत वृक्षलागवडीचे बीज रुजवणाऱ्या वन विभागाची पावले आता एकटी नाहीत. या वृक्षदिंडीत लाखोंच्या संख्येने वृक्षस्नेही सहभागी झाले आणि त्यांनी वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरे म्हणत वृक्षांशी नाते जोडले, त्यांच्या जतन आणि संवर्धनाची जबाबदारी स्वीकारली.

तुम्ही जर मला विचाराल की आज तुम्हाला काय वाटते ? मी म्हणेन, आजवरच्या या प्रवासाकडे मी जेव्हा मागे वळून पहातो तेव्हा खरच खूप आनंद वाटतो. आज खऱ्या अर्थाने वृक्षलागवड ही लोकचळवळ झाल्याचे दिसून येते. आता ही पावले थांबायला नकोत, त्यात वाढच व्हायला हवी. आपल्याला वृक्ष तोडणारे नाही तर लावणारे आणि ते जगवणारे हात हवे आहेत. कारण आपल्या आजच्या आणि उद्याच्या आरोग्यसंपन्न श्वासांसाठी ते आवश्यक आहे. ती काळाची गरज आहे. यातूनच आपण दुष्काळाला भूतकाळ करणार आहोत.

## छोटी सुरुवात

महावृक्षलागवडीची सुरुवात आम्ही अगदी छोट्या पावलापासून केली. राज्यातील शाळेत प्रत्येकी १० झाडे लावण्याचा निर्णय २०१५ ला केला आणि राज्यात ३० लाख रोपे लागली. त्यानंतर २०१६ ला एक दिवसात दोन कोटी वृक्ष लावण्याचा संकल्प २ कोटी ८२ लाख रोपे लावून पूर्णत्वाला नेला. या वृक्षलागवडीला मिळालेला लोकसहभाग विलक्षण होता. तब्बल ६ लाख लोक यात सहभागी झाले. उमेद वाढली. लोकसहभागातून राज्यात तीन वर्षात ५० कोटी वृक्षलागवडीचा निर्धार वन विभागाने केला. सूक्ष्म नियोजन केले, समाजातील विविध घटकांचा त्यात सहभाग मिळवला. स्वयंसेवी, आध्यात्मिक संस्था, व्यापारी-उद्योजक, सिनेकलावंत, चित्रपटगृहांचे मालक, विकासक, शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थी, धर्मगुरू, कॉर्पोरेट संस्था, विविध औद्योगिक आस्थापना अशा विविध लोकांना आणि संस्थांना यात सहभागी करून घेतले. हरित सेनेसारखे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. 'माय प्लांट' नावाचे मोबाइल ॲप तयार केले. 'रोपे आपल्या दारी'सारखा कार्यक्रम राबवून सवलतीच्या दरात नागरिकांना रोपे उपलब्ध करून दिली.

## लोकोत्सव

राज्यातील नागरिकांनी हिरव्या समृद्ध महाराष्ट्रासाठी भरभरून प्रतिसाद दिला. हरित महाराष्ट्राच्या या मिशनमध्ये 'मेरा हाथ आग लगानेवालो में नहीं, बुझानेवाले लोगों में होना चाहिए,' असे प्रत्येकाला वाटले आणि म्हणूनच मागील तीन वर्षांपासून राज्यात वृक्षलागवडीचा लोकोत्सव साजरा झाला. समाजात जसा एक मोठा वर्ग वृक्षलागवडीच्या बाजूने उभा राहिला तसाच एक वर्ग असेही बोलताना, शंका उपस्थित करताना पहायला मिळाला की, झाडे तर लावली, ती जगली का, किती जगली, रोपे जगत नसतील तर मग लावायची कशाला?

## झाडांची उपयुक्तता

वातावरणातला कार्बनडायऑक्साईड शोषून घेऊन प्राणवायू देणारे, माणसाला जगवणारे झाडेच आहेत. वातावरणीय बदल, दुष्काळ असो की पूरस्थिती, पर्यावरणाचे संरक्षण

## अशी झाली वृक्षलागवड

- १५ ऑगस्ट २०१५ पासून शाळांच्या आवारामध्ये कमीत कमी २० झाडे लावण्याचा निर्णय. राज्यात जवळपास ३० लाख झाडे एकाच दिवशी लागली.
- १ जुलै २०१६ रोजी लोकसहभागातून एकाच दिवशी २ कोटी वृक्षलागवडीचा संकल्प. सहा लाख लोकांचा सहभाग. एकाच दिवशी राज्यात लागले २.८२ कोटी झाडे. यामध्ये २.२० कोटी वृक्ष वन विभागाने तर ६२ लाख वृक्ष इतर विभाग आणि लोकसहभागातून लागली. या वृक्षलागवडीची लिम्का बूक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद.
- १ जुलै २०१७ ते ७ जुलै २०१७ या कालावधीत ४ कोटी वृक्षलागवडीचा संकल्प करण्यात आला होता. १६ लाख लोकांच्या सहभागातून राज्यात ५.४३ कोटी वृक्ष लागले. यात वन विभागाने ३.४१ कोटी, ग्रामपंचायतींनी ७२ लाख आणि इतर विभागांनी आणि लोकांनी मिळून १ कोटी ३० लाख वृक्ष लावले. सलग दुसऱ्यांदा या वृक्षलागवडीची नोंद लिम्का बूक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली.
- १ ते ३१ जुलै २०१८ या कालावधीत १३ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट १५ कोटी ८८ लाख वृक्ष लावून पूर्णत्वाला गेले. यामध्ये ३६ लाख लोक सहभागी झाले. वन विभागाने यात ७.२२ कोटी वृक्ष लावले. ग्रामपंचायतींनी २.४९ कोटी आणि इतर विभागांनी आणि लोकांनी मिळून ६.१७ कोटी वृक्ष लावले.
- वृक्षलागवडीच्या चौथ्या टप्प्यात १ जुलै ते ३० सप्टेंबर २०१९ या कालावधीत ३३ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये वन विभाग १८.७५ कोटी, इतर विभाग ६.२५ कोटी आणि ग्रामपंचायती ८ कोटी वृक्ष लावणार आहेत.

करण्यासाठी जे काही प्रभावी उपाय आज उपलब्ध आहेत त्यापैक एक महत्त्वाचा पर्याय म्हणून वृक्षलागवडीकडे पाहिले जाते, जागतिकस्तरावर आता अभ्यासाअंती हे सिद्ध झाले आहे. लावलेले प्रत्येक रोप किंवा झाड जगतेच असे नाही, काही मरतातही. झाडे अमर नाहीत. पण म्हणून झाडे लावायचीच नाहीत का? असा विचार करून चालेल का? तर नक्कीच नाही. या सृष्टीचा पर्यावरणस्नेही विकास करायचा की तिला भकास करायचे, प्रत्येकाने ठरवायला हवे. कारण 'जहाँ वन है, वहाँ जल है, और जहाँ जल है वही मनुष्य का कल है.' विविध धर्मांमध्ये वृक्षाला देव मानण्यात आले आहे, प्रत्येक धर्मात वृक्षलागवड आणि संवर्धनाचा संदेश दिला आहे.

शासकीय-अशासकीय जमिनी, शेत, शेतबांध, रस्ते, कालवे, जलसंपदा प्रकल्प, रेल्वे लाईन, याच्या दोन्ही बाजूंनी आपण झाडे लावत आहोत, टेकड्यांवर, संरक्षणमंत्रालयाच्या मोकळ्या जागांवर, राष्ट्रीय महामार्गांच्या दुतर्फा आपण झाडे लावत आहोत. यासाठी आपण रेल्वे, संरक्षण मंत्रालय आणि केंद्रीय बांधकाम विभागाशी सामंजस्य करार केले आहेत. प्रत्येक जिल्ह्यात स्व. उत्तमराव पाटील वन उद्यानाची निर्मिती केली. विभागीयस्तरावर हायटेक नर्सरी तयार केल्या. तालुका आणि इतर ठिकाणच्या रोपवाटिकांचे आधुनिकीकरण आणि दर्जावाढ केली. विसापूरला आंतरराष्ट्रीय दर्जाचे वनस्पती उद्यान विकसित करत आहोत. पाणथळे आणि सरोवरातील जैवविविधतेचे रक्षण करण्याकडे लक्ष दिले आहे.

## भरभरून प्रतिसाद

हरित महाराष्ट्राच्या या संकल्पनेला राज्यातील नागरिकांनी प्रत्येकवेळी भरभरून प्रतिसाद दिला. त्यांच्या सहकार्यामुळेच दोन कोटी नंतर चार कोटी वृक्षलागवडीचा संकल्प ५ कोटी ४३ लाख रोपे लावून पूर्णत्वाला गेला. गेल्या वर्षीचे १३ कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट १५ कोटी ८८ लाख रोपे लागून पूर्ण झाले. या दोन्ही वर्षांच्या वृक्षलागवडीत साधारणत: ५२ लाख लोकांनी सहभाग घेतला. आता खरेच इतकी रोपे लागली का? मनात शंका घेण्याचे कारण नाही. प्रत्येक रोपाची अक्षांशरेखांशासह वन विभागाच्या संकेतस्थळावर नोंद झाली आहे. ज्याला कुणाला शंका वाटते, त्या प्रत्येकाला लावलेले रोप खरेच लागले आहे का, की नाही याची खात्री करून घेता येईल. माहिती तंत्रज्ञानातून इतकी पारदर्शकता आपण वृक्षलागवडीत आणली आहे. दर सहा महिन्यांनी लावलेल्या रोपांची पाहणी करून त्याची माहिती छायाचित्रासह संकेतस्थळावर अपलोड केली जाते.

लावलेली किती रोपे जगली असा एक प्रश्न वारंवार विचारला जातो. सरासरी प्रमाण पाहिले तर दोन कोटी वृक्षलागवडीत ७२ टक्के, ४ कोटी वृक्ष लागवडीत ८० टक्के आणि १३ टक्के वृक्षलागवडीतील ८५ टक्के रोपे जिवंत असल्याचे दिसून आले आहे. वन विभागाने लावलेल्या रोपांचे जिवंत राहण्याचे प्रमाण अधिक आहे कारण रोपे जगवण्याची व्यवस्था आपण केली आहे. काही ठिकाणी वन विकास महामंडळाने लावलेले वृक्ष जगवण्याची जबाबदारी घेतली आहे. काही स्वयंसेवी संस्था आणि आध्यात्मिक संस्थांनीही लावलेली रोपे जगवण्याचे काम केले आहे. पण मला वाटते की, जी व्यक्ती किंवा संस्था रोपे लावते त्यांनी ती रोपे जगवली पाहिजेत, वाढवली पाहिजेत, हे आपले वैयक्तिक, सामाजिकच नाही तर घटनात्मक कर्तव्य आहे.

## महाराष्ट्र पहिला

कोटीच्या कोटी वृक्ष लावता, त्याचे काही दृश्य परिणाम दिसून आले आहेत का? खरे तर आपण केलेल्या कामाचे आपणच मूल्यांकन करण्यापेक्षा त्रयस्थ व्यक्तीने ते केलेले अधिक चांगले. असेच त्रयस्थ सर्वेक्षण फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडियाकडून केले जाते. या संस्थेच्या २०१७ च्या अहवालात महाराष्ट्रातील २०१५ ते २०१७ च्या काळातील वनांबाबतची स्थिती नमूद करण्यात आली आहे. यात राज्यातील वनेतरक्षेत्रातील वृक्षाच्छादन २७३ चौ.कि.मी ने वाढल्याचे सांगितले आहे, जे देशात पहिले आहे. घनदाट जंगले म्हणजे ७० टक्क्यांपेक्षा जास्त घनतेची जंगले यामध्ये आपल्याकडे ५१ चौ.कि.मी ची वाढ झाली आहे. आपले कांदळवन क्षेत्र ८२ चौ. कि.मी ने वाढले आहे. यातही महाराष्ट्राने देशात पहिला क्रमांक नोंदवला आहे. वनातील जलव्याप्त क्षेत्रात ४३२ चौ कि.मी ची वाढ आहे. राज्यातील बांबू क्षेत्रात ४४६२ चौ.कि.मी वाढ झाली आहे.

## वृक्षलागवडीचे फलित

बांबू हा कल्पवृक्ष आहे असे मला वाटते. यात मानवी जीवनाला उपयुक्त असे अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याचे घटक आहेत. राज्यात बांबूचा व्यावसायिक वापर वाढावा, यातून रोजगार निर्मिती व्हावी, उत्तम दर्जाचा बांबू उपलब्ध व्हावा यासाठी आपण चंद्रपूर जिल्ह्यात चिचपल्ली येथे बांबू प्रशिक्षण आणि संशोधन केंद्राची स्थापना केली. महाराष्ट्र राज्य बांबू विकास मंडळ स्थापन करून बांबूआधारित स्वयंरोजगाराला चालना देत



आहोत. बांबूला महाराष्ट्राने वाहतूक परवान्यातून मुक्त केल्यानंतर राज्याचा हा निर्णय देशपातळीवर स्वीकारला गेला. ३३ कोटी वृक्षलागवडीत आपण १० टक्के बांबूची रोपे लावत आहोत. राज्यात चार विद्यापीठांमध्ये बांबू प्रशिक्षण आणि हॅण्डीक्राफ्ट युनिट सुरू झाले आहे. मराठवाड्यात बांबू लागवड वाढवून येथे आपण हरयाणाच्या धर्तीवर प्लायवूड इंडस्ट्री स्थापन करण्याचे प्रयत्न करत आहोत.

## वैविध्यपूर्ण

जगातील पर्यावरण रक्षणाची सर्वात मोठी १ कोटीची हरित सेना महाराष्ट्रात निर्माण व्हावी म्हणून व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. आतापर्यंत ६२ लाखांहून अधिक लोक हरित सेनेचे सदस्य झाले आहेत. हॅलो फॉरेस्ट १९२६ नावाने देशातील वन आणि पर्यावरण क्षेत्रातील पहिली हेल्पलाइन सुरू केली आहे.

अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत आहोत. यातील रानमळासारखा वृक्षलागवडीचा पॅटर्न राज्यस्तरावर वृक्षाची जोपासना हीच निसर्गाची उपासना या नावाने सुरू केला. मानवी जीवनातील अनेक घटनाप्रसंगांना, आठवणींना वृक्ष लावून चिरंतन करण्याचा प्रयत्न यातून होत आहे. यात कुणी 'शुभेच्छा वृक्ष' लावतो आहे तर कुणी लग्न होऊन सासरी जाणाऱ्या मुलीच्या नावाने तिची आठवण म्हणून अंगणात 'माहेरची झाडी' लावत आहेत. दहावी-बारावीमध्ये उत्तीर्ण झालेली, नोकरी लागली म्हणून आनंद झालेली माणसे आनंद वृक्ष लावत आहेत, आपल्यातून जी जिवाभावाची माणसे गेली त्यांच्या स्मृती जपण्यासाठी 'स्मृती वन' विकसित होताना दिसते आहे. या पावसाळ्यात अशी ३ लाख ४८ हजार ८८७ झाडे राज्यात लागणार आहेत.

## फळझाडातून उत्पन्नवृद्धी



रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवडीला प्रोत्साहन देत आहोत. शेतात, शेतबांधावर फळझाड लागवड करून वनशेती विकसित करण्याचा, त्यातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न आहे. साग, चंदन, खाया, बांबू, निम, चारोळी, महोगनी, आवळा, बेहडा, हिरडा, अर्जुन, सीताफळ, चिंच, जांभूळ, बाभूळ, अंजन, खैर, शेवगा, हदगा, आंबा, काजू, फणस अशा ३१ झाडांचा यात समावेश आहे. या वर्षी यासाठी आपण जवळपास ४८ हजार ४५५ ऐच्छिक लाभार्थी निश्चित केले. त्यांच्यामार्फत २२ लाख २३ हजार ९८० झाडे राज्यात लागतील. शासनाच्या या योजनेशिवाय खासगी प्रयत्नातून शेतकरी फळझाड लागवड करत असतात. यातून ही जवळपास २२ लाख फळझाडे राज्यात लागतील असा अंदाज कृषी विभागाने सांगितला आहे. भाऊसाहेब फुंडकर फळझाड योजनेतूनही फळझाड लागवडीसाठी प्रोत्साहन देत आहोत. २०१९ मध्ये ३७ हजार ३१९ लाभार्थ्यांची निवड केली आहे.

## धनश्री आणि वनश्री

लेकीच्या जन्माचे स्वागत व्हावे म्हणून 'कन्या वन समृद्धी योजना' सुरू केली. शेतकऱ्यांच्या घरात जन्माला येणाऱ्या मुलीच्या नावाने १० रोपे देऊन तिच्या जन्माचे स्वागत करण्याची अनोखी परंपरा वन विभागाने अंमलात आणली. ३३ कोटी वृक्षलागवडीमध्ये या योजनेंतर्गत २ लाख १५ हजार ९५३ मुलींच्या नावे झाडे लागणार आहेत. एका मुलीला पाच सागाची आणि पाच फळझाडे आपण देतो. म्हणजेच राज्यात 'कन्या वन समृद्धी योजने'तून यावर्षी २१ लाख ५९ हजार ५३० झाडे लावून शेतकऱ्यांची कन्या, 'धनश्री बरोबर वनश्री' ही होणार आहेत.

## नद्यांचे मोकळे श्वास

देशामध्ये नद्यांचे पुनरूज्जीवन करण्यासाठी नद्यांच्या दोन्ही किनाऱ्यांपासून १ कि.मी अंतरावर वन, शासकीय आणि खासगी जमीनीवर वृक्षलागवड करण्यात येत आहे. याच धर्तीवर

## नावीन्यपूर्ण

- अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर तालुक्यातील निमज गावातील पद्माकर मतकर या मुलीच्या पित्याने मुलीच्या लग्नसोहळ्यात उपस्थितांना रोप वाटून वृक्ष संवर्धनाचाही संदेश दिला.
- शिरुर तालुक्यातील रांजणगाव सांडस येथे उमेश रणदिवे हे जवळजवळ चार वर्ष झाले वृक्षारोपण करत आहेत. तसेच शेतामध्ये एक एकर जमिनीतील बाजरी फक्त पक्षांसाठी घेतात.
- दहिसर येथील रिक्षाचालक प्रकाश सुरेश माने यांनी रिक्षात झाडे लावून दुष्काळ निवारणाचा अनोखा संदेश दिला आहे. वनमंत्र्यांनी ही तर वृक्षीणा आहे, असे सांगत श्री.माने यांच्या उपक्रमाचे कौतुक केले आहे.
- जळगावात जयवंतराव गायकवाड यांनी मुलाच्या लग्नपत्रिका डिजिटल पद्धतीने तयार करून कागदाची बचत केली. त्याचप्रमाणे कमी पाण्यात जगणारी विविध वृक्षांची लागवड अधिकाधिक व्हावी म्हणून त्यांनी वऱ्हाडींना बियांच्या दीड हजार पाकिटांचे वाटप केले.
- नाशिकच्या दोन मुलींनी आपल्या वडिलांच्या जन्मदिन त्यांच्या वयाच्या दहापट वृक्षदान करून साजरा केला. यंदा त्यांच्या या पर्यावरणपूरक उपक्रमाचे १२वे वर्ष आहे.
- शिक्रापूर (मलठण फाटा) येथील काही तरुणांनी एकत्र येऊन आपल्या वाढदिवसाच्या अनावश्यक खर्चाला फाटा देऊन वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा केला.
- जुन्नर तालुक्यातील तरुणांनी एकत्र येत गावात अस्थी विसर्जन बंद करून फळझाडाच्या मुळात मृत व्यक्तीच्या घरासमोर या अस्थी विसर्जित केल्या जातात. दीड वर्षापूर्वी सुरू झालेल्या या नव्या परंपरेनंतर ५१ कुटुंबांनी अशी झाडे लावली आहेत.

राज्यातील नद्यांचे पुनरूज्जीवन करण्याचे काम ईशा फाऊंडेशनच्या मदतीने हाती घेतले आहे. वन, शासकीय आणि खासगी जमिनी निश्चित केल्या आहेत. २०१९ मध्ये जवळपास ३ हजार हेक्टरवर आणि १४० कि.मी. अंतरामध्ये वृक्षलागवडीचे नियोजन आपण केले आहे. पीक पद्धतीत बदल करून शेतकऱ्यांनी फळझाड लागवड करावी यासाठी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न करत आहोत. यातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भरीव वाढ होईल.

'रॅली फॉर रिव्हर' कार्यक्रमांतर्गत राजभवन येथे राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली वृक्षलागवड संमेलन आयोजित केले होते. यवतमाळाच्या वाघाडी नदीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे.

## अटल आनंद घन वन योजना



अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले. त्यातलाच एक म्हणजे, 'अटल आनंद घन वन योजना'. कमी जागेवर घनदाट वन तयार करायचे असेल तर अकिरा मियावाकी या वनस्पती शास्त्रज्ञाने विकसित केलेले तंत्र फार उपयुक्त सिद्ध होत आहे. महाराष्ट्रात महानगरांमध्ये जिथे जागांची कमी आहे तिथे मियावाकी पद्धतीने आपण घन वन उभे करण्याचा प्रयत्न करत आहोत. या योजनेची अंमलबजावणी राज्यात अटल आनंद घन वन योजना नावाने होणार आहे. २०१९ मध्ये किमान १०० ठिकाणी असे वन आपण विकसित करणार आहोत. जिथे एक हेक्टरवर एक हजार झाडे लावता येतात तिथे या पद्धतीने एक हेक्टरवर ३० हजार झाडे लावता येतात. त्यामुळे हरित शहराच्या निर्मितीमध्ये वन विभागाची ही योजना यशस्वी ठरेल.

## त्रिपक्षीय वनविकास

राज्यातील अशासकीय संस्था, उद्योजक आणि शासन यांच्या एकत्रित प्रयत्नातून अवनत वनक्षेत्रावर वृक्षारोपण करून वनक्षेत्र वाढवण्याचा आणखी एक प्रयत्न म्हणजे त्रिपक्षीय करार. आतापर्यंत जवळपास २२ त्रिपक्षीय करार करण्यात आले. यात अनेक उद्योजक आणि कंपन्या त्यांच्या सामाजिक दायित्व निधीतून वृक्षलागवडीसाठी निधी उपलब्ध करून देतात. वन विभागाने उपलब्ध करून दिलेल्या जागेवर वृक्षारोपण करून स्वयंसेवी संस्था त्याचे जतन आणि संवर्धन करतात, सात वर्षांचा करार संपल्यानंतर हे वाढवलेले वनक्षेत्र, वन विभागाकडे सुपुर्द केले जाते.

## अर्थ बळ

वन विभागाबरोबर शासनाच्या इतर विभागांनाही आपण वृक्षलागवड मिशनमध्ये सहभागी करून घेतले आहे. त्यांना वृक्षलागवडीसाठी निधी उपलब्ध व्हावा म्हणून उपलब्ध करून देण्यात आलेल्या तरतुदीच्या ०.५ टक्के निधी वृक्षलागवडीसाठी व संवर्धनासाठी राखून ठेवला आहे. यामुळे वृक्षलागवड आणि वृक्ष संगोपनाच्या कामाला नक्कीच बळ मिळेल असा असे मला वाटते.

## जलयुक्त वन

वन विभागाने स्वत: जलयुक्त शिवारची ३९ हजार २१२ कामे केली. यासाठी जवळपास ५९४ कोटी रुपयांचा निधी दिला. यातून वनक्षेत्रातील जलव्याप्त क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली. जलयुक्त शिवार योजनेतील कामाच्या दोन्ही बाजूनी, जलसंपदा प्रकल्पाच्या बाहेरील बाजूने वृक्षलागवड करण्याचे नियोजन केले आहे. पाणी फाऊंडेशनची जी कामे महाराष्ट्रात सुरू आहेत तिथे मागणीप्रमाणे रोपे उपलब्ध करून देण्याचे काम वन विभाग करत आहे. या माध्यमातून ही राज्यात १० लाख झाडे लागतील असा अंदाज आहे.

## रेशीम वन

राज्यात तुती लागवडीत मोठ्या रोजगार संधी दडल्या आहेत. हिरवाई वाढताना उत्पन्नात देखील वाढ होत आहे. हे लक्षात घेऊन आपण ३३ कोटी वृक्षलागवडीमध्ये ५ कोटी १३ लाख तुती लागवडीचे नियोजन केले आहे. रेशीम संचालनालयाबरोबर वन विभागाने तुतीची रोपे तयार करण्याची जबाबदारी उचलली आहे. सामाजिक वनीकरण विभागाकडून १.७२ कोटी तुतीची रोपे रेशीम संचालनालयास दिली जाणार आहेत.

## दुष्काळग्रस्त मराठवाड्यासाठी

जिथे घनदाट वन आहे तिथे पाण्याची कमी नाही असे चित्र



### गांधीजींची १५० वी जयंती

देश राष्ट्रपिता महात्मा गांधीजींची १५० वी जयंती साजरी करत आहे. महात्मा गांधी १९३० ते १९४८ या काळात वर्ध्यातील सेवाग्राम आश्रमात वास्तव्यास होते. तेव्हा त्यांनी कुटीसमोर पिंपळाचे झाड लावले होते. या झाडापासून आपण जवळपास १५०० कलमी रोपे तयार केली आहेत. ही रोपे २ ऑक्टोबर २०१९ रोजी महात्मा गांधीजींच्या जन्मदिनी राज्यातील सर्व शहीद स्मारकांमध्ये लावली जातील.

दिसते. म्हणूनच चंद्रपूर, सिंधुदुर्ग सारख्या जिल्ह्यात दुष्काळात टँकर लावण्याची गरज पडली नाही याउलट चित्र मराठवाड्यात दिसते. तिथे एकूण भौगोलिक क्षेत्राच्या फक्त ४.५ टक्के वन आहे. ते वाढवण्यासाठी आपण जाणीवपूर्वक पाऊले टाकली. केंद्र सरकारच्या मदतीने इथे इको बटालियनची स्थापना केली. २०१७ च्या पावसाळ्यात मौजे आब्दीमंडी, खुलताबाद येथे ६५ हेक्टरच्या अवनत क्षेत्रावर इको बटालियन मार्फत वृक्षलागवड करण्यात आली. २०१८ च्या पावसाळ्यात आब्दीमंडी येथे ६५ तर शेंद्राबन येथील २५ हेक्टर गायरान क्षेत्रावर वृक्षलागवड करण्यात आली. ३३ कोटी वृक्षलागवडीत जवळपास २०० हेक्टर क्षेत्रावर इको बटालियनमार्फत वृक्षलागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. बीड, परभणी आणि हिंगोलीसाठी आणखी २ इको बटालियन कंपन्या स्थापन करण्याचा प्रयत्न आहे.

आजमितीस ३५ कोटी रोपे लागवडीसाठी तयार आहेत. सवलतीच्या दराने रोपांची विक्री सुरू आहे. १० टक्के बांबू, १० टक्के वनौषधीची रोपे या वृक्षलागवडीत लावणार आहोत.

### कांदळवन शाप नव्हे वरदान

कांदळवन क्षेत्र हे समुद्र आणि खाडी किनाऱ्यावरील जैवविविधतेचे भंडार समजले जाते. मत्स्यबीज तयार होण्याचा ते उगमस्रोत आहेत. त्सुनामी सारख्या आपत्तीपासून वाचवण्यासाठी संरक्षक म्हणून कांदळवन काम करतात. कांदळवनात मोठ्या उपजीविका दडल्या आहेत. तशी ही योजना कांदळवन कक्षाकडून राबवत आहोत. खेकडा, शिंपले पालनाबरोबर अनेक रोजगारक्षम उपक्रम यात हाती घेतले आहेत. कांदळवनाच्या स्वच्छतेला प्राधान्य दिले आहे. २५ हजार लोकांच्या सहभागातून ११.०३ कि.मी च्या समुद्र आणि खाडी क्षेत्रातील कांदळवनाची स्वच्छता केली आणि ८ हजार टन कचरा त्यातून बाहेर काढला.



### लोकसहभाग

यंदाच्या ३३ कोटी वृक्षलागवडीसाठी शासन तयार आहे. वृक्षलागवडीच्या जागा निश्चित झाल्या आहेत, खड्डे खोदून झाले आहेत. रोपे लागवडीसाठी उपलब्ध आहेत, आता गरज आहे लोकांनी पुढे येऊन पुन्हा एकदा वृक्षलागवडीचा उत्सव साजरा करण्याची. त्यासाठी आपल्याला झाडे लावणारे आणि ते जगवणारे लाखो हात हवे आहेत. मला विश्वास आहे, मागील तीन वर्षांचा रेकॉर्ड या वृक्षलागवडीत मोडला जाईल. जवळपास १ कोटी लोक ३३ कोटी वृक्षलागवडीत सहभागी होऊन रोपे लावतील अशी अपेक्षा आहे.

मला इथे दोन गोष्टी सांगायच्या आहेत. एक म्हणजे लावलेल्या प्रत्येक रोपांची वन विभागाकडे नोंद करा, त्या जागेच्या अक्षांश आणि रेखांशासह त्याचा फोटो वन विभागाच्या संकेतस्थळावर अपलोड करा म्हणजे राज्यात एकूण होणाऱ्या वृक्षलागवडीची तुम्ही लावलेल्या रोपाची नोंद होईल. दुसरी गोष्ट लावलेले रोपं 'जगेल आणि वाढेल' याची प्रत्येकाने काळजी घ्यावी. नुसते रोप लावून उपयोग नाही, ते जगले पाहिजे, त्याची जबाबदारी प्रत्येकाने ऐच्छिक स्वरूपात स्वीकारली तर हरित महाराष्ट्राचे आपले ध्येय नक्कीच साध्य होईल, असा मला विश्वास वाटतो.

**शब्दांकन : डॉ. सुरेखा मधुकर मुळे,** विभागीय संपर्क अधिकारी

### नावीन्यपूर्ण

- ट्री गणेशा ही संकल्पना मुंबईमध्ये गणेशोत्सव काळामध्ये अमलात आणली गेली.



- घाटकोपर येथील डोंगर ग्रुपने भटवाडी येथील मोकळ्या झालेल्या डोंगर, जंगलांना पुन्हा संजीवनी देण्याचे काम सुरू केले आहे. त्यासाठी डोंगर ग्रुपमधील प्रत्येक सदस्य रोज कमीत कमी एक लीटर पाणी या डोंगरावरील झाडांना देत त्यांना जगवण्याचा प्रयत्न करतात.
- वनविभागात साहाय्यक उपवनसंरक्षक असलेले अशोक कवीटकर यांनी आपल्या मुलीच्या लग्नात दीड हजार फळवृक्षांची भेट देऊन लोकांना वृक्षांचे महत्त्व पटवून दिले. या कार्याने भारावून जाऊन वऱ्हाडींनी वृक्षलागवड आणि संवर्धनाचा मानस व्यक्त केला.
- शाश्वत विकास फाऊंडेशन तर्फे शिंदेवाडी, (ता. हवेली, जि. पुणे) येथे लक्ष्मीतरू झाडाची उपलब्ध होणाऱ्या क्षेत्रावर गेल्या तीन वर्षे सातत्यपूर्ण लागवड होत आहे.
- शंकर यशवंत काटकर, मु.पो.करंडी, (ता.जि. सातारा) यानी जून २०१८ मध्ये मुलाच्या लग्नात आलेल्या ४०० लोकांना चिंच, आवळा, बदाम, जांभूळ या वृक्षाची रोपे भेट दिली.
- कोल्हापूर मधील डॉक्टर, व्यावसायिक, नोकरदार आणि विद्यार्थी यांनी ग्रीन व्हीजन व्हॉटस्ॲप ग्रुप तयार करून वृक्ष लागवड उपक्रम सुरू केला आहे.

# लोकचळवळीचे यश

**वृक्षलागवडीचा संस्कार शाळांमधून घराघरात जावावा हा प्रयत्न असून शाळांमध्येही वृक्षलागवडीचे कार्यक्रम करण्यात येतील. याशिवाय धार्मिक संघटना, विकासक, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधी यांनीही वृक्षलागवडीत सहभाग देणे गरजेचे आहे. आपण सर्वजण मिळून वृक्ष लावू, आपला महाराष्ट्र हरित करू. वृक्षलागवड ही लोकचळवळ झाली पाहिजे.**



**डॉ. परिणय फुके**
राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), वने, आदिवासी विकास

हरित महाराष्ट्र करण्यासाठी प्रत्येकाने आपला सहभाग देणे गरजेचे आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत वनांचे संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. तापमान वाढ, पावसाची अनियमितता आणि त्यामुळे उद्‌भवणारी पाणी टंचाई अशा संकटांवर मात करण्यासाठी वृक्षलागवड करणे आवश्यक ठरते. त्यासाठी वृक्ष लागवडीचा उपक्रम शासकीय न राहता प्रत्येकाचाच झाला पाहिजे.

सध्या वृक्ष असो अगर वन्यजीवसृष्टी असो, याबाबत गंभीर स्थिती निर्माण झाली आहे. राज्यात २० टक्क्यांच्या आसपास वनाच्छादन आहे. राष्ट्रीय वननीतीनुसार वनाच्छादन ३३ टक्क्यांपर्यंत वाढवायचे असेल तर वन आणि वनेत्तर जमिनीवर मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड होणे गरजेचे आहे. हे एकट्या वन विभागाचे काम नाही तर लोकसहभागातून वृक्षलागवड आणि वृक्ष संगोपनाची चळवळ निरंतर सुरू राहिली पाहिजे.

जगात पर्यावरणीय संतुलन राखणे ही मोठी समस्या आहे. पर्यावरण रक्षणाची जबाबदारी ही फक्त शासनाचीच नसून प्रत्येकाचीच आहे. शासनामार्फत वनांच्या संवर्धनासाठी वृक्षलागवड मोहीम गेल्या तीन वर्षांपासून राबवण्यात येत आहे. सर्वांच्या सहकार्यातूनच ३३ कोटी वृक्षलागवडीचे मिशन पूर्ण करणे सहज शक्य आहे. पहिल्या वर्षी २ कोटी, दुसऱ्या वर्षी ४ कोटी, तिसऱ्या वर्षी १३ कोटी वृक्षलागवड करण्याचे लक्ष्य पूर्ण केले आहे. या वर्षी ३३ कोटी वृक्षलागवड करण्याचा आपला निर्धार आहे.

प्रत्येकाने १ जुलै ते ३० सप्टेंबर दरम्यान घराच्या अंगणात एक झाड लावावे, गृहनिर्माण संस्थांनी सोसायटीच्या आवारात झाडे लावावीत, सार्वजनिक जागेवर जिथे वृक्षलागवड होते तिथे वृक्षलागवड कार्यक्रमात सहभागी व्हावे आणि इतरांनाही तशी प्रेरणा द्यावी. प्रत्येकाला जगण्यासाठी प्राणवायू लागतो आणि तो झाडांपासून मिळतो एवढे जरी प्रत्येकाने समजून घेतले तर ही मोहीम अत्यंत यशस्वी होईल, असा मला विश्वास वाटतो.

**शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,** विभागीय संपर्क अधिकारी

## नावीन्यपूर्ण

- पर्यावरणाचे महत्त्व घेऊन काही घरांमध्ये एसी कमीत कमी वापरला जाईल, याचा प्रयत्न केला जात आहे.
- पुण्यामधील तळजाई टेकडीवर ज्येष्ठ नागरिकांनी एकत्र येऊन वृक्ष लागवड केली असून प्रत्येकी एक झाड दत्तक घेऊन त्याचे संगोपन करीत आहेत.
- काळदरी (ता. पुरंदर, जि. पुणे) येथील गावाने प्रत्येक घरात परसबाग निर्माण करण्याचा ठराव मंजूर केला आहे.
- गुरुपौर्णिमेनिमित्त केडगाव (जि. अहमदनगर) येथील सिद्ध समाधी योगच्या साधकांनी गुरुदक्षिणा म्हणून टेकडीवर २४० रोपे लावली.
- महागड्या लग्नपत्रिका कागदावर छापून जंगलाचा नाश टाळण्यासाठी हातरुमालावर लग्नपत्रिका छापण्याचा उपक्रम जातेगाव, (ता. शिरुर,जि. पुणे) येथील पर्यावरणप्रेमी दिगंबर कामठे यांनी गेल्या डिसेंबरमध्ये केला.
- डहाणू येथील वन गुन्हेगारांना अवैध वृक्षतोड प्रकरणात न्यायालयाने नुकतीच शिक्षा दिली आहे. त्यानुसार १ वर्ष जेल, ५० हजार रुपये दंड व प्रत्येकी आरोपींनी किमान १५ झाडे जेल किंवा शेतीमध्ये लावून ती जगवावित, अशी शिक्षा दिली आहे.
- मढ, (ता. जुन्नर, जि. पुणे) येथे वृक्षमित्र कट्टा तयार करून त्यामार्फत झाडांची लागवड केली जाते.
- अंबरनाथ येथे सकाळी फिरणारे लोक फेकून दिलेल्या बाटल्या गोळा करून त्यात पाणी भरून आजूबाजूच्या झाडांना घालतात. त्याने वृक्ष वाढीस मदत होते.
- मांजरी ग्रामपंचायत (ता. हवेली, जि. पुणे) घरांच्या नोंदणीसाठी निधी नको, झाडे द्या अशी नावीन्यपूर्ण योजना राबवण्यास सुरुवात केली आहे. या संकल्पनेमुळे गावातील वृक्षांची संख्या वाढून सुंदर, स्वच्छ व हरितग्राम म्हणून गावाची नवीन ओळख होत आहे.
- हिंजेवाडीतील आयटी व्यावसायिक अधिक स्वच्छ, हिरवेगार आणि उत्साही जीवन जगण्यासाठी रस्त्याच्या कडेला आणि जंगलाच्या क्षेत्रावर झाडे लावणार आहेत.

**या पावसाळ्यात लोकसहभागातून ३३ कोटी वृक्षलागवड केली जाणार आहे. यात विविध शासकीय विभाग, यंत्रणांनी सहभाग घेतला आहे. अधिकाधिक व्यक्ती, संस्था, शेतकरी यांना वृक्षलागवड कार्यक्रमात सहभाग घेता यावा, म्हणून वन विभागामार्फत सवलतीच्या दराने रोपे पुरवण्यात येतील. वातावरणीय बदल, दुष्काळ, पाणी संकट अतिवृष्टी यासारख्या नैसर्गिक आपत्तींनी माणसांसमोर आव्हान निर्माण केले असताना त्याला यशस्वीपणे सामोरे जाण्यासाठी जे पर्याय उपलब्ध आहेत त्यामध्ये वृक्षलागवड हा सर्वाधिक प्रभावी पर्याय असल्याचे जागतिकस्तरावर मान्य झाले आहे. ही बाब लक्षात घेऊन वन विभागाने लोकसहभागातून ५० कोटी वृक्षलागवडीचे मिशन हाती घेतले आहे.**

# नवे पर्व लोकोत्सवाचे...

**डॉ. सुरेखा मधुकर मुळे**

राज्यात १५ जून ते ३० सप्टेंबर या काळात वृक्षप्रेमींना वृक्षलागवडीसाठी सवलतीच्या दराने रोपे उपलब्ध करून देण्याचा निर्णय वन विभागाने घेतला आहे. यामध्ये ९ महिन्यांचे लहान पिशवीतील रोप जे इतरवेळी १५ रुपयांना विकले जाते ते या काळात ८ रुपयांना विकण्यात येईल. १८ महिन्यांचे मोठ्या पिशवीतील रोप जे इतरवेळी ७५ रुपयांना विकले जाते ते वनमहोत्सवाच्या काळात ४० रुपयांना मिळू शकेल.

सामाजिक वनीकरण विभागामार्फत तुतीची रोपे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत तयार करून ती मोफत उपलब्ध करून दिली जातील.

## रानमळा पॅटर्न

ग्रामविकास आणि नगर विकास विभागाने खेड तालुक्यातील रानमळा गावचा वृक्षलागवडीचा संस्कार जनमानसात रुजवण्याचे निश्चित केले. या योजनेत आतापर्यंत ३ लाख ४८ हजार ८८७ लाभार्थ्यांची निवड झाली. ते यंदाच्या मोहिमेत सहभागी होऊन वृक्षारोपण करणार आहेत.

जागतिक पर्यावरण दिनी म्हणजेच ५ जून २०१९ ला वर्षभरातील घटनांची यादी करून, वृक्षदिंडी काढून कुटुंबाना एकाच दिवशी ग्रामपंचायतीमार्फत रोपे दिली जातात. गेल्या दोन वर्षात अशा घटनांची जिल्हानिहाय माहिती घेऊन लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

## रानमळा पॅटर्न अंतर्गत अशी लागणार रोपे

**शुभेच्छा वृक्ष:** गावात जन्माला येणाऱ्या बालकाचे स्वागत त्याच्या कुटुंबीयांना रोपटे देऊन केली जाणार आहे, त्याला शुभेच्छा वृक्ष असे नाव देण्यात आले आहे.

**शुभमंगल वृक्ष :** गावात ज्या तरुण-तरुणींचे विवाह होतील, त्यांना शुभमंगल वृक्ष दिला जाईल.

**आनंद वृक्ष :** गावातील जे विद्यार्थी-विद्यार्थिनी दहावी-बारावी उत्तीर्ण होतील, ज्या तरुण-तरुणींना नोकऱ्या मिळतील, जे युवक-युवती स्वतःचा रोजगार सुरू करतील त्यांचा आनंद आणखी द्विगुणित व्हावा म्हणून त्यांना आनंद वृक्ष देऊन गौरवले जाईल.

**माहेरची झाडी :** लग्न होऊन सासरी गेलेल्या मुलीच्या हाताने तिच्या माहेरच्या अंगणात माहेरची झाडी लावली जाईल.

**स्मृती वृक्ष :** एखाद्या घरात आपले माणूस हरवले तर त्याच्या नावाने स्मृती वृक्ष लावला जाईल.





**अभिनव**

**अमरावती**

■ अमरावती जिल्ह्यातील २० नद्या आणि उपनद्यांच्या काठावर वृक्षलागवड करण्यात येत असून ११२ हेक्टरवर होणाऱ्या या वृक्षलागवडीत १ लाख २० हजार रोपे लावली जातील.

■ भानखेडा रोडवर छत्री तलावक्षेत्रात लोकसहभागातून लोकवनाची निर्मिती करण्यात येत आहे. सकाळी फिरायला जाणाऱ्या नागरिकांकडून लावलेल्या रोपांना पाणी देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

■ अमरावती जिल्ह्यात ४३ गोरक्षण संस्था आहेत त्यापैकी ४० संस्थांनी मिळून ५ हजार झाडे लावण्याचा निर्धार केला आहे.

**बुलडाणा**

■ बुलडाणा जिल्ह्यात ३११.३६ हेक्टरक्षेत्रावर १ लाख ११ हजार ६६० फळझाडांची होणार लागवड

■ चालठाणा गावापासून १.५ कि.मी अंतरावर आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान यज्ञातील महात्मा गांधी लोकसेवा संघाच्या ७० एकर जागेवर 'सालई वन' विकसित करण्यात आले आहे

**वाशिम**

■ जलयुक्त शिवार योजनेंतर्गत डीपसीसीटीचे खोदकाम करण्यात आले असून तेथे१ लाख रोपांची लागवड करण्यात येणार आहे.

■ ॲग्रोफॉरेस्ट उपक्रमांतर्गत ५४४ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून त्याद्वारे २ लाख ३५ हजार फळझाडांची लागवड होणार आहे.

■ जिल्ह्यात १ लाख तुती लागवडीचे उद्दिष्ट असतांना ६ लाख रोपांची उपलब्धता आहे.

**कन्या वन समृद्धी**

शेतकरी कुटुंबात मुलगी जन्माला आली तर तिच्या जन्माचे स्वागत म्हणून तिच्या नावाने अंगणात १० वृक्षांची लागवड करायची असा संस्कार वनविभागाने 'कन्या वन समृद्धी' योजनेंतर्गत घालून दिला. २०१७–१८ आणि २०१८–१९ या दोन वर्षांच्या काळात ग्रामपंचायत क्षेत्रात साधारणत: ५ लाख ६५ हजार ६७१ मुलींचा जन्म झाला. त्यापैकी योजनेत २ लाख १५ हजार ९५३ इतके ऐच्छिक लाभार्थी निश्चित करण्यात आले. त्यांना ग्रामपंचायतीमार्फत ५ सागाची तर ५ फळझाडांची रोपे देण्यात येणार आहेत. यामध्ये ३३ कोटी वृक्षलागवडीत ही २१ लाख ५९ हजार ५३० झाडे जन्मलेल्या मुलीच्या नावाने लावली जातील. यामध्ये २ रोपे आंब्याची, १ रोप फणसाचे, १ रोप जांभळाचे तर एक रोप चिंचेचे आहे. भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन वृक्षांची निवड करण्यात येते.



**उत्पन्नाचा स्रोत**

मुलीच्या जन्माबरोबर वृक्ष लावल्यास मुलगी जशी मोठी होईल तसे वृक्षही मोठे होत जातील. तिच्या लग्नापर्यंत हे वृक्ष मोठे झालेले असतील. फळाफुलांनी लगडलेले असतील. त्यातून पर्यायी उत्पन्नाचा स्रोत विकसित होऊ शकेल. सागाच्या वृक्षांपासून मिळणाऱ्या उत्पन्नातून तिच्या विवाहाच्या वेळी आवश्यकता असणारी पैशांची निकडही भागवता येऊ शकेल.

**असा घ्या योजनेचा लाभ**

शेतकरी कुटुंबात मुलीचा जन्म झाल्यानंतर संबंधित ग्रामपंचायतीच्या ठिकाणी पालकांनी मुलीच्या नावाची नोंद करावयाची आहे. त्यानंतर विहित नमुन्यात या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावयाचा आहे.

**वेगळे आणि अभिनव**

**औरंगाबाद**

■ औरंगाबाद जिल्ह्यात १ कोटी १२ लाख रोपे लागवडीसाठी उपलब्ध ■ वनशेती उपक्रमातून ६०७ हेक्टरक्षेत्रावर ८९ हजार रोपांची लागवड ■ रानमळा पॅटर्नअंतर्गत ११५१ लाभार्थ्यांची निवड त्यापैकी ४२१ जणांचा अर्ज भरून घेतला ■ जिल्ह्यात एकूण ३६ लाखाहून अधिक तुतीची लागवड ८३ लाखाहून अधिक रोपे उपलब्ध ■ भाऊसाहेब फुंडकर योजनेअंतर्गत ६९८ हेक्टरक्षेत्रावर ३ लाख ४० हजार ८२६ फळझाडांची होणार लागवड ■ इतर फळझाड लागवड योजनेतून १९४ हेक्टरक्षेत्रावर लागणार ९७ हजार झाडे ■ जिल्ह्यात अटल आनंद घन वन योजनेतून १०० शाळांच्या परिसरात २ हजार चौ.फुट क्षेत्रावर घनवन लागवड ■ घृष्णेश्वराच्या दर्शनाला येणाऱ्या भाविकांना प्रसादरूपी वृक्षाचे वाटप ■ रानमळा पॅटर्नअंतर्गत २० हजार ५८० वृक्ष लावून होणार विविध आठवणींचे जतन ■ जिल्ह्यात कन्या वन समृद्धी योजनेत १९ हजार ४४८ लाभार्थी मुली. प्रत्येकी १० रोपे याप्रमाणे लागणार १ लाख ९४ हजार ४८० रोपे ■ मराठवाड्याचे एकूण वनक्षेत्र ४.८२ टक्के. ते वाढवण्यासाठी सामुहिक पाणीपुरवठ्याच्या विहिरीभोवती वृक्षलागवडीसाठी उपलब्ध क्षेत्र ४१३६ हेक्टर. हेक्टरी २० हजार रोपे याप्रमाणे मनरेगाअंतर्गत ८ कोटी २७ लाख २० हजार रोपांची लागवड ■ धार्मिकस्थळाच्या परिसरात १३६५ स्थळांवर १ हजार रोपे याप्रमाणे १३ लाख ६५ हजार वृक्षलागवड ■ ११ मोठे ७५ मध्यम आणि७४९ लघु जलसंपदा प्रकल्पांच्या क्षेत्रात मियावाकी पद्धतीने घनवनाची लागवड ■ २९९५ कि.मी लांबीच्या कालव्याच्या दुतर्फा वृक्षलागवडीचे नियोजन. ११४७ हेक्टर क्षेत्र यासाठी होणार उपलब्ध ■ रस्त्याच्या दुतर्फा वृक्षलागवड २७ हजार ९२६ कि.मी लांबीच्या रस्त्यांपैकी १० हजार ७८८ कि.मी चे क्षेत्र वृक्षलागवडीसाठी उपलब्ध ■ जलयुक्त शिवार योजनेत ७३०५ नाला खोलीकरणाची कामे. यात वृक्षलागवडीसाठी उपलब्ध लांबी ३६९१.४० कि.मी. औरंगाबाद विभागात

नाला खोलीकरणाच्या दुतर्फा प्रस्तावित वृक्षलागवड ७३ लाख ८२ हजार ८०० ■ राज्यात ३१ मार्च २०१९ अखेर १९ हजार ७८२ एकर तुती लागवड होती. त्यामध्ये ११ हजार ३७३ एकर क्षेत्र मराठवाड्याचे होते. ३०.९९ लाख अंडीपुंज मराठवाड्यात वितरीत करून त्यांचे संगोपेन करण्यात आले. राज्यातील ३२३० टन कोष उत्पादनापैकी १८०२ टन कोष उत्पादन मराठवाड्यात झाले आहे. एकूण रेशीम कोष उत्पादनात मराठवाड्याचा हिस्सा ५७ टक्के आहे. ■ २०१९-२० मध्ये मराठवाड्यात ५९४.७९८ लाख तुती लागवडीचे नियोजन ■ औरंगाबाद विभागात १८ हजार ६८३ हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवडीचे नियोजन. ४७ लाख ४४ हजार ८८५ फळबाग रोपांची आवश्यकता. जवळपास ५० लाख रोपांचे नियोजन.

**यवतमाळ**

■ ५० कोटी वृक्षलागवड मोहिमेच्या अंमलबजावणीमुळे जिल्ह्याच्या वनक्षेत्रात ११५२८ हेक्टरची वाढ.

■ जिल्ह्यात १ कोटी २० लाख ६८ हजार वृक्ष लागवडीचे नियोजन असून त्यासाठी १ कोटी ३५ लाखांहून अधिक रोपे उपलब्ध आहेत. ■ विविध योजनेतून शेतात होणारी वृक्षलागवड १६.२१ लाख. ■ १५ हेक्टरक्षेत्रावर बांबू रोपवन विकसित करण्याचे नियोजन ■ ग्रामपंचायतस्तरावर नदीकाठच्या ५५ गावांमध्ये हेक्टरी १ हजार याप्रमाणे ५५ हजार वृक्षलागवडीचे नियोजन ■ बुलडाणा जिल्ह्यातील मोठी, मध्यम आणि लघु धरणे, तलाव व इतर जलाशयक्षेत्राला लागून वृक्षलागवडीचे नियोजन. यावर्षी २५५.६३ हेक्टर क्षेत्रावर होणार वृक्षलागवड.



## जेवढी मते तेवढी झाडे

देशात नुकत्याच लोकसभेच्या निवडणुका पार पडल्या, त्यानंतर विजयी झालेल्या काही खासदारांनी पुढाकार घेत आपल्या मतदारसंघात जेवढी मते तेवढी झाडे लावण्याचा वैशिष्ट्यपूर्ण निर्धार जाहीर केला. वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सर्व लोकसभा सदस्य, राज्यसभा सदस्य तसेच आमदारांना अशा पद्धतीने वृक्ष लावण्याचे आवाहन केले आहे.

उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघातील नवनिर्वाचित खासदार ओमराजे निंबाळकर यांनी 'जेवढी मते तेवढी झाडे' या संकल्पांतर्गत मतदारसंघात ६ लाख झाडे लावून पर्यावरण रक्षणाचा दूत होण्याचे ठरवले आहे. त्यांच्याप्रमाणेच राहूल शेवाळे यांनी 'प्लांट अ होप' नावाने मिळालेल्या मतांएवढी म्हणजे ४ लाख २४ हजार ९१३ झाडे लावण्याचा निर्धार केला आहे.

## सहभागाचे आवाहन

पावसाळा सुरू झाला आहे आपल्याकडे रोपांची कमी नाही. जी व्यक्ती, संस्था राज्यात वृक्षलागवड करू इच्छिते त्या सर्वांना 'मागेल त्यांना रोप' योजनेतून रोपे मिळणार आहेत. कोणत्या प्रजातीची रोपे कुठे लावायची याचे वन विभाग मार्गदर्शन करत आहे. त्यामुळे वृक्षलागवडीची इच्छा असणाऱ्या प्रत्येकाने आता या वृक्षोत्सवात सहभागी व्हावे आणि पर्यावरण रक्षणाप्रतिचे आपले दायित्व पार पाडले पाहिजे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

■■

## अभिनव

**कोकण**

■ १४५ हेक्टर क्षेत्रावर ६.४४ लाख कांदळवन वृक्षांची लागवड १२.१८ लाख रोपांची निर्मिती ■ पालघर जिल्ह्यात वनहक्क अधिनियमानुसार मंजूर केलेल्या ११३०० पात्र दावेदारांच्या क्षेत्रावर सुधारित जातीच्या ४ लाख ०८ हजार ९७० फळझाडाची लागवड करण्याचे नियोजन. याद्वारे वनपट्टेधारकांना कायमस्वरूपी उत्पन्नाची शाश्वती. ■ रत्नागिरी जिल्ह्यात प्रति कि.मी १ हजार रोपे याप्रमाणे २२ कि.मी अंतरावर २२ हजार रोपे लावण्यात येतील. ■ रत्नागिरी जिल्ह्यात खेड तालुक्यातील तळेगावात खासगी जमिनीवर साग क्लस्टरचे नियोजन. सध्या १०० हेक्टर क्षेत्र उपलब्ध. २ लाख साग रोपे लावणार ■ मौजे मूर ता. राजापूर येथे खासगी जमिनीवर बांबू क्लस्टर. ३७.२५ एकर क्षेत्र उपलब्ध २० हजार बांबू रोपे तसेच मौजे निवळी, मौजे पालवन ता. चिपळूण, मौजे निवोशी, ता. लांजा येथे ३० हजार खैर लागवड ■ रत्नागिरी जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांच्या क्षेत्रात ४२७० वृक्षलागवड, नदी पुनरुज्जीवन कार्यक्रमांतर्गत २५०० बांबूची व इतर झाडे लावणार ■ रत्नागिरी जिल्ह्यात भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेत ६०० हेक्टर क्षेत्रावर ३ लाख फळझाडांची लागवड

**नागपूर**

■ भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेत जिल्ह्यात २०१९-२० करीता १९४४ लाभार्थीकडून २४०९.७१ हेक्टर क्षेत्रावर वृक्षलागवडीचे अर्ज प्राप्त. ■ केंद्र शासनाच्या कार्यालयाच्या प्रादेशिक प्रमुखांनी विभागात एकूण ३००००० रोपे लागवड करण्याचे मान्य केले.

अर्थसंकल्प
२०१९

२०१९च्या अर्थसंकल्पात समाजातील सर्व घटकांचा समन्यायी विकास साध्य व्हावा म्हणून विविध योजनांसाठी भरघोस तरतूद करण्यात आली आहे. नव महाराष्ट्राच्या उभारणीला चालना देणारा हा अर्थसंकल्प आहे.




विधिमंडळात अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी वित्त मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि राज्यमंत्री दीपक केसरकर यांना शुभेच्छा देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

# सर्वजन सुखाय

## शेतकरी

सिंचन सुविधा, कर्ज माफी, पीक कर्ज, पिक विमा, गट शेती, शेतमालाला योग्य भाव अशा विविध स्वरूपात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे.

### सिंचन योजना



- सिंचन खर्च ११ हजार ३९ कोटी रुपये. चार वर्षात या खर्चात ३७३९ कोटी रुपयांची वाढ
- विविध सिंचन योजनांमधून मागील साडेचार वर्षात सुमारे ४ लाख हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता. ६७ टीएमसी पाणीसाठीची निर्मिती
- साडेचार वर्षात १४० सिंचन प्रकल्प पूर्ण.
- 'मागेल त्याला शेततळे' योजनेतून राज्यात उद्दिष्टापेक्षा अधिक, १ लाख ६७ हजार शेततळ्यांची कामे. यावर्षी २५ हजार शेततळी घेणार.
- सूक्ष्म सिंचनाची अनुदान मर्यादा वाढवणार. ३५० कोटी रुपयांचा निधी

### जलयुक्त शिवार



- साडेचार वर्षात १८ हजारांहून अधिक गावांमध्ये पाण्याच्या ताळेबंदानुसार कामे पूर्ण
- या गावांमध्ये ६ लाखाहून अधिक मृद व जलसंधारणाची कामे. यातून २६.९० टीएमसी पाणीसाठा क्षमतेची निर्मिती.

### शेतीला बळ



- 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान' योजनेत ५०.२७ लाख खातेदारांसाठी २४ हजाराहून अधिक रुपयांचा निधी.
- अटल अर्थसाहाय्य योजनेतून कृषी, कृषिपूरक व बिगर कृषी नावीन्यपूर्ण प्रकल्पांना अर्थसाहाय्यासाठी ५०० कोटी रुपयांचा निधी
- ५२ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेतून विम्याची नुकसानभरपाई. यावर्षी खरीप आणि रब्बी हंगामात १ कोटी ३९ लाखांहून अधिक शेतकऱ्यांचा पीक विम्यात सहभाग
- गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेत १ कोटी ३७ लाख शेतकऱ्यांच्यावतीने विमा हप्ता देणार. आता शेतकऱ्यांच्या कुटुंबांनाही लाभ. साडेपाच कोटी जनतेला या माध्यमातून विमाछत्र
- ५२७० जलाशयातून ३.२३ कोटी घनमीटर गाळ उपसला. ३१ हजाराहून अधिक शेतकऱ्यांना लाभ
- २५ हजार कोटी रुपयांचे पीक कर्ज २०१८-१९ मध्ये ३१ हजार २०० कोटी रुपये झाले.

- चार कृषी विद्यापीठांना संशोधनासाठी ६०० कोटी रुपयांचा निधी.
- गट शेतीस चालना. राज्यात २०५ गट स्थापन. त्यांच्यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद
- स्मार्ट प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांच्या उत्पादक कंपन्यांना थेट खरेदीदार कंपन्यासोबत जोडणार
- काजू प्रक्रिया उद्योगासाठी १०० कोटी रुपये
- दुर्गम, डोंगराळ आदिवासीबहूल भागातील पशुपालकांच्या पशुरुग्णांसाठी ८० पशुचिकित्सालये
- गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेतून १३९ गोशाळांना ३४ कोटी रुपयांचा निधी
- भावांतर योजनेतून तूर उत्पादक शेतकऱ्यांना ११२ कोटी तर हरभरा उत्पादक शेतकऱ्यांना १३० कोटी रुपयांचे अनुदान. यावर्षी ३९० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देणार

## सामाजिक न्याय



**धनगर समाजासाठी एक हजार कोटी रुपये, २२ योजना**

- भूमिहीन मेंढपाळ कुटुंबांसाठी अर्धबंदिस्त, बंदिस्त मेंढी पालनासाठी जागा, जागा खरेदीसाठी अनुदान, मेंढ्यांसाठी विमासंरक्षण.
- विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, वंचित विद्यार्थ्यांना अर्थसाहाय्य, गुणवंत विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजना, नामांकित शाळांमध्ये प्रवेश, परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती.
- धनगर समाजासाठी पहिल्या टप्प्यात १० हजार घरांची उभारणी.

**ओबीसी**

- अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर ओबीसी विद्यार्थ्यांना लाभ देण्यासाठी २०० कोटी रुपये.





**ग्रामीण अर्थव्यवस्थेचे सक्षमीकरण**

- ग्रामीण अर्थव्यवस्थेतील १२ बलुतेदारांचे सक्षमीकरण. खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत लघू आणि कुटीर उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद.




**अण्णाभाऊ साठे जन्मशताब्दी**

- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने विविध कार्यक्रमांच्या आयोजनासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद.

## विद्यार्थी



- अनुदानित संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या परिपोषण आहारात ९०० वरून १५०० रु. इतकी वाढ.
- ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ३६ वसतिगृहे, २०० कोटी रुपयांचा निधी.
- इतर मागास प्रवर्गातील मुलींसाठी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती. ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थिनींना दरमहा ६० तर ८ वी ते १० वीच्या विद्यार्थिनींना दरमहा १०० रुपयांची शिष्यवृत्ती.
- १० वीआणि १२ वीत राज्यात आणि विभागात पहिल्या येणाऱ्या ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनुक्रमे १ लाख व ५१ हजार रुपयांचा वसंतराव नाईक पुरस्कार.
- अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मालेगाव येथे नवीन औद्योगिक शिक्षण व प्रशिक्षण संस्था.
- दहावी व बारावी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी कौशल्य विकास योजना.

## महिला

- संजय गांधी निराधार अनुदान आणि श्रावणबाळ योजनेतील अनुदान आता ६०० रुपयांहून १ हजार रुपये.
- विधवा लाभार्थ्यांना एक अपत्य असल्यास ११०० रुपये आणि दोन अपत्ये असल्यास १२०० रुपयांचे अनुदान.
- विधवा, परित्यक्त्या, घटस्फोटित महिलांसाठी स्वयंरोजगार योजना. २०० कोटी रुपयांची तरतूद.
- अल्पसंख्याक महिला व युवकांना रोजगार संधी, १०० कोटी रुपयांचा निधी.
- महिला बचतगटातील सदस्यांना प्रज्वला योजनेतून कायदा आणि अर्थविषयक मार्गदर्शन
- ५२८ कोटी रुपये खर्चाच्या नवतेजस्वीनी योजनेची अंमलबजावणी. १० लाख कुटुंबांना दारिद्र्य रेषेबाहेर काढणार. ५ लाख बचतगटांची चळवळ गतिमान होणार.
- महिला सुरक्षितता पुढाकार योजनेसाठी रु. २५२ कोटींचा निधी.
- चुलमुक्त-धूरमुक्त महाराष्ट्र उपक्रमाची अंमलबजावणी. १०० कोटी रुपये.
- मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात १० हजार लघुउद्योग सुरू करणार. महिला, अनुसूचित जातिजमातींसाठी प्राधान्य.
- ५० तालुक्यात सूक्ष्म, लघू, मध्यम उद्योगपार्क. ३० टक्के भूखंड महिला उद्योजकांसाठी राखीव.
- ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत दरमहा १ लाख ५२ हजार महिलांना आणि ८.३७ लाख बालकांना पोषणआहार.



# अर्थसंकल्प सर्वजनहिताय सर्वजनसुखाय : मुख्यमंत्री

महाराष्ट्र विधिमंडळात सादर करण्यात आलेला २०१९-२० या वर्षासाठीचा अतिरिक्त अर्थसंकल्प राज्याचे उत्पन्न वाढवितानाच खर्च कमी करून सर्व घटकांना सर्वार्थाने पुढे घेऊन जाणारा असल्याने तो 'सर्वजनहिताय सर्वजनसुखाय' आहे, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. या अर्थसंकल्पात शेतकरी, महिला, दिव्यांग, वंचित-उपेक्षितांना न्याय देणाऱ्या योजना सादर करतानाच उद्योग व रोजगारनिर्मितीवर भर देण्यात आला आहे.



देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

## सिंचनाला प्राधान्य

अर्थसंकल्पात शेतीविषयक बाबींबरोबरच सिंचन क्षेत्रासाठी सर्वात जास्त तरतूद करण्यात आली आहे. यावर्षी जलसंपदा विभागासाठी साडेबारा हजार कोटींहून अधिक तरतूद केली आहे. यामुळे राज्याची सिंचनक्षमता वाढण्याबरोबरच सिंचन प्रकल्प पूर्ण होण्याचा कालावधी कमी होण्यास मदत होणार आहे. शेतीचा शाश्वत विकास करण्यासाठी 'स्मार्ट'सारखी योजना महत्त्वाची ठरणार असून त्यासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने २२०० कोटींची उभारणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात कर्जमाफी देण्यात आली असून तांत्रिक तरतुदीमुळे संस्थात्मक यंत्रणेच्या बाहेर राहिलेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्याची कटिबद्धता या अर्थसंकल्पात अधोरेखित करण्यात आली आहे.

## गतिमान अर्थव्यवस्था

अनेक रचनात्मक सुधारणा झाल्यानंतरही ७.५ टक्क्यांनी अर्थव्यवस्था विकसित होत आहे. देशातील सर्व राज्यांशी तुलना करता महाराष्ट्राची आर्थिक स्थिती चांगली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार ५५ हजार कोटींपेक्षा अधिक कर्जाची क्षमता असतानादेखील ते प्रमाण ११ हजार कोटींच्या आत नियंत्रित करण्यात राज्याला यश आले आहे. अशा परिस्थितीत तूट वाढू न देता सर्व घटकांना न्याय देणारा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे मी अभिनंदन करतो.

## पायाभूत सुविधा

राज्यातील पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर देण्यात आला असून त्यासाठी आवश्यक तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. ग्रामीण तसेच शहरी भागातील पाणी पुरवठ्याच्या योजनांना गती देण्यात आली आहे. राज्याने जाहीर केलेल्या नव्या औद्योगिक धोरणाला अनुकूल योजना अर्थसंकल्पात मांडण्यात आल्या आहेत.

अर्थसंकल्पात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना जाहीर करण्यात आली असून त्यामुळे रोजगार निर्मितीला मोठ्या प्रमाणात चालना मिळणार आहे. युवक, गरीब महिला, विधवा, परित्यक्त्या यांसह नक्षलग्रस्त भागातील जनतेला या योजनेत प्राधान्य देण्यात आले आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार असणाऱ्या बलुतेदारांसाठीही वेगवेगळ्या योजना आहेत. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या परिपोषण आहार भत्त्यात वाढ करण्यात आली असून दिव्यांगांसाठी जाहीर करण्यात आलेली 'घरकूल' योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे. वंचित-उपेक्षितांसाठी असलेल्या अनेक योजनांच्या अनुदानात ६०० रुपयांवरून १२०० रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे.

## सामाजिक न्याय

इतर मागासवर्गीयांसाठी देखील या अर्थसंकल्पात अनेक तरतुदी आहेत. धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न न्यायालयात प्रलंबित असल्याने न्यायालयात सकारात्मक प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्याचबरोबर आदिवासींना लागू असलेल्या २२ योजना धनगर समाजाला लागू करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला असून त्यासाठी एक हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या निर्णयामुळे आदिवासींच्या अर्थसंकल्पीय तरतुदीत कोणतीही कपात न करता धनगर समाजाला न्याय देण्याचा आमचा शब्द आम्ही पूर्ण केला आहे.

## कोतवाल



- कोतवालांच्या मानधनात ५० टक्क्यांपेक्षा अधिक वाढ. ५० वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्यांच्या मानधनात तिप्पट वाढ. आरोग्य, अपघात व निवृत्तिवेतनाच्या योजना लागू. महसूल विभागाच्या 'गट ड'च्या पदभरतीमध्ये ४० टक्के पदे कोतवालांसाठी राखीव

## आरोग्य



- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राज्यातील ८३ शासकीय रुग्णालयात लागू.
- प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेत १३०० उपचार तर महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेत ९७१ उपचार.

## दिव्यांग



- ८० टक्के दिव्यांग असलेल्या व्यक्तींना शासन घरकूल बांधून देणार. १०० कोटी रुपयांची तरतूद.



# अधिकतेकडून उत्तमतेकडे...

गेल्या पाच वर्षात शासनाने अनेक महत्त्वाकांक्षी योजना आखल्या. निर्णय घेतले आणि त्यांची तत्परतेने अंमलबजावणी केली. त्यासाठी निधीची कमतरता पडू दिली नाही. नियमांत सुलभता आणली. कागदपत्रांमधील क्लिष्टता कमी केली. योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता राहावी, यासाठी लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम देण्यात आली. त्यामुळे राज्यातील सर्वच भागातील सर्वसामान्य व्यक्ती, विद्यार्थी, शेतकरी, महिला, कामगार या सर्व घटकांना वेगवेगळ्या योजनांचा लाभ मिळून त्यांना जगण्याची नवी उमेद प्राप्त झाली आहे. अशाच काही लाभार्थ्यांच्या यशकथा. शासनाच्या योजना या परिवर्तनाच्या नव्या वाटा कशा दाखवतात हे सिद्ध करणाऱ्या आहेत. या यशकथांमुळे इतरांना प्रेरणा मिळून तेसुद्धा याच मार्गाने जाऊन स्वत:च्या आयुष्याला सक्षम आणि समर्थ करू शकतात.

# शेतकऱ्यांच्या हितासाठी

## शेततळ्याची किमया

प्रत्येक शेतकरी हा आपले शेतशिवार जिवापाड जपतो. त्यासाठी रात्रंदिवस मशागत करतो. स्वत: कुटुंबासह राबतो. परंतु निसर्गाने अवकृपा दाखवली की, त्याचाही नाइलाज होतो. मात्र, प्रतिकूल परिस्थितीत शासकीय योजनांचा लाभ घेऊन परिस्थितीवर विजय मिळवण्याची किमया काहीजण साधतात. अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील तांभेरे येथील रोहिदास भिकाजी मुसमाडे आणि त्यांचे कुटुंबीय हे त्यापैकीच एक. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर झालेल्या शेततळ्याच्या माध्यमातून मुसमाडे कुटुंबीयांचे शिवार फुलले आहे.



**शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे, उन्नत शेती समृद्ध शेतकरी, प्रधानमंत्री पीक विमा योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना अशा विविध योजना राबवल्या आहेत. या योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी प्रगती साधली आहे.**



**अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील तांभेरे येथील रोहिदास भिकाजी मुसमाड यांचे शेततळे**



मुसमाडे कुटुंबीय एकत्रितपणे राहतात. गोकुळदास हे सर्वात मोठे. त्यानंतर दादासाहेब, मग रोहिदास आणि सर्वांत धाकटे नवनाथ. चौघे भाऊ मिळून शेती करतात. उपजीविका शेतीवरच असल्याने ती अधिकाधिक फायदेशीर होईल, यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रोहिदास यांना २०१७-१८ मध्ये ३० x ३० x ३० मीटर आकाराचे शेततळे मंजूर झाले. मुसमाडे कुटुंबीयांनी शेततळ्याची व्याप्ती वाढवली, त्यासाठी अधिकचा भार सोसला. त्यामुळे शेततळ्यांत पाण्याची साठवणूक वाढली. यंदाच्या दुष्काळात हेच

पाणी त्यांच्या शेतीचे जीवन बनले आहे, आसपासची ओसाड रानं पाहताना या शेततळ्यांच्या पाण्यावर फुलणारी डाळींब बाग वेगळी ठरते. रोजगार हमी योजनेतून फळबाग लागवड योजनेंतर्गत त्यांना लाभ मिळाल्याने त्यांनी डाळिंबाची लागवड केली. पहिल्या वर्षी रोपे वाढवणे व जगवण्यावर मेहनत घेतली. दुसऱ्या वर्षी एक लाख रुपयांचे उत्पादन घेतले. आता तिसऱ्या वर्षी बागेची अधिक निगा घेत असल्याने हे उत्पन्न वाढेल, असा त्यांना विश्वास आहे. तीन एकरांमध्ये त्यांनी ही बाग फुलवलीय. जवळपास अकराशे रोपे त्यांनी लावली आहेत.

उत्कृष्ट नियोजन, कुटुंबातील प्रत्येकाची साथ आणि शेतात राबण्यासाठी मिळणारा हातभार यामुळे शासकीय योजनेचा लाभ घेत मुसमाडे कुटुंबीय आर्थिकदृष्ट्या संपन्न होत आहे.

'योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक असते. कृषी विभागाकडून ते मिळाले. त्यामुळे आम्हांला पाठबळ मिळाले,' अशी भावना रोहिदास आणि त्यांचे ज्येष्ठ बंधू गोकुळदास बोलून दाखवतात. शेततळ्यांतील पाण्याचा जपून वापर करण्यासाठी त्यांनी शेतात ठिबक सिंचन वापर केला आहे. पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा जपून वापर होईल, हे पाहिले आहे.

मुसमाडे कुटुंबीयांनी योजना जाणून घेतली. कष्टाने परिस्थिती बदलता येते हे दाखवून दिले. कृषी विभागाने २ लाख ५१ हजार रुपयांची शेततळ्यासाठी मदत केली. त्यांनी त्यात स्वत:ची भर टाकत शेततळ्याचा विस्तार केला.

कृषी विकासाच्या योजनांचा लाभ घेण्यात हे गाव आघाडीवर आहे. विविध योजनांचा लाभ घेत आर्थिक पाया बळकट करणारी कुटुंब येथे दिसतील. आर्थिक सुबत्तेबरोबर त्यांनी मुलाबाळांना उच्च शिक्षण दिले. हा सगळा कृषी विकासाच्या योजनांचा परिणाम आहे.

**– दीपक चव्हाण,**
प्र. जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर

## सुबत्तेचे पाणी

बिरसा मुंडा कृषी सिंचन योजनेच्या माध्यमातून विहीर मिळाल्याने खडकी (ता. बवापूर, जि. नंदुरबार) येथील सविता सुभाष गावीत या महिलेने कोरडवाहू शेतात पॉलीहाऊस उभारले आहे. त्यातून सिमला मिर्चीचे उत्पादन त्यांनी या वर्षी घेतले. त्यासाठी कृषी विभागाकडून ७ लाखांचे अनुदान त्यांना मिळाले. उत्पादनात भर पडण्याबरोबरच घरात आर्थिक सुबत्ता आली आहे.



**बिरसा मुंडा कृषी सिंचन योजनेतून सविता गावीत यांनी बांधलेली विहीर व सोलर युनिट**

सविता यांच्याकडे तीन एकर क्षेत्र आहे. गेल्या वर्षापर्यंत ज्वारी, सोयाबीन असे पारंपरिक उत्पादन घेत असताना केवळ घरापुरते अन्नधान्य मिळत असे. उत्पन्न कधी ५० हजारांवर गेले नाही. मात्र बिरसा मुंडा कृषी सिंचन योजनेची माहिती मिळाल्यावर त्यांनी शेतात विहीर घेतली.

त्यासाठी अडीच लाखाचे अनुदान मिळाले. ठिबक सिंचनासाठी १ लाख ३४ हजार तर इलेक्ट्रिक पंप आणि ऑईल इंजिनसाठी २० हजार रुपयांचे अनुदान मिळाले. ३० हजार रुपयातून पाइपलाईन तयार करण्यात आली. शेताला पाणी उपलब्ध झाल्याने आता दोन किंवा तीन पिके वर्षाला घेणे शक्य झाले. त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढले. विहिरीवर सेस फंडातून सोलर युनिटही बसवल्याने वीज नसताना शेताच्या कामात बाधा येत नाही.

नवापूरच्या आदिवासी भागात या योजनेंतर्गत अनेक विहिरी तयार झाल्याने तालुक्यातील पीक पद्धतीमध्ये लक्षणीय बदल झाला आहे. गेल्या दोन वर्षात २६४ शेतकऱ्यांनी नव्या विहिरी बांधल्या तर ५१ शेतकऱ्यांच्या विहिरींची दुरुस्ती करण्यात आली आहे. शेतकऱ्यांसाठी ही योजना फलदायी ठरली आहे.

**– डॉ. किरण मोघे**
जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार

## बारमाही उत्पादन

यवतमाळ जिल्ह्यातील मुरमाड पडीक जमिनीला काळी कसदार करून बारमाही उत्पादन घेण्याची किमया महागाव तालुक्यातील कावरवाडी (इजारा) येथील शेतकरी शिवशंकर मारोती वाटोळे यांनी केली आहे. पारंपरिक शेतीला फाटा देऊन त्यांनी शेतात फळवर्गीय आणि भाजीपाल्याची लागवड केली आहे. त्यांनी शेतात विहीर पुनर्भरणाचा प्रयोग केला आहे. त्यामुळे आवश्यक असणारे पाणी झाडांना मिळत असून उर्वरित सर्व पाणी पुन्हा विहिरीत जमा होत आहे. परिणामी



**शिवशंकर मारोती वाटोळे यांनी शेतात विहीर पुनर्भरणाचा केलेला यशस्वी प्रयत्न.**

बारमाही पाणी आणि बारमाही उत्पादन यातून शक्य झाले आहे.

कावरवाडी (इजारा) येथे त्याची १३ एकर शेती आहे. मूळचा पुसद तालुक्यातील सेलूवाडी येथील रहिवासी असलेल्या श्री. वाटोळे यांनी२०११ मध्ये कावरवाडी येथे शेती विकत घेतली. संपूर्ण मुरमाड, पडीक असे चित्र होते. या जमिनीलाच काळी कसदार करण्याचा त्याने चंग बांधला. त्यासाठी त्याने काळी माती जमिनीवर टाकून समतल केले. बांध काढून संपूर्ण जमिनीचा उतार ज्या भागात एकत्र येतो तेथे विहीर खोदली. पहिल्या वर्षी विहिरीला पाणी लागले नाही म्हणून शेतात बोअर केली. यातून हिरवाईचे स्वप्न दृष्टिक्षेपास पडू लागले. वैशिष्ट्य म्हणजे बोअर आणि विहिरीच्या माध्यमातून जेवढे पाणी शेतीला आवश्यक आहे, तेवढे घेतल्यानंतर उर्वरित सर्व पाणी पुन्हा विहिरीत जमा होत आहे. त्यामुळे दुष्काळाच्या परिस्थितीतही विहीर पुनर्भरणामुळे त्यांची शेती बारमाही बहरत आहे.

त्यांनी पाच एकरामध्ये कृषी विभागाने दोन लक्ष रुपये अनुदान देऊन ठिबक सिंचनाचा लाभ दिला आहे. त्यांनी फळबाग लागवडीची संकल्पना कृषी विभागाकडून समजून घेतली. स्वत:च्या मेहनतीवर संपूर्ण शेतीत सिंचनाची सोय उपलब्ध केली. त्यांच्या शेतात दीड एकरात केळीची झाडे आहेत. एका एकरमध्ये पेरुची तसेच पपई आणि ऊससुद्धा शेतात लावला आहे. आलेल्या पैशातून पुन्हा शेतीमध्येच गुंतवणूक करण्याला हे कुटुंब प्राधान्य देत आहे. ■

## विश्वासातून कायापालट

यवतमाळ तालुक्यातील कापरा येथील अब्दुल कलीम शेख मेहबूब या शेतकऱ्याला रोजगार हमी योजनेतून सिंचन विहिरीचा आधार मिळाला. पाण्याच्या उपलब्धतेमुळे बारा एकर शेती फुलली. स्वत:च्या मालकीची तीन एकर पडीक ते आता बारा एकर ओलिताची शेती असा प्रवास केवळ सिंचन विहिरीमुळे झाला, असे मेहबूब यांनी सांगितले.

मेहबूब हे सावर येथील रहिवासी असून त्यांची कापरा गावच्या हद्दीत तीन एकर शेती आहे. ही शेती पडीक जमिनीवर असल्यामुळे सर्व काही वरच्या पावसावरच अवलंबून होते. दरवर्षी हीच परिस्थिती. त्यामुळे त्यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत अहिल्यादेवी वैयक्तिक सिंचन विहिरीसाठी अर्ज केला. त्यानुसार त्यांना सिंचन विहिरीचा लाभ देण्यात आला. तीन लक्ष रुपये खर्च करून शासनाच्या अनुदानातून केवळ चार महिन्यात त्यांची विहीर बांधून पूर्ण झाली.

जिल्ह्यात पाऊस कमी पडला असला तरी त्यांच्या विहिरीला ७ ते ८ फुट पाणी आहे. पाण्याच्या या उपलब्धतेमुळे त्यांनी आपल्या तीन एकर सोबतच आजूबाजूची ९ एकर शेती करायला घेतली. सुरुवातीला स्वत:च्या मालकीची तीन एकर शेती करणेसुद्धा त्यांना अवघड होते. सध्या ते बारा एकरांवर ओलिताची शेती करतात. सोयाबीन, तूर, हरभरा त्यांनी लावला असून भाजीपाला लावण्याचे त्यांचे नियोजन आहे. स्वत:च्या तीन एकरांमधून दीड लक्ष रुपये आणि भाड्याने करीत असलेल्या शेतीतूनसुद्धा दीड लाख असे तीन लाख रुपयांचे उत्पादन हाती येईल, असे ते विश्वासाने सांगतात. या विहिरीमुळे आमच्या जीवनात कायापालट झाला, असे त्यांनी सांगितले.

**– राजेश येसनकर**
जिल्हा माहिती अधिकारी, यवतमाळ ■



**यवतमाळ तालुक्यातील कापरा येथील अब्दुल कलीम शेख मेहबूब यांची सिंचन विहीर**

## आता मुबलकता

अनियमित आणि अपुरा पडणारा पाऊस ही राज्यातील पाणीटंचाईच्या दृष्टीने मागील काही वर्षातली मोठी समस्या ठरली आहे. याही वर्षी अनियमित पाऊस पडल्याने पावसाचे सरासरी प्रमाण चांगले असलेल्या पालघरसारख्या जिल्ह्यातदेखील या वर्षी पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. जव्हार आणि मोखाडा तालुक्याच्या परिसरात शेतीबरोबरच पिण्याच्या पाण्याचीदेखील टंचाई निर्माण झाल्याने शासनाने टंचाई परिस्थिती जाहीर करून रोजगार



**महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत जव्हार तालुक्यातील वाळवंडा येथील बंधाऱ्यातून गाळ काढताना नागरिक.**

हमी योजनेच्या माध्यमातून रहिवाशांच्या हाताला काम आणि पाणी साठवण्यासाठीची सोय निर्माण केली आहे.

जव्हार तालुक्यातील वाळवंडा ग्रामपंचायत अंतर्गत फणसपाडा जाळीची पातळी येथील बंधाऱ्यातून गाळ काढण्याच्या कामामुळे परिसरातील मजुरांच्या हाताला काम मिळाले आहे. या ग्रामपंचायतीमध्ये एकूण जॉब कार्डधारक कुटुंबांची संख्या ४२३ असून मजुरांची संख्या १४६९ इतकी आहे. यापैकी सक्रिय जॉब कार्डधारक संख्या ३५० आणि ५१९ सक्रिय मजूर आहेत. वाळवंडा ग्रामपंचायतीमध्ये मागील चार वर्षात ८२ हजार ९०१ मनुष्यदिन निर्मिती झाली आहे.

सध्या सुरू असलेल्या कामावर एकूण १३ लाख ८५ हजार ८५६ रूपये खर्च अपेक्षित असून यास २०१९-२० या वर्षात तांत्रिक आणि प्रशासकीय मान्यता दिली आहे. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत सुरू असलेल्या या कामांच्या अंदाजपत्रकानुसार ७८०० घनमीटर गाळ काढणे प्रस्तावित असून हजेरीपटाच्या या कालावधीत १९७४ घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. प्रस्तावित केल्याप्रमाणे काम पूर्ण झाल्यानंतर या बंधाऱ्यात ३० टीसीएम पाणी साठा होणार आहे. यामुळे साधारण ३.१५ हेक्टर जमीन ओलिताखाली येईल. तसेच या परिसरातील पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांच्या पातळीत वाढ होणे अपेक्षित आहे. त्याचबरोबर परिसरातील जनावरांनादेखील पिण्यासाठी पाणी उपलब्ध होणार आहे.

येथील नालातीरावरील शेतकरी मोठ्या प्रमाणावर आंबा, काजू आणि मोगरा लागवड करतात, त्यांना आपल्या पिकांसाठी पुरेसे पाणी उपलब्ध होणार आहे. यामुळे दुष्काळी परिस्थितीत हाताला काम मिळण्याबरोबरच पिण्यासाठी आणि शेतीसाठी देखील पाणी उपलब्ध झाल्याने या कामाचा दुहेरी लाभ होऊन रहिवाशांचे जीवनमान सुधारण्यास मोठी मदत होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील टंचाईग्रस्त भागातील सरपंचांशी ऑडिओ ब्रिजच्या माध्यमातून नुकताच संवाद साधला. यानंतर पालघरच्या पालक सचिव मनीषा वर्मा यांनीदेखील जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागातील सुरू असलेल्या कामांची पाहणी करताना वाळवंडा येथे भेट दिली. येथील कामाची सविस्तर माहिती घेऊन त्यांनी सरपंच आणि गावकऱ्यांशी संवाद साधला.

### आभार

वाळवंडा ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती गुलाब विष्णू वैजल यांनी या कामाविषयी समाधान व्यक्त केले आहे. दुष्काळी परिस्थितीत खूप मोलाचे असे हे काम सुरू केल्याबद्दल शासनाचे आभार मानले आहेत. या कामामुळे सध्या रोजगार उपलब्ध होत असून बंधाऱ्यातील पाणी दैनंदिन गरजा आणि शेतीबरोबरच जनावरांसाठी देखील उपलब्ध होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**– ब्रिजकिशोर झंवर,**
प्र. जिल्हा माहिती अधिकारी, पालघर

# समृद्धीच्या फळबागा...

## नव्या दिशेची प्रेरणा

बदलते हवामान, पावसाचा अनियमितपणा, कमी कालावधीत पडणारा तीव्र पाऊस, तापमानवाढ या सर्व चक्रात शेती अडकली आहे. मेहनत करण्याची इच्छा व क्षमता असली, तरी शेतकरी बदलत्या हवामानामुळे हतबल झाला आहे. त्यामध्ये ही पारंपरिक पिकांची शेती, तर न परवडणारीच. अशा परिस्थितीत पारंपरिक पिकांऐवजी शेतकरी फळपिकांकडे वळत आहेत. फळबाग लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध फळपिकांनुसार अनुदान देणारी, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना राज्य शासनाने सुरू केली आहे. योजनेच्या माध्यमातून बरेच शेतकरी फळबाग लागवड करत आहेत.



बुलडाणा शहरात वास्तव्यास असलेल्या प्रणवकुमार सुरेशकांत काळवाघे यांनी कोलारा, (ता. चिखली) येथील शेतात दीड एकर क्षेत्रावर ६ बाय ६ मीटर अंतरामध्ये १६६ पेरू फळझाडांची लागवड केली आहे. संपूर्ण ठिबक सिंचन पद्धतीद्वारे पेरू फळबाग फुलवली आहे. ठिबक सिंचन संचाला त्यांना अनुदान मिळाले आहे. पारंपरिक पिकांना फाटा देत त्यांनी पेरू फळपिकाची लागवड करून शेतकऱ्यांना फळपिकांकडे वळण्याची प्रेरणा दिली आहे.

महाडीबीटी (डायरेक्ट बेनेफिट ट्रान्सफर) पद्धतीमुळे अनुदानाची रक्कम त्यांच्या थेट बँक खात्यात जमा झाली आहे. त्यामुळे त्यांना अनुदानासाठी जास्त काळ प्रतीक्षा करावी लागली नाही. त्यांना त्यांच्या कुटुंबाची उत्तम साथ मिळत आहे. बागेला वेळोवेळी नियमित पाणी देणे, आंतरमशागत करणे, कीड रोखण्यासाठी उपाययोजना करणे, निघालेल्या पेरूंची व्यापाऱ्यांकडे विक्री करणे, मजुरांचे व्यवस्थापन करणे आदी सर्व कामे मजुरांच्या मदतीने ते करत असतात.

**बरेच शेतकरी पारंपरिक पिकांपेक्षा फळबाग लागवड आणि फुलशेतीकडे वळले आहेत. या शेतीसाठी त्यांना शासनाकडून विविध प्रकारे साहाय्य केले जाते. या साहाय्याद्वारे शेतकऱ्यांना उत्तमरीत्या फळशेती आणि फुलशेती करणे शक्य झाले आहे. या शेतीतून त्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे.**



प्रणवकुमार काळवाघे

श्री. काळवाघे यांच्याकडे १.२२ हेक्टर शेती आहे. त्यापैकी ०.६० हेक्टर क्षेत्रावर, लखनौ ४९ जातीच्या पेरू फळपिकाची लागवड केली. ही लागवड नोव्हेंबर २०१८ मध्ये भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतून करण्यात आली. लागवड झालेल्या झाडांची संख्या १६६ असून त्यांना ३७ हजार ३५२ रुपये अनुदान प्राप्त होणार आहे. त्यापैकी २०१८-१९ मध्ये श्री. काळवाघे यांना पेरू फळपिकाच्या पहिल्या वर्षाचे ८ हजार ६०० रूपये अनुदानही प्राप्त झाले. ठिबक सिंचन संच खेरदीपोटी योजनेतून १० हजार ७६ रुपये अनुदान मिळाले. योजनेतून लागवड केलेली १६६ व पूर्वीची २२२ झाडे अशी एकूण ३८८ पेरूची झाडे त्यांच्या बागेत आहेत.

**– एस. के बावस्कर,** जिल्हा माहिती अधिकारी, बुलडाणा

# दहापटीत वाढ

कोकण भागातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी वेगळे उपाय करण्याची आवश्यकता आहे हे लक्षात घेऊन महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड करण्यावर भर देण्यात आला आहे. गेल्या ५ वर्षांच्या कालावधीत कोकणातील या पट्ट्यात विशेषत: रत्नागिरी जिल्ह्यात फळबाग लागवड कार्यक्रम यशस्वी ठरला आहे. रोजगार हमी योजना (नरेगा) अंतर्गत फळबाग लागवड या कार्यक्रमास २०११ साली सुरुवात झाली असली तरी यांचा थेट उत्पन्नवाढीसाठी उपयोग होऊ शकतो या भूमिकेतून याची अंमलबजावणी प्रभावीपणाने करण्याचे काम गेल्या ५ वर्षांमध्ये झालेले दिसते.

रत्नागिरी जिल्हा हापूस आंब्यासाठी प्रसिद्ध. जिल्ह्यात मुख्य पीक भाताचे घेतले जाते. परंतु यातून भरपूर उत्पन्न मिळणे शक्य होत नाही अशा स्थितीत शेतकरी मोठ्या प्रमाणावर हापूसकडे उत्पन्नाचे पीक म्हणून बघतात. हापूस व्यतिरिक्त नारळ, सुपारी आणि काजू यांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेणे शक्य आहे, हे लक्षात घेऊन फळबाग योजनेत या उत्पादनासाठी आवश्यक असणारी रोपे आणि कलमे उपलब्ध करून देणे, त्यानंतर याचा गावनिहाय नियोजनाचा आराखडा करून पंचायत समित्या आणि कृषी विभागामार्फत लागवड करणे व त्याला बाजारपेठ उपलब्ध करून देणे, या कामांना एकाच वेळी सुरुवात करण्यात आली.

२०१५-२०१६ च्या हंगामापासून याला गती देण्यात आली त्यावर्षी फळबाग लागवडीचे एकूण क्षेत्र २००२ हेक्टर इतके होते त्यात वर्षागणिक वाढ होताना दिसते. २०१७-२०१८ मध्ये या लागवड योजनेला मोहिमेचे स्वरूप देऊन याचा विस्तार करण्यात आला. त्यावर्षी ४९८४.१६ हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड झाली यात सर्वाधित लागवड काजूची करण्यात येत आहे. त्याखालोखाल आंब्याची लागवड असून इतर फळबागाही यात सामील करण्यात आल्या आहेत.

२०१८-२०१९ मध्ये या मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळायला सुरुवात झाली. या वर्षी ५८५०.९७ हेक्टर क्षेत्र फळबाग लागवडीखाली आणले गेले. गेल्या ३ वर्षात जिल्ह्यात १२ हजार ३४ हेक्टर क्षेत्र फळबाग लागवडीखाली आले आहे.





रत्नागिरी जिल्ह्यात रोजगार हमी योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात फळबाग लागवड होत आहे.

चालू वर्षासाठी याअंतर्गत ११ हजार ७२५ हेक्टर क्षेत्रावर फळबाग मोहीम राबवण्यात येत आहे. यात प्रत्येक ग्रामपंचायत ५ हेक्टर अशा एकूण ८४५ ग्रामपंचायती आणि कृषी विभागांतर्गत असणारे कृषी साहाय्यक प्रत्येक २५ हेक्टर या प्रमाणे ७५०० हेक्टर असे एकूण उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

यात अधिकाधिक जणांचा सहभाग मिळावा यासाठी फळबाग लागवडीसाठी पुढाकार घेणाऱ्या लाभार्थ्यांना सातबारा आणि नमुना ८ अ मोफत देण्यात यावा असा विशेष निर्णय जिल्हाधिकारी सुनील चव्हाण यांनी घेतला. लागवड करणाऱ्यांनी लागवडीचे संरक्षण व्हावे यासाठी काटेरी कुंपण घातल्यास अनुदान देणे तसेच रासयनिक खतासोबत शेणखत आणि गांडूळ खत वापरल्यास अनुदान देणे आदी प्रोत्साहनपर बाबींची जोड याला देण्यात आली.

जिल्ह्यात दापोली उपविभाग ३७०० हेक्टर, चिपळूण ५००० हेक्टर आणि रत्नागिरी उपविभाग ४२०० हेक्टर या पद्धतीने नियोजन करण्यात आले. मुख्यत्वे काजू आणि आंबा लागवडीवर भर देण्यात आला असला तरी नारळ, चिकू, सुपारी, कोकम, काळीमिरी आणि पेरू यांचीही रोपे व कलमे उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

या लागवडीत उद्दिष्टाखेरीज इतर इच्छुकांनादेखील लागवड करता यावी यासाठी शासकीय पातळीवर ४ लाखांहून अधिक रोपे आणि कलमे यांची उपलब्धता करून देण्यात आली आहे.

पावसामुळे वेगाने होणारी जमिनीची धूप कमी करण्यासोबत वृक्ष आच्छादनाचा विस्तार आणि यातून उत्पन्नवाढीची संधी असणारी ही फळबाग लागवड मोहीम लोकप्रिय होत आहे. २ हजार हेक्टर पासून झालेली सुरुवात आता दहापटीने वाढताना दिसत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्न वाढीचे साधन ठरणारी ही पर्यावरणपूरक फळबाग लागवड मोहीम येणाऱ्या काळात मोठा आर्थिक फायदा करून देणारी मोहीम ठरणार आहे.

**- प्रशांत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी, रत्नागिरी





# फुलशेती

## डेहनोली

भातशेतीचा कंटाळा आला असताना दुसरा काही तरी व्यवसाय करावा या दृष्टीने ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील डेहनोली येथील भगवान मोतीराम घोरड यांनी आत्मा अंतर्गत शेतकरी प्रशिक्षण घेतले. श्री.घोरड हे ठाणे येथे पार्किंगचा व्यवसाय करत होते. परंतु काही कारणास्तव हा व्यवसाय अडचणीत आल्याने त्यांना शेती करावी लागली. या प्रशिक्षण कार्यक्रमातून त्यांना हरितगृह शेती व उच्च तंत्रज्ञावर आधारित शेती कशी करायची या विषयावर मार्गदर्शन मिळाले. त्यांनी त्या प्रशिक्षणाच्या आधारे ०. २० गुंठ्यात हरितगृह उभारले. ही शेती करत असताना त्यांना फूलशेतीमधून चांगले उत्पन्न मिळत नसे. त्यानंतर आत्मा यंत्रणेमार्फत यावर उपाय म्हणून श्री समर्थ फूलशेती शेतकरी गट स्थापना केला. सर्व तालुक्यातील फूल उत्पादन शेतकरी यांची फुले एकत्र करून कल्याण मार्केट व मुरबाड येथे थेट ग्राहकांपर्यंत विक्री करू लागले. बघता बघता लाखो रुपयांची उलाढाल होऊ लागली. कृषी क्षेत्रातील कामाची दखल घेऊन आत्मा अंर्तगत प्रगतिशील शेतकरी पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. तसेच कृषी क्षेत्रातील अग्रगण्य संस्था कृषी थोन यांनी भगवानला कोकण विभागातून युवा शेतकरी सन्मान २०१८ देऊन सन्मानित केले.

## पिंपळपाडा

ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यामधील पिंपळपाडा येथील शिवराम सांडे यांनी राष्ट्रीय कृषी विकास योजनतून पॉलीहाऊस उभारणी केली आहे. त्या पॉलीहाऊसमध्ये जरबेरा फुलझाडांची लागवड करून ते उत्पन्न घेत आहेत. पूर्वी भातशेती करत होते. परंतु त्यातून काहीच उत्पन्न मिळत नव्हते. त्यानंतर २०१७-१८ पासून कृषी विभागामार्फत २० गुंठे क्षेत्रात पॉलीहाऊस मध्ये जरबेरा फुलांची लागवड केली. त्याकरिता ४० लाख रुपये ऐवढा खर्च आला. कृषी विभागाकडून १७.२४ लाख अनुदान मिळाले. या पॉलीहाऊससाठी लागणारे पाणी कूपनलिकेच्या साहाय्याने घेतले. पॉलीहाऊस मधील तापमान नियंत्रणासाठी फॉग्गस ही यंत्रणा वापरली. साधारण रोपाची लागवड केल्यापासून अंदाजे १०० दिवसात फुले येण्यास सुरवात झाली. एक दिवसाआड साधारण तीन हजार फुले तयार होतात. ही फुले कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्रीस पाठवली जाते. प्रत्येक फुलामागे २ ते २.५० रुपये दर मिळतो.

**जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे**

# कमी पाण्यात अधिक उत्पादन

वाशिम जिल्ह्यातील मानोरा तालुक्यातील साखरडोह येथील अनिता दिनेश भोयर यांच्या नावे पाच एकर शेती आहे. बाजूनेच अरुणावती नदी वाहत असल्याने विहिरीला पुरेसे पाणी असते.



अनिता दिनेश भुयार यांनी शेडनेट अंतर्गत घेतलेले पीक

आतापर्यंत सोयाबीन, तूर, हरभरा हीच पारंपरिक पिके घेण्याकडे त्यांचा कल होता. त्यातून वर्षाला सरासरी चार लाख उत्पन्न मिळत असे. त्यांना शेडनेटविषयी माहिती मिळाली. त्यांनी २०१७–१८ मध्ये राष्ट्रीय कृषी विकास कार्यक्रमांतर्गत त्यांनी शेडनेटचा लाभ घेण्यासाठी अर्ज केला. याच वर्षी त्यांना शेडनेट मंजूर झाले. २०१८ च्या फेब्रुवारीमध्ये शेडनेटची उभारणी झाली. यानंतर मात्र त्यांनी पीक पद्धतीत बदल करून केवळ २० गुंठे जमिनीवर लाखो रुपयांचे उत्पन्न घेण्यास सुरुवात केली.

श्रीमती भोयर यांनी सर्वप्रथम शिमला मिरचीची लागवड केली. बारामती येथे कृषी प्रदर्शनात त्यांना शिमला मिरचीच्या लागवडीबाबत मार्गदर्शन मिळाले होते. बारामती येथील कृषी विज्ञान केंद्रातून शिमला मिरचीची पाच हजार रोपे आणून त्याची शेडनेटमध्ये लागवड केली. याकरिता त्यांना १५ हजार रुपये खर्च आला. खत व इतर खर्च २५ हजार रुपये आला. दीड महिन्यात शिमला मिरचीचे उत्पादन सुरू झाले. अमरावती व जबलपूर येथील बाजारपेठेत शिमला मिरची विक्री होऊ लागली. जवळपास ८५ ते ९० क्विंटल मिरचीची विक्री झाली. प्रतिकिलो ४० ते ६० रुपये दर मिळाला. तीन महिन्यात सुमारे ३ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले.

शिमला मिरचीच्या पिकानंतर त्यांनी काकडीची लागवड केली. याकरिता त्यांना ४४ हजार रुपये खर्च आला. ४५ दिवसांत काकडीचे उत्पादन सुरू झाले. अमरावती व मंगरूळपीर येथील बाजारपेठेत काकडी विक्रीसाठी पाठवण्यात आली. काकडीचे एकूण २२५ क्विंटल उत्पादन मिळाले, त्याला सरासरी २० ते २५ रुपये प्रतिकिलोचा दर मिळाला. एकूण खर्च वजा जाता ३ लाख ५० हजार रुपयांचा निव्वळ नफा मिळाला. त्यानंतर श्रीमती भोयर यांनी पुन्हा शिमला मिरचीची लागवड केली आहे.

शेडनेटचा फायदा सांगताना त्या सांगतात की, पारंपरिक शेतीच्या तुलनेत शेडनेटमधील शेती अधिक फायदेशीर आहे. एका वर्षात पाच एकरांमध्ये निघणाऱ्या उत्पन्नापेक्षा दुप्पट उत्पन्न केवळ २० गुंठ्यात मिळत आहे. शिवाय पाणीही कमी लागते. शेडनेटमधील पिकावर किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता कमी असते, त्यामुळे कीटकनाशकावरील खर्चही कमी येतो. साखरडोह येथील शेतकरी पूर्वी पारंपरिक शेती करीत होते. मात्र या गावात श्रीमती भोयर यांच्यासह चंद्रकांत राठोड, राजेश नेमाने, युवराज कांबळे, रमेश पखाले, गुलाब भोयर, महादेव भगत, कैलास जयस्वाल, दिनेश भोयर, गणेश भोयर, गजानन भोसले आदी शेतकऱ्यांनी शेडनेटची उभारणी करून आधुनिक शेतीला सुरुवात केली आहे. शेडनेटमुळे उत्पन्नात वाढ झाल्याचे हे शेतकरी सांगतात. कमी पाण्यात आणि कमी जमिनीवर अधिक उत्पादन मिळते. तसेच किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यताही कमी असतो.

**– विवेक खडसे,**
जिल्हा माहिती अधिकारी, वाशिम



# खर्चात बचत

रायगड जिल्ह्यातील मुरुड तालुक्यातील भोईघर येथील नेत्रा समीर महागावकर यांची शेती म्हणजे प्रचलित प्रवाहाविरुद्ध जाऊन केलेल्या व निसर्गास अनुकूल असणाऱ्या सेंद्रीय शेतीचा वास्तूपाठ म्हटला पाहिजे. सुमारे सात एकर क्षेत्रावर सुपारी आणि भात पिकाचे यशस्वी उत्पादन घेत त्यांनी ही बाब सिद्ध केली आहे. कृषी विभागाच्या आत्मा प्रकल्पांतर्गत भोईघरच्या शेतकऱ्यांनी पतंजली हा सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा गट स्थापन केला. तेव्हापासून महागावकर परिवाराने शेतीचे सेंद्रियीकरण करण्याचा प्रयत्न सुरू केला. डोंगराच्या सान्निध्यात असलेली महागावकरांची वाडी ही निसर्गाच्या कोंदणात शोभून दिसते. या वाडीचं वैशिष्ट्य म्हणजे ही या परिसरातील एकमेव संपूर्णपणे ठिबक सिंचनाखाली असलेली वाडी आहे. या वाडीत मुख्य पीक हे सुपारीचे घेतले जाते. सेंद्रिय शेतीचा संपूर्ण अवलंब करीत त्यांनी ही वाडी जोपासली आहे. बांधावर केलेली गिरिपुष्प लागवड, वाडीत पडणारा झाडांचा पालापाचोळा व सुपारीच्या विऱ्यांचे कडबाकुट्टी यंत्रात कुट्टी करून ती कुट्टी झाडांना आच्छादन (मल्चिंग) म्हणून टाकण्यात येते. गिरिपुष्प पालाही टाकण्यात येतो. त्यामुळे हा कचरा तेथेच कुजून त्याचे खत झाडाला मिळते. याशिवाय वाडीतील अन्य केरकचरा, पाला पाचोळा, गवत यापासून येथे गांडूळ खत प्रकल्पही तयार करण्यात आला आहे. हा प्रकल्प वाडीचा कस वाढवण्यास महत्त्वाचा ठरला आहे. सुपारीच्या बागेत जीवामृत आणि वेस्ट डी कंपोस्ट उत्तर प्रदेश गाजीयाबाद या दोन द्रावणांचा वापर करून आच्छादन केलेल्या कचरा कुट्टीवर टाकतात. त्यामुळे कचरा लवकर कुजण्यास मदत होते. या जीवामृतासाठी गोमूत्र आणि गांडूळखतासाठी शेण मिळावे म्हणून खास एक देशी गिर गाय त्यांनी पाळली आहे. सुपारीची बाग ही आंतरपिकांमुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरते. येथे त्यांनी अननस, हळद, वेलची, जायफळ, मिरी यासारखी मसाल्याची व फळपिके घेतली आहेत. उर्वरित क्षेत्रात आता भात पीक सगुणा बाग लागवड पद्धतीने लावले. त्यामुळे उत्पादन खर्चात व लागवडीच्या वेळेत बचत झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

आत्मा प्रकल्पामार्फत त्यांना कडबाकुट्टी यंत्रे, गांडूळखत प्रकल्प, गिरिपुष्प लागवड, जीवामृत, वेस्ट डी कंपोस्ट तयार करण्यासाठी तांत्रिक प्रशिक्षण, मार्गदर्शन व अनुदानही मिळाले आहे. आधुनिक पद्धतीचा वापर केल्याने सुपारीची गुणवत्ता वाढली आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, रायगड**

# उन्नत शेती...

## उत्पादकता वाढली

खरीप हंगामातील कापूस हे प्रमुख पीक. कापसाची अंतिम वेचणी झाल्यानंतर शेतातील उभी पऱ्हाटी उपडून काढल्याशिवाय पुढील मशागत शक्य होत नाही. पारंपरिक पद्धतीने मजुरांच्या साहाय्याने पऱ्हाटी काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च होत असून त्यानंतर सरपण म्हणून वापरण्याचा प्रघात आहे. शासनाने उज्ज्वला योजनेच्या माध्यमातून आता स्वयंपाकासाठी सर्वच गावात गॅसची सुविधा उपलब्ध केली आहे. पर्यावरणाचे प्रदूषण टाळण्यासाठी सरपण म्हणून पऱ्हाटी जाळण्याचे प्रमाणसुद्धा कमी झाले असल्यामुळे यापासून सेंद्रिय खत तयार करण्याचा पर्याय उपलब्ध झाला आहे.

उन्नत शेती, समृद्ध शेतकरी या मोहिमेंतर्गत कृषी यांत्रिकीकरणासाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या. कळमेश्वर तालुक्यातील भडांगी या गावचे शेतकरी नंदकिशोर जाचक यांनी याअंतर्गत कापूस श्रेडर मशिन हे यंत्र पन्नास टक्के अनुदानावर खरेदी केले. शेतातील कापूस वेचणी झाल्यानंतर पऱ्हाटी न जाळता श्रेडरच्या माध्यमातून काढून त्यापासून सेंद्रिय खत तयार करण्याला

**शासनाने उन्नत शेती, समृद्ध शेतकरी या मोहिमेंतर्गत कृषी यांत्रिकीकरणासाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या अंतर्गत अनेक शेतकऱ्यांना शेतीसाठी उपयुक्त असणारी आधुनिक अवजारे व यंत्रे मिळाली आहेत. शेतीचे उत्पन्न आणि उत्पादन वाढीस झाला आहे.**



सुरुवात केली. यामुळे केवळ वेळेचीच बचत झाली नाही तर मजुरीवर होणारा खर्चसुद्धा वाचला.

या अभियानातून शक्तीमान मेक कापूस श्रेडर मशिनसाठी ८२ हजार रुपये अनुदान मिळाल्यामुळे एक लक्ष सत्तर हजार रुपयांचे यंत्र खरेदी करणे सहज शक्य झाले. या यंत्रामुळे शेतातील उभ्या पऱ्हाटीचे मुळासकट बारीक तुकडे होऊन त्याचा चुरा जमिनीत चांगल्याप्रकारे मिसळल्या जात असल्यामुळे शेतात कंपोस्ट खताचे प्रमाण वाढले. त्यामुळे शेतीला रासायनिक खताची गरज राहिली नसून जमिनीची उत्पादकता वाढली आहे. या यंत्रामुळे उत्पादनसुद्धा दुप्पट झाले. स्वत:च्या शेतीव्यतिरिक्त इतर शेतकऱ्यांनाही हे यंत्र उपलब्ध करून देत असल्यामुळे स्वयंरोजगाराच्या माध्यमातून आर्थिक उत्पन्नाचे नवे साधन उपलब्ध झाले. इतरांच्या शेतीवर यंत्र वापरताना आठशे रुपये प्रतितास याप्रमाणे कापूस श्रेडिंगचे कामे मिळाली आहेत.

या मशिनमुळे परंपरागत पद्धतीने पऱ्हाटी शेतात जाळली जात होती. त्यामुळे पुढील हंगामात घेण्यात येणाऱ्या पिकाची उत्पादन क्षमता कमी होत होती. त्यासोबतच आगीची झळ इतत्र पसरण्याची भीती कायम राहत होती. ही भीती आता दूर झाली आहे.

कृषी यांत्रिकीकरणांतर्गत सुरू केलेल्या विविध योजनांचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहचला असल्यामुळे उत्पादनवाढीला प्रोत्साहन मिळत आहे. सेंद्रिय खताच्या वापरातून मजुरीवरील खर्च वाचविणे, वेळेची बचत त्यासोबत कापूस पिकांच्या अवशेषाचा शेतामधील सेंद्रिय कार्बनचे प्रमाण वाढवण्यासाठी उन्नत शेती, समृद्ध शेतकरी मोहीम यशस्वी ठरत आहे.

**अनिल गडेकर**

## अडचणीवर मात

पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील आळंदी म्हातोबा हे रस्ते वाहतुकीने जिल्ह्यातील सर्व प्रमुख रस्त्यांनी जोडले गेलेले गाव. येथील शेतकरी पारंपरिक पद्धतीने गहू, ज्वारी, फळभाज्या आणि पालेभाज्या अशी पिके घेतात. सध्या हवामानात सातत्याने बदल जाणवतो. हवामानातील चढउताराचा परिणाम शेतीमधील उत्पन्नावर होतो. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. त्याचप्रमाणे शेतीच्या कामासाठी मजूर मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. शेतमजुरांशिवाय शेती करणे शक्य नसल्याने, येथील चंद्रकांत तुकाराम जवळकर यांनी कृषी सहायकाच्या मार्गदर्शनाने, नांगर यंत्रासाठी अनुदान



**चंद्रकांत जवळकर यांना 'उन्नत शेती समृद्ध शेतकरी' योजनेंतर्गत नांगर यंत्र मिळाले.**

मिळावा यासाठी अर्ज केला. उन्नत शेती, समृद्ध शेतकरी या योजनेंतर्गत त्यांना नांगरासाठी आर्थिक अनुदान मिळेल याबाबत कृषी विभागाकडून मार्गदर्शन करण्यात आले. त्यांना या योजनेतून ३५ हजार रुपये किंमत असलेले नांगर मंजूर करण्यात आले. रुपये १४ हजार एवढे अनुदान मंजूर झाले. अनुदान थेट बँक खात्यामध्ये जमा झाले.

नांगरणी तसेच शेतीची इतर कामे करणे नांगरामुळे शक्य झाले. यासाठी आवश्यक शेतमजुरांची गरज पडली नाही शेती उत्पन्नात वाढ झाली.

**जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

## रोजगार मिळाला

शासनाच्या उन्नत शेती समृद्ध शेतकरी योजनेतून जळगाव जिल्ह्यातील काकोडा (ता.मुक्ताईनगर) शेतकरी शांताराम निकजी चोपडे यांनी बालाजी गृहउद्योग संचलित स्वतःची मिनी डाळ मिल सुरु केली. नेहमीची आर्थिक चणचण दूर होण्याबरोबरच त्यांच्यामुळे इतर तीन मजुरांनाही काम मिळाले आहे.

चोपडे यांनी शेतीसोबतच काही कृषी पूरक उद्योग असावा याकरिता काकोडा येथे मिनी डाळ मिल सुरू करण्यासाठी कृषी तंत्रज्ञान व व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा)कडे अर्ज दाखल केला. डाळ मिल सुरू करण्यासाठी २०१७-२०१८ मध्ये त्यांना 'आत्मा'कडून ४० हजारांचे अनुदान मिळाले. यासाठी त्यांना 'आत्मा'च्या अधिकाऱ्यांनी सहकार्य केले.

पहिल्या वर्षी खर्च वजा जाता एक लाख रुपये लाभ मिळाला. काकोडा गावाला लागून २७ खेडी आहेत.या भागात कापूस पिकाला आंतरपीक म्हणून मोठ्या प्रमाणात कडधान्य पिकविले जाते. अनेक शेतकरी तूर, उडीद, मूग, हरभरा, धान्यडाळ करण्यासाठी आणतात. त्याची डाळ करून दिली जाते. डाळ तयार करताना धान्याला फक्त सोयाबीन तेल आणि पाणी लावले जाते. समोरच डाळ तयार होत असल्याने तिचा दर्जा चांगला राखता येतो व दरही चांगला मिळत असल्याने शेतकरी समाधानी आहेत.

२०१८-१९ मध्ये याच योजनेतून मिनी डाळ मिलसाठी अनुदान रुपये ८८ हजार ४०० मिळाले. उर्वरित रक्कमेसाठी जळगाव जनता सहकारी बँकेतून कर्ज उपलब्ध झाले.

चोपडेंसह त्यांच्या कुटुंबातील चार लोक व तीन मजूर डाळमिलमध्ये काम करतात. वर्षातील सहा महिने उद्योग चालतो. खर्च वजा जाता वर्षाला दीड ते दोन लाख रुपये उत्पन्न मिळते.

**विलास बोडके**
जिल्हा माहिती अधिकारी जळगाव

## क्षमतेत वाढ




ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील अंदाड येथील विलास गोपाल साबळे हे 'उन्नत शेती समृद्ध शेतकरी', या योजनेचे लाभार्थी आहेत. या योजनेतून त्यांना पॉवर टिलर मिळाला. पारंपरिक शेती करण्यात खर्च अधिक होत होता. उपन्न कमी मिळत होते. परंतु आता त्यांनी शेतात यंत्राचा वापर चालू केला आहे. यंत्रांची काम करण्याची क्षमता जास्त आहे. यामुळे जमीन लागवडीसाठी लागणारा वेळ कमी झाला व खर्चाची बचत झाली.

**जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे**

## दुप्पट उत्पन्न

उन्नत शेती-समृद्ध शेतकरी योजनेचा थेट लाभ शेतकऱ्यांना होत आहे. राष्ट्रीय गळीत धान्य व तेलताड अभियान २०१७-१८ अंतर्गत सोयाबीन पीक घेत नागपूर जिल्ह्यातील नरखेडातील उल्हास चोरघडे यांनी पारंपरिक शेतीला फाटा देत प्रायोगिक शेतीतून दुप्पट उत्पन्न मिळू शकते हे सिद्ध केले आहे.

नागपूर जिल्ह्यात कृषी विभागामार्फत २५ मे ते ८ जून २०१७ दरम्यान पंधरवाडा राबवण्यात आला. कृषी हवामान व जमिनीच्या प्रकारानुसार आवश्यक यंत्र सामुग्री व औजारे पुरवण्यात आली. या प्रकल्पात पिकाची उत्पादकता वाढवण्याच्या दृष्टीने एकूण १० हेक्टरमध्ये गटशेतीचे प्रात्यक्षिक करण्यात आले. त्या प्रात्यक्षिकामध्ये सोयाबीनचे जे. एस. ९५६० या प्रमाणित बियाणांची एका एकर क्षेत्राला उतारावर आडवी पेरणी, झिंक सल्फेट, फेरस सल्फेट, सल्फर कीडनाशक, तणनाशक इत्यादींसाठी प्रशिक्षण देण्यात आले. त्यामध्ये नरखेड येथील उल्हास राधाकृष्ण चोरघडे हा शेतकरी सहभागी



**सोयाबीन पिकाची पाहणी करताना कृषी विभागाचे अधिकारी**

झाला. त्याच्याकडे असलेल्या एक एकर शेतीत पारंपरिक पद्धतीने आणि दुसरे तितक्याच जागेत प्रायोगिक गट शेतीने सोयाबीनचे उत्पादन घेतले. त्याच्याकडे एकूण २.४२ हेक्टर शेती आहे. त्यापैकी त्यांनी दोन एकरात सोयाबीन पेरणी केली. चोरघडे यांनी सुरुवातीला मातीचे नमुने तपासणी केली. त्यानुसार खतांचा वापर केला. गट प्रात्यक्षिकामध्ये त्यांना प्रमाणित जे. एस. ९५६० वाणाच्या बियाण्यांची ४० किलो वजनाची एक बॅग अनुदानावर देण्यात आली. तर पारंपरिक पद्धतीने त्यांनी घरच्या बियाणांची उगवणशक्ती तपासली.

***''माझे ०.८० हेक्टर क्षेत्रापैकी ०.४० हेक्टरमध्ये गट प्रात्यक्षिक राबवले त्यातून मला ९.८० क्विंटल सोयाबीन उत्पादन झाले तर शिल्लक ०.४० हेक्टर क्षेत्रामध्ये ४.६० क्विंटल उत्पादन झाले. कृषी विभागाने राबवलेल्या या प्रकल्पामुळे आम्हा शेतकऱ्यांना पुष्कळ बाबी शिकता आल्या व अनुभवता आल्या व त्यामुळे आमच्या उत्पादनात दुप्पटीने फायदा झाला.''***

***- उल्हास चोरघडे, शेतकरी***

किडीपासून पिकाचे संरक्षण व्हावे, म्हणून पक्ष्यांसाठी थांबे तयार केले. त्यांना प्रायोगिक गटशेतीतून ९ क्विंटल ८० किलो सोयाबीन उतारा आला तर पारंपरिक पद्धतीने सोयाबीन पिकांद्वारे ४ क्विंटल ६० किलोंचा उतारा आला.

**- प्रभाकर बारहाते,** माहिती सहायक, जिल्हा माहिती कार्यालय, नागपूर

## अपंगत्वावर मात

शेतमजूर असलेल्या गणेश मानकर या युवकाने अपंगत्वावर मात करून भातकुली येथे डाळ मिलचा यशस्वी व्यवसाय उभारला आहे. श्री. मानकर हे अमरावती जिल्ह्यातील सायतचे रहिवाशी असून, त्यांच्या कुटुंबात आई-वडलांसह दोन भाऊ आहेत. त्यांचे शिक्षण दहावीपर्यंत झाले आहे. बालपणीच पोलिओमुळे त्यांना अपंगत्व आले. त्यांच्या घरी पाच एकर जमीन आहे. त्यामुळे घरची परिस्थिती साधारण होती. दहावीनंतर ते शेतमजुरी करू लागले. पुढे काही वर्षांनंतर लग्न झाले. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढल्या. त्यामुळे आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी एखादा व्यवसाय करण्याचा त्यांनी निश्चय केला. त्यांच्या पत्नी दीपिका यांनी आपल्या पतीला पूर्ण पाठबळ दिले.

परिसरात तूर, हरबरा, उडीद, मूग आदी कडधान्यांचे मोठे उत्पादन होते.



गणेश मानकर

त्यामुळे श्री.मानकर यांनी भातकुली येथे डाळ मिल उभारण्याचा संकल्प केला. डाळ मिलसाठी आवश्यक यंत्रणेची माहिती त्यांनी जाणून घेतली. या मिलसाठी आवश्यक यंत्रणा सुमारे पावणेचार लाख रूपयांची होती. त्यांनी स्वत:जवळील पैसे आणि काही नातेवाईक व मित्रांची मदत घेतली दरम्यान, त्यांनी शासनाच्या, उन्नत शेती समृद्ध शेतकरी योजनेंतर्गत कृषी सहायकांकडून माहिती मिळाली. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी त्यांनी कृषी कार्यालयाकडे अर्ज केला. कृषी कार्यालयाकडून त्यांचा अर्ज मंजूर करण्यात आला. डाळ मिल खरेदीपोटी त्यांना चाळीस टक्के अनुदान मिळाले. शासनाकडून १ लाख ४० हजार रुपयांचे अनुदान मिळाल्याने गणेश यांची 'रसिका डाळ मिल', भातकुली येथे उभी राहिली. विविध कडधान्यांची डाळ बनवण्याचे काम त्यांनी सुरू केले. धान्यापासून डाळ बनवण्यासाठी विविध प्रक्रिया कराव्या लागतात. धान्य स्वच्छ करणे, धुणे, वाळवणे, दोन-तीन वेळा यंत्रातून काढणे या सगळ्या कामांत श्री.मानकर यांच्यासह त्यांची पत्नी दीपिकाही राबू लागल्या. पुढे धान्यापासून डाळ करून देण्याचे काम वाढत गेले. डाळ मिलचे काम वाढल्यामुळे त्यांनी काही व्यक्तींनाही आपल्या उद्योगात रोजगार मिळवून दिला. फेब्रुवारी ते एप्रिल हा साधारणत: डाळनिर्मितीचा हंगाम असतो. प्रतिदिन सात क्विंटल डाळ निर्मिती त्यांच्या उद्योगातून होऊ लागली आहे. पहिल्या वर्षी त्यांना सव्वा लाख रुपयांहून अधिक निव्वळ उत्पन्न मिळाले. डाळ मिलसह हरभरा डाळ स्वच्छ करण्यासाठी शेलर, ग्रेडर मशिन, पॉलिशर, गहू साफ करण्याचे ग्रेडर मशिनही त्यांनी आणले आहे. दुसऱ्या वर्षी त्यांच्या उत्पन्नात चांगली भर पडली आहे. आता गणेश यांनी शेवया बनवण्याची मशिन आणली आहे. जिद्द, चिकाटी व कष्ट याद्वारे अपंगत्वावरही मात करून यशस्वी व्यवसाय उभारता येतो, हे श्री.मानकर यांनी दाखवून दिले आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती**


# पीक विम्याचा लाभ

शेतकऱ्यांना निसर्गाच्या भरोशावरच शेती करावी लागते. ती जोखमीची असते. मग अशा जोखमेत शासनाने पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे शेतकऱ्यांना वाटतेच. माणसाचा विमा आपण उतरवतो. तसाच पिकाचाही विमा उतरवता येतो. पिकाचे नुकसान झाल्यास भरपाई मिळते. अशाच भरपाईची योजना म्हणजे प्रधानमंत्री पीक विमा योजना. औरंगाबादपासून जवळच असलेल्या खुलताबाद तालुक्यातील गोळेगावातील शेतकरी गंगाधर सूर्यभान आढाव यांना या योजनेचा लाभ मिळाला.

श्री. आढाव यांचे कुटुंब शेतात राहते. त्यांना तीन मुली आहेत. तिघींचेही विवाह झालेत. त्यांनी जून २०१८ च्या सुमारास त्यांच्या तीन एकर शेतात कपाशीचे पीक घेतले. घरासमोरच सामाईक विहिर असल्याने पाणी पुरेल, असा विश्वास त्यांना वाटत होता. मात्र, निसर्गाने साथ दिली नाही. तीन एकरावरील कपाशी लागवडीला आलेला खर्च व उत्पादनात मोठी तफावत जाणवली. परंतु त्यांना तारले आणि आर्थिक स्थैर्य लाभले ते प्रधानमंत्री पीक विमा योजनेमुळे.

## नुकसान भरपाई

दरवर्षी शेतकरी पीक विमा काढतात. मी एकदाही पिकाचा विमा उतरवलेला नव्हता. माझ्या बंधूच्या पत्नीने म्हणजेच माझ्या वहिनीने मला खरीप पिकाचा विमा उतरवण्यासाठी आग्रह धरला. त्यांच्या आग्रहास्तव मी तीन एकर ०५ गुंठे असलेल्या शेतात कापूस या नगदी पिकाची लागवडीची पूर्ण तयारी केली होती. त्याचा विमा उतरवला. विम्याचा हप्ता दोन हजार ३०० रुपये होता. तो मी वेळेवर भरला. निसर्गाने दगा दिला. त्यामुळे उत्पादन घटले. मात्र,विमा उतरवलेला असल्याने तेवढी काळजी नव्हती. नुकसान झाल्यास विम्याची रक्कम मिळणारच, याची मला माहिती होती. कमी उत्पादन झाल्याने मला विमा उतरवल्यामुळे १९ हजार ४०६ रुपयांची नुकसान भरपाई मिळाली, याचा मला आनंद आहेच. इतर शेतकऱ्यांनीही प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ घेऊन वेळेवर पिकाचा विमा उतरायलाच हवा, असे श्री. आढाव यांनी सांगितले.



गंगाधर आढाव

**श्याम टरके,** माहिती सहाय्यक, औरंगाबाद

# जलसमृद्धी

## टेंभूचा आशीर्वाद

टेंभू उपसा सिंचन योजनेसाठी शासनाने भरीव निधी दिला आहे. टेंभू उपसा सिंचन योजनेच्या ४०८८.९४ कोटी रुपये खर्चाला सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली. केंद्र शासनाच्या बळीराजा जलसंजीवनी योजनेमध्ये टेंभूचा समावेश करून त्यासाठी जवळपास १२०० कोटी रुपयांची तरतूद केली. यामुळे दुष्काळाच्या झळा कमी करण्यासाठी व दुष्काळी तालुक्यांची तहान भागवण्यासाठी मोठी मदत झाली.



**दुष्काळी भागाचे नंदनवन करणारी टेंभू उपसा सिंचन योजनेने आशिया खंडातील सर्वात मोठी योजना ठरण्याचा पहिला मान घेतला आहे. केंद्र आणि राज्य शासनाने यास मोठा निधी दिला आहे. या योजनेमुळे सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील हजारो हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्याचे प्रस्तावित आहे.**

### मोठी योजना

दुष्काळी भागाचे नंदनवन करणारी टेंभू उपसा सिंचन योजनेने आशिया खंडातील सर्वात मोठी योजना ठरण्याचा पहिला मान घेतला आहे. या योजनेंतर्गत कराड तालुक्यातील टेंभू येथे कृष्णा नदीवर बराज बांधून कृष्णा नदीतील पाणी एकूण ५ विविध टप्प्यांद्वारे ३०० मी. पर्यंत उचलून सातारा जिल्ह्यामधील ६०० हे., सांगली जिल्ह्यामधील ५९८७२ हे. व सोलापूर जिल्ह्यामधील २०००० हे. अशा एकूण ८०,४७२ हे. क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्याचे प्रस्तावित आहे. तिन्ही जिल्ह्यांपैकी सांगली जिल्ह्यातील जवळजवळ ६० हजार हेक्टर क्षेत्र टेंभू उपसा सिंचन योजनेमध्ये समाविष्ट आहे. यामध्ये कडेगाव, खानापूर, तासगाव, आटपाडी व कवठे महांकाळ हे पाच आली आहे. या योजनेचा वार्षिक पाणी वापर २२ टीएमसी इतका आहे. या योजनेचे पाणी प्रामुख्याने शेतीसाठी असून याचा दुष्काळी परिस्थितीत पिण्यासाठी व जनावरांसाठी लाभ होत आहे.

### उल्लेखनीय

गत चार वर्षांत या योजनेला भरीव निधी मिळाल्यामुळे गती मिळाली आहे. त्यातून उल्लेखनीय





कामगिरी करण्यात आल्या आहेत. टेंभू टप्पा १(अ), १(ब), ३(अ), ३(ब) या ठिकाणी ३० टक्के पंप कार्यान्वित होते, ते आता ९० टक्के कार्यान्वित करण्यात आले आहेत. या योजनेंतर्गत विसापूर–पुणदी योजनेचे तीन टप्पे कार्यान्वित करण्यात आले आहेत. टेंभू टप्पा ४ व ५ कार्यान्वित करण्यात आला आहे. अशा रीतीने टप्पा क्रमांक १ ते ५ ची कामे पूर्ण



झाली असून ही पंपगृहे कार्यान्वित आहेत. टप्पा क्रमांक ५ मधून एप्रिल २०१९ मध्ये अग्रणी नदीवरील ४७ बंधारे पाण्याने भरून घेऊन सिद्धेवाडी तलावात पाणी सोडण्यात आले होते. त्यामुळे उन्हाळ्यात दुष्काळी भागातील व घाटमाथ्यावरील लोकांना पिण्याची पाण्याची सोय झाली.

पालकमंत्री सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सांगली जिल्ह्याचे विद्यमान खासदार तथा कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष संजय पाटील व लाभक्षेत्रातील सर्वच लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत टेंभू उपसा सिंचन योजना पूर्ण होण्याकरिता राज्य शासन तसेच केंद्र शासन स्तरावर वेळोवेळी प्रशासकीय पाठपुरावा सातत्याने केला जात आहे.

### बंदिस्त नलिकेद्वारे वितरण व्यवस्था

टेंभू योजनेची सांगली जिल्ह्यातील एकूण लांबी ३७७ किलोमीटर असून त्यापैकी २८७ किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहे. टेंभू प्रकल्पाचे एकूण पीकक्षेत्र १ लाख ११ हजार ८५६ हेक्टर इतके असून सांगली जिल्ह्यातील क्षेत्र ८३ हजार २२२ हेक्टर आहे. त्यापैकी मार्च २०१९ अखेर २४ हजार ९३७ हेक्टर क्षेत्र निर्माण झालेले आहे. उर्वरित सिंचन क्षेत्रासाठी बंदिस्त नलिकेद्वारे वितरण व्यवस्था प्रस्तावित असून सर्व क्षेत्राचे सर्वेक्षण व अंदाजपत्रक तयार आहे. त्यापैकी ७३ हजार ३७३ हेक्टर क्षेत्रावरील कामे सुरू आहेत. बंदिस्त वितरण प्रणालीतून लाभक्षेत्रातील विकेंद्रित साठ्यात पाणी देऊन तेथून पुढे सूक्ष्म सिंचन विकसित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

### पथदर्शी योजना

टेंभू योजनेचे पाणी आता बंद जलवाहिनीमधून देण्यात येणार आहे. त्याशिवाय ही योजना सौरऊर्जाचलित सिंचन योजना करण्याबाबत अभ्यास सुरू आहे. याशिवाय योजनेच्या लाभक्षेत्रातील बारमाही पिकांसाठी ठिबक किंवा तुषार सिंचन पद्धतीचा वापर अनिवार्य होणार आहे. लाभक्षेत्रात वितरिकानिहाय पाणी वापर संस्था निर्माण करून या संस्थांच्या माध्यमातून समन्यायी पाणी वाटप धोरण राबवण्यात येणार आहे. अशा पद्धतीने टेंभू योजना राज्यात पथदर्शी योजना होणार आहे.

### भूसंपादनात बचत

या प्रकल्पांतर्गत बंदिस्त नलिकेमध्ये पाणी वितरणाचे नियोजन केल्यामुळे

कालव्यासाठी लागणाऱ्या २ हजार हेक्टर भूक्षेत्राचे संपादन करावे लागणार नाही. त्यामुळे भूसंपादनात ४७६ कोटींची बचत होईल. शिवाय हे २ हजार हेक्टर क्षेत्र शेतीसाठी उपयोगात येईल. या योजनेतून तलावात पाणी देण्यात आल्यामुळे पिण्याचे पाणी व चारा निर्मितीसाठी लाभक्षेत्रातील गावांना फार मोठा फायदा होईल. तसेच, शासनाने उपसा सिंचन योजनांसाठी वीजबिलाची ८१ टक्के रक्कम शासन, महामंडळाकडून भरण्याचा निर्णय घेतल्यामुळे या योजनांच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सांगली पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता हणमंत गुणाले म्हणाले, टेंभू उपसा सिंचन योजनेचा समावेश केंद्र शासनाच्या बळीराजा जलसंजीवनी कृषी योजनेमध्ये २०१८ मध्ये केलेला असून प्रकल्प १०० टक्के पूर्ण करण्याचे नियोजन जून २०२० पर्यंत केले आहे. यातून ९६ हजार ३१९ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. यामध्ये उर्वरित मुख्य कालवे, वितरिका, लघू वितरिका यांचा बंदिस्त जलवाहिनी प्रणालीमध्ये समावेश करून कामे प्रगतिपथावर आणली आहेत. मुख्य कालव्याची अस्तरीकरणाची कामे प्रगतिपथावर आहेत. विविध शासकीय विभागांशी समन्वय साधून सर्वसामान्य माणसापर्यंत दुष्काळी व टंचाई परिस्थितीमध्ये पाणी पोहोचवण्याकरिता महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अंतर्गत जलसंपदा विभाग प्रयत्नशील आहे.

### सकारात्मकता

‘आमच्या लग्नाला १८ वर्षे झाली. या कालावधीत मी २ मोठे दुष्काळ पाहिले. २०१३ च्या दुष्काळात टँकरने पाणीपुरवठा करताना अक्षरशः पाणी फीडिंगचे पॉईंट्स शोधावे लागायचे. त्या वेळी आम्ही दुष्काळाच्या झळा सोसल्या आहेत. पण, टेंभू उपसा सिंचन योजनेचे पाणी आटपाडी परिसरात आल्यामुळे आम्हाला खूप मोठा फायदा झाला आहे. पूर्वी आजूबाजूच्या गावात दुष्काळी परिस्थितीत विहिरी कोरड्या पडलेल्या असायच्या. टेंभूच्या पाण्यामुळे आता या विहिरी भरल्या गेल्या आहेत. त्यांची पाणी पातळी स्थिर राहिली आहे. २ वर्षे पाऊस नसतानाही पिण्याच्या पाण्याची सोय व्यवस्थित होत आहे. याचे श्रेय केवळ टेंभू उपसा सिंचन योजनेला जाते.’ आटपाडीच्या सरपंच वृषाली धनंजय पाटील भरभरून बोलत होत्या. त्यांच्यासारखे टेंभू योजनेच्या लाभक्षेत्रातील सांगली जिल्ह्यातील अनेक लाभार्थी अशी सकारात्मक प्रतिक्रिया आनंदाने देताना दिसतात. मग ते बोंबेवाडीचे बाळासो पाटील आणि विठ्ठल विभूते असोत, की गोंदिराचे शहाजी गणपत पाटील असोत....

टेंभू योजनेमुळे दुष्काळाची तीव्रता कमी होण्यास नक्कीच मदत झाली आहे. नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे, यासाठी हे सर्व जण केंद्र व राज्य शासनाने मनापासून आभार व्यक्त करतात. या लाभार्थींच्या प्रतिक्रियेत दुष्काळाचा वर्षानुवर्षे बसलेला शिक्का पुसायला टेंभू उपसा सिंचन योजना वरदान ठरली आहे, हे तीव्रतेने अधोरेखित होते. ताकारी, म्हैसाळ आणि त्यानंतर टेंभू उपसा सिंचन योजना सांगली जिल्ह्यासाठी वरदायिनी ठरल्या आहेत.

**– संप्रदा बीडकर**
माहिती अधिकारी, सांगली

# ‘नर्मदे’तील नील क्रांती!

नर्मदा नदीवरील सरदार सरोवर प्रकल्पाच्या बॅक वॉटरमध्ये सहकारी तत्त्वावर सुरू झालेल्या पिंजरा पद्धतीच्या मत्स्यसंवर्धनाच्या पहिल्या टप्प्यातील उत्पादन घेण्यास खर्डी (ता. धडगाव, जि. नंदुरबार) येथे नुकतीच सुरुवात झाली.

सातपुडा आणि विंध्याचल पर्वताच्या मधून वाहणारी नर्मदा नदी. या नदीवर बांधण्यात आलेल्या सरदार सरोवर या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे बॅक वॉटर थेट भुशा पॉइंटच्या पुढे आले आहे. विस्तीर्ण अशा या बॅक वॉटरच्या माध्यमातून नील क्रांती (मत्स्य उत्पादन) घडून येत आहे.

सरदार सरोवर प्रकल्प आंतरराज्य प्रकल्प असून महाराष्ट्रातील अक्कलकुवा व धडगाव (अक्राणी) तालुक्यातील ३३ गावे, एकूण ६ हजार हेक्टर क्षेत्र बुडित क्षेत्रात येते. राज्याला ७३२७ हेक्टर जलक्षेत्र मासेमारीकरिता उपलब्ध आहे.

केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयांतर्गत स्थापन नर्मदा नियंत्रण प्राधिकरणाच्या बैठकीत सरदार सरोवर प्रकल्पात मत्स्य विकास व मत्स्य संवर्धनाचे काम ३० महिन्यात पूर्ण करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार मत्स्यव्यवसाय विकास विभागाने आराखडा सादर केला. राज्याच्या भौगोलिक कक्षेतील सरदार सरोवराचे मासेमारीचे हक्क मत्स्य व्यवसाय विभागास प्रदान करण्यात आले आहेत. नर्मदा नदीतील पर्यावरण संवर्धनासाठी ‘महाशीर’ या दुर्मीळ गेम फिशिंगचे संवर्धन करण्याचा सल्ला कोलकत्याच्या संस्थेने सर्वेक्षणानंतर दिला. त्यानुसार लोणावळा येथील मत्स्यबीज केंद्रातून बीज आणून ते बॅक



वॉटरमध्ये सोडण्यात आले. या बीजाची चांगली वाढ झाल्याचे दिसून आले आहे. त्यांचे जलाशयात नैसर्गिक प्रजनन सुरू झाले आहे.

सरदार सरोवर प्रकल्पाच्या जलक्षेत्रात मासेमारीचे हक्क मिळाल्यावर मत्स्यव्यवसाय विकास विभागाने आदिवासी बांधवांना मासेमारीसाठी प्रोत्साहन दिले. त्यांना यांत्रिकी, बिगरयांत्रिकी बोटी दळण– वळणासाठी उपलब्ध करून दिल्या. मासे ठेवण्यासाठी शीतपेट्या, नॉयलॉन जाळी उपलब्ध करून दिली. तसेच मणिबेली, चिमलखेडी या अक्कलकुवा तालुक्यातील गावात, तर धडगाव तालुक्यातील चिंचखेडी, खर्डी, शेलगदा या तीन अशा एकूण पाच मच्छीमार सहकारी संस्थांची स्थापना करून दिली. या संस्थांमध्ये एकूण ४५० सदस्य आहेत.

या प्रकल्पाच्या क्षेत्रात मत्स्यबीज सोडून मत्स्य संवर्धन व उत्पादन घेण्याचा निर्णय घेण्यात आला. या मासेमारीसाठी पिंजरा पद्धतीचा वापर करण्यात येतो. या पाचही संस्थांना प्रत्येकी ४५ लाख रुपये किमतीचे पिंजरे तयार करून देण्यात आले. पिंजरा पद्धतीच्या मासेमारीतील तज्ज्ञ व दापोली, जि. रत्नागिरी येथील बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातील मत्स्यशास्त्रज्ञ डॉ. विवेक वर्तक, वर्सोवा येथील केंद्रीय मत्स्य व्यवसाय महाविद्यालयातील पिंजरा पद्धतीच्या मासेमारीतील तज्ज्ञ डॉ. किरण दुबे यांच्या देखरेखीखाली पिंजऱ्यांची उभारणी करण्यात आली.

एकूण ४८ तरंगते पिंजरे उभारण्यात आले. १२ पिंजरे हे नर्सरी म्हणून (मत्स्यबीज संवर्धन), तर ३६ पिंजरे मत्स्यसंवर्धन आणि उत्पादनासाठी वापरण्यात येतात. या पिंजऱ्यांमध्ये 'पँगाशियस' या माशाचे बीज सोडण्यात आले आहे. या माशाला मोठ्या प्रमाणात मागणी असून त्याची व्हिएतनाममधून आयात केली जाते, असे डॉ. वर्तक सांगतात. मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण विभागाचे अजिंक्य पाटील यांनी संस्थेच्या सदस्यांना प्रशिक्षण दिले. सुरवातीला तीन दिवसीय प्रशिक्षण वर्सोवा येथे झाले.

**पिंजरा पद्धतीने नर्मदा नदीच्या पात्रातील मासेमारी**



याशिवाय माशांपासून तयार होणाऱ्या विविध पदार्थांचे प्रशिक्षण व माहिती आदिवासी बांधवांना देण्यात आली. मत्स्यबीज आणि खाद्य बॅक वॉटरपर्यंत आणण्यात मत्स्यव्यवसाय विकास विभागाचे साहाय्यक आयुक्त किरण पाडवी यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

### *जीवनमान उंचावले*

***''नर्मदा नदीवरील सरदार सरोवर प्रकल्पामुळे बाधित ३३ गावातील कुटुंबांच्या विकासासाठी मत्स्यव्यवसाय विकास विभागातर्फे पिंजरा पद्धतीने मासेमारीची सुविधा, सरदार सरोवर प्रकल्पाचे सल्लागार डॉ. अफरोज अहमद यांच्या मार्गदर्शनाखाली उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावण्यास मदत होईल.''***

***– किरण पाडवी, साहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग, नंदुरबार***

सध्या या पिंजऱ्यांमध्ये एक ते सव्वा किलो वजनाचे मासे तयार झाले आहेत. या माशांची जागेवरच विक्री होत असून सरासरी शंभर रुपये किलो दर मिळत आहे. त्यासाठी अक्कलकुवा, शहादा, नंदुरबार येथील खरेदीदार नर्मदा नदीपर्यंत पोहोचत आहेत. पहिल्या वर्षी पिंजरे, मत्स्यबीज, माशांचे खाद्य, प्रशिक्षण पूर्णपणे मोफत देण्यात आले. या पिंजऱ्यांमधून किमान ६० टन माशांचे उत्पादन होईल, असा अंदाज आहे. त्यामुळे आदिवासी बांधव या पैशातून पुढील वर्षाच्या खर्चाचे नियोजन करू शकतील. नर्मदा नदीच्या पात्रात पिंजरा पद्धतीने मासेमारी सुरू झाल्यामुळे आदिवासी बांधवांच्या जीवनात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक परिवर्तन घडून येण्यास मोठी मदत होणार आहे. रोजगारासाठी स्थलांतरामुळे मुलांचे खंडित होणारे शिक्षण आता पूर्ण होऊ शकणार आहे.

**– गोपाळ साळुंखे**
माहिती सहायक, जिल्हा माहिती कार्यालय, धुळे

# शिवारातील अमृत

नांदेड जिल्ह्यातील नायगाव तालुक्यातील धुप्पा येथील शेतकरी माधव रामजी वाघमारे यांना, 'संस्कृती संवर्धन



मंडळ,' (एसएसएम) सगरोळी (ता. देगलूर जि. नांदेड) यांच्या मार्गदर्शनाखाली संकल्प संस्था धुप्पा यांच्यावतीने गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनेतंर्गत लाभ देण्यात आला आहे.

या कामासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने इंधन तर एसएसएम संस्थेने यंत्र उपलब्ध करून दिले.

श्री. वाघमारे यांनी त्यांच्या राहत्या घराशेजारी असलेल्या माळरानावरील खडकाळ २० गुंठे जमिनीवर शंभर ट्रॅक्टरने २८० घ.मी. गाळ टाकून सेंद्रीय पद्धतीने मिरची, टमाटे, वांगे इत्यादी भाजीपाला लागवड केली. या परस बागेसाठी ड्रिपद्वारे सिंचन केले. त्यांच्याकडे दोन गायी आणि दोन म्हशीदेखील आहेत. जनवारांच्या मल-मुत्रापासून जीवामृत मिळवून त्याचा भाजीपाल्यासाठी वापर केला. दर्जेदार जीवामृतामुळे या भाजीपाल्यावर कोणताही रासायनिक खत व औषधी न वापरता कुठल्याच प्रकारच्या कीडीचा प्रादुर्भाव झालेला नाही.

श्री. वाघमारे यांनी त्यांच्या शेतात टाकलेल्या गाळामुळे केवळ २० गुंठे जमिनीत तीन महिन्यात विषमुक्त अशा सेंद्रीय मिरचीचे २५० किलो उत्पादन झाले. त्यांची किंमत रु. ७ हजार ५०० होती, शिवाय अन्य भाजीपाल्याचे उत्पादन वेगळे मिळत आहे.

# असेही घडू शकते...

कंधार तालुक्यातील मौजे पाणशेवडी पाण्याबाबत कायम टंचाई असणारे गाव. पावसाने ओढ दिली, तर खरिपातील मुख्य पिकाला संरक्षित पाणी मिळत नसल्याने उत्पादन घटत असे. गावामध्ये सूक्ष्म सिंचन पद्धतीचा वापर नगण्य असल्यामुळे बागायती क्षेत्र हे ९९ टक्के पाट पाण्यावर अवलंबून असे. पिकांना पाणी पुरेसे न मिळाल्याने होणाऱ्या आर्थिक नुकसानीमुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत असे.

२०१६ – २०१७ मध्ये जलयुक्त शिवार अभियानांतर्गत पाणशेवडी या गावाची निवड करण्यात आली. शिवार फेरीतून गावकऱ्यांनी सलग समतल चर, ढाळीचे बांध, अनघड दगडी बांध, लहान मातीबांध, मातीनालाबांध, शेततळे, जुन्या बंधाऱ्यातील गाळ काढणे, विहीर पुनर्भरण, लोकसहभागातून गाळ काढणे, सूक्ष्म सिंचन व इतर उपचाराची कामे निश्चित करून ती पूर्ण करण्यात आली. या गावात मातीनालाबांधाची एकूण तीन कामे पूर्ण झाली. या कामामुळे पडिक क्षेत्रावरील वेगाने वाहून जाणारे पाणी जमिनीत मुरण्यास मदत झाली, माती वाहून जाण्याचे प्रमाण कमी झाले, ज्या ठिकाणी गवत उगवत नव्हते, त्या ठिकाणी जनावरांना चारा उपलब्ध झाला, 'माथा ते पायथा' पाणलोट उपचारामुळे विहिरीच्या व विंधन विहिरीच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली त्यामुळे खरीप हंगामात पावसाच्या खंडित कालावधीत पिकास संरक्षित पाणी देता आले.

जलयुक्त शिवार अभियानाचा भाग म्हणून उपलब्ध पाण्यापासून शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास करण्याच्या उद्देशाने ठिबक व तुषार सिंचन, महाराष्ट्र कृषी स्पर्धाक्षम प्रकल्पांतर्गत पीक प्रात्याक्षिक, बीजोत्पादन, फळबाग लागवड, शेतकरी गट स्थापना, भाजीपाला, नगदी पिकाची वाढ, दुग्धव्यवसाय, शेळीपालनसारखे पूरक व्यवसाय शेतकरी करू लागले. शेतकऱ्यांच्या दरवर्षी त्यांना एकूण होणाऱ्या उत्पादनापैकी ३० टक्के ते ४० टक्के उत्पादन जास्त मिळत आहे.

# ३० टक्के वाढ

कंधार तालुक्यातील मौजे पाणशेवडी येथील प्रगतशील शेतकरी गंगाधर माधवराव मोरे यांना २०१८ मध्ये 'मागेल त्याला शेततळे' या योजनेतंर्गत शेततळे मंजूर झाले. या शेततळ्यास ५० हजार अनुदान मिळाले. पावसाळ्यामध्ये पर्जन्यमान चांगले झाले आणि शेततळ्यामध्ये १.१३ टीसीएम पाणीसाठा निर्माण झाला. गंगाधररावांनी २०१८-२०१९ च्या खरीप हंगामामध्ये एकूण २.५६ हेक्टर जमिनीपैकी १ हेक्टर क्षेत्रावर कापूस पिकाचे 'अजित १५५' व 'राशी ६५९' या वाणाची लागवड ३ बाय २ फुटांवर केली आणि आंतरपीक म्हणून तूर पिकाची लागवड केली.

त्यांना एकरी ८ क्विंटल उत्पादन मिळाले. आंतरपीक घेतलेल्या पिकाचे उत्पादन २ क्विंटल मिळाले. दर वर्षी त्यांना एकूण होणाऱ्या उत्पादनापैकी ३० टक्के उत्पादन जास्त मिळाले.

**जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड**



# मिशन 'शौर्य'



**चंद्रपूर जिल्ह्यामध्ये आदिवासी विकास विभाग व जिल्हा प्रशासन यांनी राबवलेल्या मिशन शौर्य हा अभिनव उपक्रम यशस्वी झाला. सामाजिक न्याय विभागाने आदिवासी मुलांना दरवर्षी या मिशनसाठी सिद्ध करण्याचे धोरण निश्चित केले आहे.**

## चंद्रपूर

उपजत कलागुणांना संधी मिळाली की आकाश ठेंगणे होते, याचे उदाहरण चंद्रपूर जिल्ह्यातील आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी जगापुढे मांडले आहे. चंद्रपूर व महाराष्ट्राचा झेंडा चंद्रपूरच्या पाच विद्यार्थ्यांनी एव्हरेस्टवर पोहोचवला आहे.

या मिशनसाठी जवळपास वर्षभराची तयारी चंद्रपूर जिल्हा प्रशासनाने केली होती. २०१८ च्या मे महिन्यात मुलांनी हा भीमपराक्रम केला. जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळेतील सक्षम, काटक, सुदृढ ५० विद्यार्थ्यांपैकी दहा विद्यार्थ्यांची निवड एक वर्षाच्या खडतर प्रशिक्षणानंतर करण्यात आली. दहापैकी कविदास काठमोडे, उमाकांत मडावी, परमेश आडे, मनीषा धुर्वे व विकास सोयाम या पाच विद्यार्थ्यांनी एव्हरेस्ट सर केले. आदिवासी विद्यार्थ्यांच्या क्षमतावृद्धीच्या या प्रयोगाला आता राज्यव्यापी अभियानाचे स्वरूप आले आहे. मिशन शौर्य हे आदिवासी मुलांच्या पराक्रमाचे पर्व म्हणून जसे लक्षात राहील तसेच समाजातील मागास घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी नवीन क्षेत्र निवडण्याचा यशस्वी प्रयोग म्हणूनही कायम स्मरणात राहील.

**जिल्हा माहिती कार्यालय, चंद्रपूर**

## पालघर

चिकाटी हे आदिवासी समाजाचे बलस्थान. शासनाने आदिवासी विद्यार्थ्यांमधील हा गुणधर्म ओळखून मिशन शौर्य मोहिमेची आखणी केली. त्याला यशदेखील आले. पालघर जिल्ह्यात वाडा तालुक्यातील देवगावच्या माधवराव काणे अनुदानित आश्रमशाळेतील केतन सीताराम जाधव या विद्यार्थ्याने उंच एव्हरेस्ट शिखर सर केले आहे.



आदिवासी विकास विभागाने हाती घेतलेल्या 'मिशन शौर्य २०१९' या एव्हरेस्ट मोहिमेत केतन जाधव याच्यासह एकूण नऊ आदिवासी विद्यार्थ्यांची निवड झाली होती. विविध ठिकाणी घेतलेल्या खडतर प्रशिक्षणानंतर या चमूने २३ मे रोजी एव्हरेस्ट पादाक्रांत केले.

केतन सीताराम जाधव हा मूळचा जव्हार तालुक्यातील सांबरपाडा येथील रहिवासी. आईवडील फारसे शिकलेले नसल्याने मुलाला शिक्षण द्यायचे असा त्यांचा ध्यास. मोलमजुरी करून घरगाडा चालवताना त्यांनी दहावीनंतर केतनला आश्रमशाळेत ठेवले. शासनाच्या मिशन शौर्य-२ मोहिमेत तो स्वेच्छेने सहभागी झाला.

**जिल्हा माहिती कार्यालय, पालघर**

# स्वतःच्या घराचे सुख

औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील खंडाळा गावात राहणाऱ्या श्रीमती गंगूबाई कारभारी शिंदे यांचे स्वतःच्या घराचे स्वप्न होते. पण तुटपंज्या आर्थिक उत्पन्नात मुलाबाळांचे संगोपन, कौटुंबिक जबाबदारी यामुळे इतक्या वर्षात ते शक्य झाले नाही. काही वर्षांपूर्वी त्यांच्या पतीचे निधन झाले, त्यामुळे तर हे स्वप्न काही प्रत्यक्षात येणार नाही, तर ते फक्त स्वप्नच राहील, या विचाराने त्यांना मनोमन वाईट वाटते. पण एकेदिवशी त्यांच्या धाकट्या मुलाला प्रधानमंत्री आवास योजनेबाबत (ग्रामीण) माहिती मिळाली. पक्क्या घरासाठी शासनाकडून अनुदान मिळू शकते असे, समजले तेव्हा घराचे स्वप्न पूर्ण होण्याची आशा त्यांच्या मनात निर्माण झाली.

***''आमच्यासारख्या खेड्यापाड्यातल्या लोकांसाठी स्वतःचे हक्काचे घर मिळवून देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना खूप फायद्याची आहे.''***

***– श्रीमती गंगूबाई***



**कुटुंबांची आर्थिक–सामाजिक प्रगती समजायची असेल तर, त्याचे घर बघितले जाते. निवाऱ्याच्या स्थितीवरून त्याच्या प्रगतीचा लेखाजोखा काढण्यात येतो. प्रत्येक बेघराला निवारा मिळण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना, केंद्र सरकार मार्फत राबवण्यात येते. या योजनेंतर्गत अनेक गरजुंना हक्काचे घर मिळाले आहे.**



**गंगुबाई शिंदे यांनी प्रधानमंत्री आवास योजनेतून बांधलेले घर**

त्यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयात जाऊन योजनेबाबत चौकशी केली. आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे घेऊन त्यांनी कार्यालयात अर्ज सादर केला. दीड–दोन महिन्यात जेव्हा त्यांच्या बँक खात्यावर १ लाख २० रुपये इतके अनुदान जमा झाल्याचे मुलाने सांगितले. त्या वेळी त्यांना खूप दिलासा मिळाला. लहान मुलाने या पैशात आपल्याजवळची रक्कम टाकून आरसीसीचे घर बांधण्याची कल्पना बोलून दाखवली. अनुदानामुळे हुरूप वाढलेल्या गंगुबाई आणि त्यांच्या मुलांनी घर बांधायला घेतले व सहा सात महिन्यात त्यांचे घर उभे राहिले.

**– वंदना रघुनाथराव थोरात,** माहिती अधिकारी, औरंगाबाद

## झोपडी गेली, घर मिळाले

सुलोचना करमनकर या चंद्रपूर जिल्ह्यातील आरवट गावच्या रहिवासी असून भूमीहीन शेतमजूर म्हणून मजुरीचे काम करतात. त्यांच्या पतीचे दहा वर्षापूर्वी निधन झाले. त्यामुळे मुलासोबतच कवेलूच्या झोपडीतच त्या राहत. परंतु प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत त्यांना १ लाख ४० हजाराचे अनुदान मिळाले व त्यांच्या कुटुंबाला पक्याघराच्या रूपाने कायमस्वरूपी आसरा मिळाला.

**जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर**




## समाधान आणि आनंद

बुलडाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातील वरवट बकाल येथील बस स्थानकाच्या मागे शेतमजुरीचा व्यवसाय करणारे ५३ वर्षीय जुलालसिंग सोळंके कुडाच्या ताट्यांच्या घरात राहत होते. २०१८-१९ मध्ये त्यांना प्रधानमंत्री आवास योजेनतून घर मिळाले. त्यामुळे शिकस्त झालेल्या घराच्या दुरुस्तीची चिंता मिटली. आयुष्याच्या संध्याकाळला येऊन ठेपलेले जुलालसिंग पक्के घरकूल बांधकामाच्या प्रयत्नात होते. मात्र आर्थिक विंवचनेमुळे त्यांना आपला निर्णय बऱ्याचदा बदलावा लागला आहे. पूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह शेतमजुरीवर अवलंबून असलेल्या जुलालसिंग यांच्यापुढे आर्थिक विंवचना विवंचना नेहमीच असायची. २०१८-१९ मध्ये घरकूल लाभार्थी यादीत नाव आले.



**जुलालसिंग सोळंके**

बांधकाम सुरू केले. टप्याटप्प्याने १ लक्ष २० हजार रूपयांचे अनुदान मिळाले. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या मजुरीतून १८ हजार रुपये मिळाले. काही रक्कम स्वत:जवळील टाकली व हक्काचा पक्का निवारा डिसेंबर २०१८ अखेर बांधून पूर्ण झाला. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये हमखास रात्रीला त्यांना झोप येत नव्हती. पाऊस सुरू झाल्यास घराच्या गळतीने अख्खे कुटुंब रात्र जागून काढायचे. घर शेताला लागून असल्यामुळे नेहमी साप, विंचू यांची भीती असायची. आता मात्र प्रधानमंत्री आवास योजनेने ही सर्व त्यांची चिंता दूर केली आहे. त्यांनी घरकुलासोबत शौचालय बांधले.

**जिल्हा माहिती अधिकारी, बुलडाणा**

## भीती सरली!

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) मुळे बुलडाणा जिल्ह्यातील चांडोळ येथील रफीकखा सरदारखा पठाण यांना पक्के घरकूल मिळाले आहे.

कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी श्री. पठाण मजुरी करतात. त्यांना अनेक वेळा आर्थिक संकटाला सामोरे जावे लागले आहे. २०१७-१८ या आर्थिक वर्षात प्रतिक्षा यादीत घरकुलासाठी त्यांचा क्रमांक आला. घराचे बांधकाम सुरू झाले. आधीचे पडके घर पाडून नवीन घरकूल उभारायचे ठरवले. स्वत:जवळचे काही पैसे टाकून बांधकाम सुरू झाले. प्रधानमंत्री आवास योजनेचा पहिला हप्ता मिळाल्यावर. घरकूल पूर्ण होणार असल्याचा विश्वास त्यांना वाटला. बघता बघता तिसरा हप्ता मिळून घरकुलाचे बांधकाम नोव्हेंबर २०१८ मध्ये पूर्ण झाले. अशा प्रकारे एकूण १ लाख २० हजार रुपयांचे अनुदान त्यांना मिळाले. पावसाळ्यात गळक्या छपरांमधून रफीकखा यांच्या कुटुंबाला खूप त्रास सहन करावा लागायचा. जास्त पाऊस झाल्यास दुसऱ्याच्या घरात किंवा नातेवाइकांकडे



**रफीकखा सरदारखा पठाण**

जावे लागायचे. स्वयंपाक करणेसुद्धा कठीण होऊन जायचे. अतिपावसामुळे घराचे काही कमीजास्त झाले, तर कुटुंब उघड्यावर येण्याची भीती होती. मात्र प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) मुळे त्यांची ही भीती दूर झाली आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, बुलडाणा**

## नवा प्रारंभ




दिलीप सपाट हे चंद्रपूर तालुक्यातील आरवट या गावचे रहिवासी आहेत. त्यांचा मुख्य व्यवसाय शेतमजुरीचा असून पत्नी व दोन मुले असे चार जणांचे कुटुंब आहे. मुख्य व्यवसाय शेतमजुरीचा असल्याने घर बांधण्याइतपत त्यांची आर्थिक स्थिती नव्हती. दिलीपचे २० वर्षांपासून घर बांधण्याचे स्वप्न होते. २०१७ पर्यंत त्याच्या कुटुंबाचे आयुष्य झोपडीतच गेले. परंतु प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत त्याला २०१७-१८या वर्षात घरकूल योजनेचा लाभ मिळाला. या योजनेंतर्गत १ लाख ३९ हजार रुपयांचे अनुदान प्राप्त झाले, त्यामुळेच आपण घर बांधू शकलो, अशी प्रांजळ कबुली त्यांनी दिली.

**- प्रवीण टाके,**
जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर

## विश्वास बसत नाही!

भिवंडी तालुक्यातील अकलोली जवळील वस्तीतील सीता माणिक मोरे या राहतात. त्या जवळच्या गावात जाऊन घरकाम करणाऱ्या मध्यमवयीन महिला आहेत. त्या कारवीच्या झोपडीत राहायच्या. या झोपडीची वर्षातून दोन वेळेस तरी डागडुजी करावी लागायची. सागाची पाने, गवत जंगलातून आणून भिंती तसेच छप्पर शाकारावे लागायचे. रानावनात झोपडी असल्याने साप, विंचू याचे भय होते. घरात लहान तीन मुले, सासू असा परिवार. रात्री खूप सावध राहावे लागायचे. सासू आणि सीता दोघी आळीपाळीने जागायच्या. काही सरपटणारे प्राणी, विंचू, इंगळी येत तर नाही ना हे डोळ्यात तेल घालून बघायचे.

दररोजच्या जेवणाची भ्रांत असणाऱ्या दोघींना हक्काचे घर होणार आहे, असे सांगितले तर त्याला त्यांनी वेड्यातच काढले असते. त्यामुळेच प्रधानमंत्री आवास योजना म्हणून एक योजना आहे आणि त्यात घर मिळू शकते असे कळूनही सीताने फारसे लक्ष दिले नाही कारण घरासाठी कमीतकमी किती पैसे लागतात आणि आजन्म ते शक्य नसल्याचे तिला माहिती होते. पण एकदा सरपंच, विस्तार अधिकारी, यांनी सगळ्या ग्रामस्थांना एकत्र केले तेव्हा सीताही काही महिलांबरोबर गेली. प्रत्येकाला घर मिळेल, आणि तुमच्यावर कुठलेही कर्ज होणार नाही हा विश्वास या बैठकीत देण्यात आला.



दुसऱ्याच महिन्यात अंजूरला जाऊन अधिकाऱ्यांनी बँकेत खाते उघडायला लावले आणि मग टप्प्याटप्प्याने बँकेत १ लाख २० हजार रुपये जमा झाले. दरम्यान इतर गावकऱ्यांच्या मदतीने सीताने झोपडीच्या जागी पक्क्या घरासाठी बांधकामाला सुरुवात केली होती. तत्पूर्वी शौचालयासाठी देखील रक्कम मिळाली त्यात त्याचेही बांधकाम झाले होते. सध्या सीताच्या घरात तिला आणि तिच्या लेकरांना शांत झोप लागते.

**जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे**

## पाहुण्यांच्या स्वागताला तयार!

नंदुरबार जिल्ह्यातील वाटवी गावच्या आत्माराम कोकणी यांच्या चेहऱ्यावरचा आनंद त्यांच्याशी बोलताना चटकन जाणवतो. प्रधानमंत्री आवास योजनेतून हक्काचे घर उभे राहिल्याने येत्या पावसाळ्यात समस्यांना सामोरे जावे लागणार नाही याचा त्यांना विशेष आनंद आहे.

श्री.कोकणी हे भूमिहीन शेतमजूर आहेत. दररोज मिळणाऱ्या मजुरीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह सांभाळण्यासाठी त्यांना बरीच कसरत करावी लागते. त्यांचे पूर्वीचे घर कौलारू आणि मातीचे होते. पाऊस आला की गळणारे छत दुरुस्त करताना दमछाक होत असे.

श्री. कोकणी यांच्या पत्नी छाया 'स्वच्छ भारत' अभियानाच्या निगराणी समितीत आहेत. गाव स्वच्छ व्हावे ही त्यांची प्रामाणिक इच्छा. त्यातून त्यांनी ग्रामस्थांचे मनपरिवर्तन करण्यासाठी पुढाकार घेतला. मात्र स्वत:च्या घरीच शौचालय नसल्याची खंत त्यांच्या मनात होती. महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियानाच्या माध्यमातून घरकुलासाठी त्यांची निवड झाली. त्यांना घरासाठी १ लाख २० हजार रुपये मिळाले. घर बांधकामासाठी स्वत: राबल्याने त्यांना रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरीचे १८ हजार रुपये अतिरिक्त मिळाले. त्यातून त्यांचे सुंदर घर उभे राहिले आहे.

घरात मोकळे स्वयंपाकघर असल्याने छायाताई आनंदी आहेत. चांगल्या घरामुळे पाहुण्यांचे उत्तमरीतीने स्वागत करता येईल आणि मुलांना चांगला अभ्यास करता येईल याचा त्यांना आनंद आहे. सिमेंटचे पक्के पत्रे असलेल्या घरात वावरताना वाटणारी



**आत्माराम कोकणी**

सुरक्षितता आणि आनंद या दाम्पत्याच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसतो. मुलांना शिक्षण देण्याची ऊर्मी घरामुळे निर्माण झाल्याचे छायाताई सांगतात. दिवसभर श्रम करून आल्यावर विश्रांतीचे निवांत क्षण या घराने श्री. कोकणी यांना दिले आहेत. वाटवी गावात २४ कुटुंबांना प्रधानमंत्री आवास योजना आणि ११ कुटुंबांना शबरी तर ३ कुटुंबांना रमाई आवास योजनेतून घरकूल मिळाले आहे.

**जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार**

## जीवनमान उंचावले



**बानु महमंद नदाफ (काले, ता. कराड, जि. सातारा)**

काले. ता. कराड येथील बानू महमंद नदाफ यांची आर्थिक परिस्थिती खूप हलाखीची आहे. यांना स्वत:चे घर होते पण ते राहण्यायोग्य नव्हते. घराचा पत्रा जीर्ण व भिंती मातीच्या. जीर्ण पत्र्यांमुळे पावसाळ्यात पाणी घरात गळत असल्याने हाल होत.

***''घरच्या आर्थिक परिस्थतीमुळे पक्क्या व सर्व सुविधायुक्त घराचे स्वप्नही आम्ही कधी पाहिले नव्हते पण प्रधानमंत्री आवास योजनेमुळे माझ्या कुटुंबाला सर्वसुविधांयुक्त चांगले घर मिळाले.''***

***– बानू महमंद नदाफ***

श्रीमती बानू यांचे पती महमंद नदाफ हे ड्रायव्हरचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांना दोन मुले आहेत. कुटुंब मोठे असल्यामुळे घरात राहण्यासाठी पुरेशी जागा नसल्यामुळे कुटुंबाची कुंचबणा व्हायची. या परिस्थितीची माहिती गावचे सरपंच यांना होती. त्यांच्या व ग्रामविकास अधिकारी यांच्या सहकार्याने प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नदाफ यांना २०१६–१७ मध्ये अल्पसंख्याक प्रवर्गातून घरकूल मंजूर झाले. घरकूल बांधणीसाठी एकूण १ लाख ४९ हजार २२० रुपये इतके अनुदान प्राप्त झाले. घरकुल पूर्ण झाले. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या लाभासह स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शौचालय, प्रधानमंत्री उज्वला योजनेंतर्गत गॅस जोडणी, प्रधानमंत्री सौभाग्य योजनेंतर्गत मोफत विद्युत जोडणी प्रस्ताव सादर करून शासनामार्फत देय असलेले संपूर्ण अनुदान बँक खात्यावर ऑनलाइन पद्धतीने वर्ग करण्यात आले आहे. या घरकुलास रस्ता असून पिण्याच्या पाण्याची सोय नदाफ यांनी स्वत:च्या विहिरीवरून केली आहे. सांडपाणी घराशेजारील परसबागेत सोडण्यात आले आहे. चांगल्या घरामुळे नदाफ कुटुंबीयांचे जीवनमान उंचावले आहे.

**– युवराज पाटील,**
जिल्हा माहिती अधिकारी,
सातारा

## अशक्य झाले शक्य

प्रशांत तागडे हे वाशिम जिल्ह्यातील मोखड पिंप्री (ता. कारंजा लाड) येथील रहिवासी. पण या गावात त्यांचे ना हक्काचे घर ना जमीन. त्यांचे आजोबा कधीकाळी या गावात आले. स्वतःच्या मालकीची जमीन नसल्याने त्यांनी गावठाण जमिनीवरच कच्चे घर बांधून निवारा उभारला. शासनाच्या योजनेतून पक्के घरकूल बांधून मिळते, अशी माहिती मिळाल्यावर अनेकदा ग्रामपंचायत, ग्रामसेवक यांच्याकडे विचारणा केली. मात्र घरकूल बांधायला ज्यांना स्वतःच्या मालकीची जागा आहे, त्यांनाच याचा लाभ दिला जातो, असे उत्तर मिळत असे.

राज्य शासनाने १६ फेब्रुवारी २०१८ रोजी सर्वांसाठी घरे–२०२२ या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी निर्णय घेतला आणि प्रशांत व लता यांच्यासारख्यांना मालकीचे पक्के घर उभारण्याचा मार्ग खुला झाला. १ जानेवारी २०११ पर्यंतची निवासी प्रयोजनार्थ शासकीय जागेवरील अतिक्रमणे नियमानुकूल करून त्या जागेची मालकी संबंधित अतिक्रमणधारकाला देण्याचा हा निर्णय होता. त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाला मिळाल्या. त्यानुसार प्रशांत यांचे गावठाण जागेवरील निवासी अतिक्रमण नियमानुकूल करण्याची कार्यवाही गतीने पूर्ण झाली. त्यांचे कच्चे घर गावठाण जमिनीवर ज्या ठिकाणी होते, तेथील ५०० चौरस फूट जागा मिळाली. याबाबतचा आदेश २८ सप्टेंबर २०१८ रोजी पारित झाला आणि प्रशांत यांच्यासाठी पक्क्या घराच्या मार्गातील मुख्य अडथळा दूर झाला. त्यांना प्रधानमंत्री आवास योजनेतून घरकुलाचा लाभ लगेच मंजूर करण्यात आला. जानेवारी २०१९ मध्ये त्यांनी घरकुलाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. शासनाने १ लाख २० हजार रुपये अनुदान दिले. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून घराच्या बांधकामासाठी १८ हजार २०० रुपयांची मजुरी अदा करण्यात आली. प्रशांत यांनी चिकाटीने घरकुलाचे काम पूर्णत्वास आणले आहे.



**प्रशांत तागडे**

**जिल्हा माहिती कार्यालय, वाशिम**

# स्वाधार : शिकणे सुलभ

## आधार



शुभम इंगोले

औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण तालुक्यामधील शुभम इंगोले, बी.एससी शाखेचा प्रथम वर्षाचा विद्यार्थी आहे. विज्ञान शाखेतून पदवी घेऊन पुढे स्पर्धा परीक्षेची तयारी करून अधिकारी होण्याची त्याची इच्छा आहे. त्यासाठी त्याने औरंगाबादचा मिलिंद विज्ञान महाविद्यालय, येथे प्रवेश घेतला. मात्र, त्याला नियमित महाविद्यालयात उपस्थित राहण्यासाठी पैठणवरून औरंगाबाद येथे येणे-जाणे आर्थिकदृष्ट्या शक्य नव्हते. तसेच प्रवासामध्ये त्याचा बराच वेळ आणि शारीरिक मेहनतीचा अपव्यय होत होता. त्यामुळे त्याला औरंगाबादमध्ये राहून शिक्षण पूर्ण करणे आवश्यक होते, मात्र वसतिगृहात जागा उपलब्ध नसल्याने त्याला प्रवेश मिळला नाही. शुभमला पदवी शिक्षण व्यवस्थित पूर्ण करून पुढील उच्च शिक्षण घेण्याची, स्वत:च्या पायावर उभे राहण्याची इच्छा होती. ही इच्छा स्वाधार योजनेमुळे पूर्ण झाली. स्वाधार योजनेंतर्गत त्याच्या बँक खात्यावर प्रत्यक्ष ५० हजार रुपये निधी जमा झाला. या निधीमुळे महाविद्यालय परिसरापासून जवळच असलेल्या भावसिंगपुरा येथील भागात खोली घेऊन राहणे शक्य झाले.

## समस्या मिटली

रघुनाथ धनराज, हा वरुड वाघाच गाव, या भोकरदन तालुक्यातील विद्यार्थी आहे. बी.एड शिक्षणासाठी त्याने औरंगाबाद येथील खासगी बी.एड महाविद्यालयात प्रवेश घेतला. मात्र, त्या ठिकाणी त्याच्या राहण्याची व्यवस्था झाली नाही. घरची आर्थिक परिस्थिती जेमतेम असल्याने रघुनाथला गावात राहून महाविद्यालयात नियमित येणे परवडणारे नव्हते. त्यामुळे ज्या वेळी त्याच्या महाविद्यालयात बार्टीच्या समतादूतांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेबाबत माहिती दिली ती ऐकून त्याला आपल्या राहण्याच्या प्रश्नावर उपाय मिळाल्याचे वाटले.

बी.एडच्या द्वितीय वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करत असलेल्या रघुनाथ धनराज याला प्रथम २५ हजार रुपये पहिल्या टप्प्यात तर दुसऱ्या टप्प्यात २५ हजार पाचशे रुपये इतका निधी मिळाला. या पैशामुळे त्याला जयभवानी नगर, औरंगाबाद येथे भाड्याने खोली घेऊन राहणे शक्य झाले.

**जिल्हा माहिती कार्यालय, औरंगाबाद**

## निवारा मिळाला



प्रशिक बंडू मानके

प्रशिक बंडू मानके हा चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभुर्णा तालुक्यातील सेल्लुर नागटेडी या गावचा. सध्या चंद्रपूर येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयात एम. ए. प्रथम वर्षाचे शिक्षण घेत आहे. त्याने शासनाच्या समाज कल्याण विभागाच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेतला आहे. त्याच्या घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे. त्याचे आई-वडील शेतमजुरीचे काम करतात. उच्चशिक्षण घेण्यासाठी त्याला आर्थिक अडचण निर्माण झाली. परंतु स्वाधार योजनेचा लाभ मिळाल्यामुळे चंद्रपूरसारख्या शहराच्या ठिकाणी खोली करून शिक्षण घेण्यास सुलभ झाले.

**जिल्हा माहिती अधिकारी, चंद्रपूर**



**इयत्ता ११ वी , १२ वी आणि त्या नंतरच्या व्यावसायिक, तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश मिळालेल्या, परंतु कोणत्याही शासकीय किंवा महाविद्यालयाच्या वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेद्वारा अर्थसाहाय्य दिले जाते. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास आणि इतर शैक्षणिक सुविधांसाठी थेट अनुदान उपलब्ध करून देणारी ही योजना २०१६-१७ पासून सामाजिक न्याय विभागामार्फत राबवण्यात येत आहे.**

### अशी आहे योजना

- विद्यार्थ्यांना दहावी, बारावी, पदवी किंवा पदविका परीक्षेत ६० टक्क्यांपेक्षा जास्त गुण असणे अनिवार्य आहे.
- दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ही मर्यादा ५० टक्के गुण आहे.
- विद्यार्थ्यांच्या पालकाचे उत्पन्न २ लाख ५० हजारपेक्षा जास्त नसावे.
- विद्यार्थी बाहेरगावी शिकणारा असावा, स्थानिक विद्यार्थ्यास या योजनेचा लाभ मिळत नाही.
- गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते.
- विद्यार्थी व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न निर्वाह भत्ता योजनेचा लाभ घेत असल्यास त्या विद्यार्थ्यास या योजनेचा लाभ मिळणार नाही.
- विद्यार्थ्यांनी आपले बँक खाते आधारकार्डशी संलग्न करून घेणे बंधनकारक आहे.
- सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहात वास्तव्यास असलेल्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू नाही.
- भोजन भत्ता (वार्षिक),निवास भत्ता (वार्षिक),निर्वाह भत्ता (वार्षिक) अशा विविध भत्त्यांच्या रूपात विद्यार्थ्यांना नियमानुसार एकत्रित रक्कम अदा करण्यात येते.

## ध्येयपूर्तीची दिशा



अजिंक्य घुसळे

स्वाधार योजने'मुळे मालेगाव येथील अजिंक्य घुसळे यांना आपले नाशिकमधील नर्सिंगचे प्रशिक्षण पूर्ण करणे शक्य झाले आहे. प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पूर्ण करण्यासाठी ही योजना त्याच्यासाठी आधार ठरली आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, नाशिक**

## नवी वाटचाल

जळगाव जिल्ह्यातील ममुराबाद, ता. जि. जळगाव येथील अत्यंत गरीब कुटुंबातील तेजस्विनी सदाशिव आरखे या विद्यार्थिनीने उच्च शिक्षण घेऊन सामाजिक कार्य करण्याचे उराशी बाळगलेले स्वप्न 'स्वाधार' योजनेमुळे पूर्ण होण्यास साहाय्य झाले आहे. तिचे वडील मजुरी करून कुटुंबाचे पालनपोषण करीत होते. तेजस्विनीचे महाविद्यालयीन शिक्षण सुरू असतानाच वडिलांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. अशा परिस्थितीमध्ये उदरनिर्वाहासाठी सुट्टीच्या दिवशी शेतात काम करून तिने जळगाव येथील लोकसेवक मधुकरराव चौधरी महाविद्यालयातून सामाजिक कार्य विषयाची पदवी प्राप्त केली. पुढील शिक्षणासाठी पैशांची अडचण होती. मात्र तिला महाविद्यालयात समाजकल्याण अधिकाऱ्यांमार्फ शासनाच्या 'स्वाधार' योजनेबाबत माहिती मिळाली. या योजनेचा लाभ घेऊन ती सामाजिक कार्य या विषयात पदव्युत्तर पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करू शकली.



**तेजस्विनी सदाशिव आरखे**

**जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव**

## इच्छापूर्ती

वाशिम तालुक्यातील तोंडगाव या मोठी शैक्षणिक परंपरा लाभलेल्या गावातील भगवान ढोले या तरुणाला गावातील इतर युवकांप्रमाणे उच्च शिक्षण घेण्याची इच्छा होती. पण घरची परिस्थिती जेमतेम. त्याही परिस्थितीत त्याने डी.एड. केले. पुढे त्याला सामाजिक कार्य विषयात उच्च शिक्षण घ्यावयाचे होते. पण आर्थिक विवंचनेमुळे हे शिक्षण पूर्ण घेता येणार नाही, अशी त्याला खात्री पटली. मात्र स्वाधार योजनेने त्याला आधार दिला आणि तो त्याच्या मनासारखे उच्च शिक्षण घेऊ शकला.



**भगवान ढोले**

**जिल्हा माहिती अधिकारी, वाशिम**

## आता पुढेच जायचे!

राज्य शासन अनेक कल्याणकारी योजना राबवते. त्याची नियोजनबद्ध प्रचार-प्रसिद्धी करण्यात येते. त्यातीलच महत्त्वाचा भाग म्हणजे होर्डिंग (जाहिरात फलक) वरील जाहिराती. या होर्डिंगवरील जाहिरातीवर स्वाधार योजनेचा मजकूर झळकला. या जाहिरातीने अकोला जिल्ह्यातील दहीगाव गावंडे येथील जतीन इंगळेचे लक्ष वेधले. जतीनने स्वत: तर लाभ घेतलाच शिवाय बहिणीलाही लाभ मिळवून दिला. जतीन सध्या पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला येथे बी.एस्सी (उद्यान) या शाखेत तर त्याची बहीण पूनम इंगळे ही बी.एस्सीचे (कॉम्प्युटर सायन्स) शिक्षण घेत आहे.



**जतीन इंगळे**

**जिल्हा माहिती कार्यालय, अकोला**

# कौशल्यातून रोजगाराकडे



**तरुणांच्या हाताला काम मिळवून देण्यासाठी त्यांना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. असे प्रशिक्षण मिळाल्यानंतर रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या विविध संधी मिळणे सुलभ जाते.**

## ग्राफिक डिझायनर



आकाश कोकाटे

नाशिक जिल्ह्यातील वणी येथील आकाश कोकाटे या तरुणाने कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत वेब डिझायनिंग ॲण्ड प्रिंट पब्लिशिंग असिस्टंटचे मोफत कौशल्य प्रशिक्षण घेतले. या माध्यमातून वणी येथील मातोश्री आर्टस् मध्ये ग्राफिक्स डिझायनर म्हणून त्याला रोजगार मिळाला आहे. स्वत:च्या पायावर उभे राहण्याबरोबरच त्याने कुटुंबाची जबाबदारी देखील सांभाळली आहे. आकाशने मुक्त विद्यापीठामार्फत वाणिज्य शाखेची पदवी घेतली आहे. त्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा अभ्यासक्रमदेखील पूर्ण केला आहे. कौशल्य योजनेच्या माध्यमातून घेतलेल्या प्रशिक्षणामुळे मातोश्री आर्टस् मध्ये ग्राफिक्स डिझायनर म्हणून त्याला रोजगार उपलब्ध झाला. आता महिन्याला ६ हजार रुपये मिळूवन तो घरखर्चाला मदत करतो.

**– मोहिनी राणे,** माहिती अधिकारी, शिर्डी

## व्हिडीओ निर्मिती

प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास योजनेंतर्गत विविध क्षेत्रातील कौशल्य विकसित करणारे अभ्यासक्रम शिकवले जातात. उमेदवारांना रोजगार मिळवून देण्याचे कामसुद्धा या योजनेमुळे होत आहे. सोनबरड ता. मोताळा या दुर्गम गावातून आलेला सिद्धार्थ दौलत गायकवाड यालासुद्धा हा अनुभव आला. सिद्धार्थने या योजनेतून माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील ॲनिमेशन व मल्टीमीडियाचे प्रशिक्षण घेतले.

सिद्धार्थला वर्तमानपत्रातून योजनेची माहिती मिळाली. इयत्ता १२ वी विज्ञान शाखेतून उत्तीर्ण झाल्यावर सिद्धार्थने बी.कॉमच्या प्रथम वर्षाला प्रवेश घेतला. बी. कॉम.सोबतच काहीतरी व्यावसायिक अभ्यासक्रम करण्याचा निर्णय घेतला. नोकरीवर अवलंबून न राहता स्वत:चा व्यवसाय उभारण्याचा त्याचा मानस होता.

एक्सलंट कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर, बुलडाणा येथे ॲनिमेशन ॲण्ड मल्टीमीडिया असिस्टंट हा अभ्यासक्रम ऑगस्ट २०१७ ते



**सिद्धार्थ दौलत गायकवाड**

डिसेंबर २०१७ या कालावधीत त्याने पूर्ण केल्यानंतर मिळालेल्या कौशल्याचा उपयोग करीत फेब्रुवारी २०१८ मध्ये त्याने स्वत:चा व्हिडिओ आर्टिस्ट म्हणून बुलडाणा येथे व्यवसाय सुरू केला. मासिक पाच ते आठ हजार रुपयापर्यंत उत्पन्नही तो मिळवत आहे.

– **निलेश तायडे,**
माहिती सहायक, बुलडाणा

## इलेक्ट्रिशियन



**मोहम्मद नासिर मोहम्मद खलिल**

प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत, राज्य कौशल्य विकास सोसायटीतर्फे मिळालेल्या प्रशिक्षणामुळे अमरावतीच्या मोहम्मद नासिर मोहम्मद खलिल या तरुणाला रोजगार मिळून तो आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झाला आहे. नासिरचे दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाले आहे. त्यानंतर कौटुंबिक जबाबदारी असल्याने तो लहानसहान कामे करू लागला. रोजगार मिळवण्यासाठीचे वेगवेगळे पर्याय शोधत होता. नोकरी मिळवण्यापेक्षा स्वयंरोजगार करण्याचा त्याच्या मानस होता. त्याला वीज दुरुस्तीच्या कामाविषयी माहिती होती. त्यामुळे हाच व्यवसाय निवडण्याचा निश्चय त्याने केला. मात्र, अशा व्यवसायात जुजबी ज्ञान उपयोगाचे नाही. त्यासाठी तंत्रशुद्ध ज्ञान मिळवणे आवश्यक होते. तसे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचे शुल्क देणे त्याला परवडणारे नव्हते.

दरम्यान, नासिरने शासनाकडून कौशल्य विकास सोसायटीतर्फे विनामूल्य प्रशिक्षण दिले जात असल्याची माहिती आकाशवाणीवर ऐकली. ही माहिती ऐकून त्याने या योजनेसाठी अर्ज केला. त्याचा अर्ज तत्काळ मंजूर झाला आणि इलेक्ट्रिकल वाईंडर या कोर्ससाठी तो अमरावतीतील स्नेहदीप व्होकेशनल कनिष्ठ महाविद्यालयात दाखल झाला. तीन महिन्यांचा अभ्यासक्रम नासिरने उत्तमरीत्या पूर्ण केला. वीज दुरुस्तीतले तंत्र, धोके व आवश्यक सुरक्षितता याबाबत त्याला परिपूर्ण प्रशिक्षण मिळाले. प्रशिक्षण संपल्यानंतर दोन आठवड्यात नासिरने सर्व प्रकारच्या वीज उपकरणांच्या दुरुस्तीसाठी घरपोच सेवा देणे सुरू केले. कामातील अचूकता, विश्वासार्हता, मेहनत व ग्राहकांना तत्काळ प्रतिसाद देण्याचा गुण यामुळे तो परिसरात एक यशस्वी इलेक्ट्रिशियन बनला. नासिरला दर महिन्याला सुमारे पंधरा हजार रूपये इतकी अर्थप्राप्ती होते. या प्रशिक्षणामुळे त्याला इलेक्ट्रिक फिटिंग, वाईंडिग, विविध उपकरणांची दुरुस्ती ही सगळी कामे करता येतात.

**जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती**

## ब्युटिशियन



अहमदनगर येथील सारिका रामेश्वर सस्कर हिला ब्युटी पार्लरचा व्यवसाय सुरू करण्याची इच्छा होती. कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत तिला या क्षेत्रात ब्युटी पार्लर या व्यवसायाचे प्रशिक्षण घेण्याची संधी मिळाली.

प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर या शिक्षणाचा काहीतरी उपयोग व्हावा, म्हणून आता ब्युटीपार्लर सुरू करावे, असा विचार मनात येऊ लागला. परंतु जागेची कमतरता. अशा वेळी सासू-सासरे आणि पतीने सारिकाला घरातच ब्युटीपार्लर थाटण्याची परवानगी दिली. मग सारिकाने मागे वळून पाहिले नाही. घरच्यांचे बळ मिळाल्याने तिने आत्मविश्वासाने व्यवसाय थाटला. ब्युटी पार्लरच्या प्रशिक्षणाने आणि नंतर ब्युटी पार्लर प्रत्यक्ष सुरू केल्याने घरात आणि बाहेर तिचा मान वाढल्याचे सारिका सांगते. या ब्युटी पार्लरने तिला केवळ आत्मविश्वासच दिला नाही तर आर्थिक आधार दिला. घरबांधकामासाठी घेतलेल्या कर्जातील दीड लाख रुपये आपण ब्युटी पार्लरच्या कामांतून फेडल्याचे ती अभिमानाने सांगते.

**जिल्हा माहिती कार्यालय, अहमदनगर**

## स्वावलंबन

ठाणे जिल्ह्यातील नौपाडा येथील दीपक मिस्तरी याचे शिक्षण १२ वी असल्याने त्याला मनासारखी नोकरी मिळत नव्हती. त्याने जिल्हाधिकारी कौशल्यविकास केंद्र, ठाणे येथे वीजतंत्री या व्यवसाय अभ्यासक्रमास प्रवेश घेतला. प्रवेश घेताना त्याच्याकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क घेण्यात आले नाही. वीजतंत्री या व्यवसायात प्रवेश घेण्याआधी इलेक्ट्रिकलचे कोणत्याही प्रकारचे ज्ञान त्याच्याकडे नव्हते. अभ्यासक्रमानंतर दीपकला खूप मोठा आत्मविश्वास मिळाला. त्याच्या अंगी असणारी हुशारी, कामातील अचूकपणा, त्याची चांगली वर्तणूक याच्या जोरावर त्याला एल ॲण्ड टी सारख्या मोठ्या कंपनीमध्ये नोकरी मिळाली.

**जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे**



**दीपक मिस्तरी**

# आता, ‘आम्ही समर्थ’

## इंजिनिअर ते उद्योजक

अडीच तीन वर्षांपूर्वी पनवेल येथील विद्युत रोहित्र निर्मिती करणाऱ्या कंपनीत २५ हजार रुपये पगारावर टेस्टिंग इंजिनिअर म्हणून काम करणारा अजिंक्य धनंजय गोरे हा वाशिम येथील युवक आज वार्षिक सव्वा कोटी रुपयेपेक्षा अधिक उलाढाल असलेल्या एका कंपनीचा मालक बनला आहे. अजिंक्यने प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत मिळालेल्या अर्थसाहाय्यातून जानेवारी २०१७ मध्ये ‘कोणार्क’ ही विद्युत रोहित्र निर्मिती करणारी कंपनी वाशिम येथे उभी केली. दोन वर्षांनतर या कंपनीने रोहित्र निर्मिती व दुरुस्ती क्षेत्रात चांगलेच नाव कमावले असून वयाच्या २८ व्या वर्षी अजिंक्यला एक यशस्वी उद्योजक बनवले आहे.



यशस्वी उद्योजक होण्यासाठी शासनाच्या विविध योजना कार्यरत आहेत. उद्योग विभागाची बीज भांडवल योजना, जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना, प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना आणि मुद्रा बँक योजनेचा लाभ घेत अनेक तरुणांनी उद्योग उभारले आहेत.

### दिशा मिळाली

२०१४ मध्ये नवी मुंबई येथील लोकमान्य टिळक कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधून इलेक्ट्रिक इंजिनिअरची पदवी पूर्ण केल्यानंतर अजिंक्यने पनवेल येथील एका विद्युत रोहित्र निर्मिती करणाऱ्या कंपनीत नोकरी पत्करली. सुरवातीचे तीन महिने ८ हजार रुपये व त्यानंतर २५ हजार पगारावर त्याने नोकरी केली. विदर्भात नागपूर वगळता इतर कोणत्याही जिल्ह्यात अशा स्वरूपाची कंपनी नव्हती. त्यामुळे वाशिम येथे स्वतःची रोहित्र निर्मिती व दुरुस्तीची छोटीशी कंपनी सुरू करण्याचे अजिंक्यने ठरवले. त्यासाठी आवश्यक भांडवल उभे करण्यासाठी पैशांची जुळवाजुळव सुरू झाली. या वेळी त्याला केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत नवीन उद्योग उभारणीसाठी मिळणाऱ्या अर्थसाहाय्याविषयी माहिती मिळाली. कंपनीसाठी या योजनेचा लाभ घ्यायचा निश्चय करून अजिंक्यने आवश्यक कागदपत्रे, प्रकल्प अहवाल तयार करून सप्टेंबर २०१६ मध्ये या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज सादर केला.



**वाशिम येथील उभारण्यात आलेली ‘कोणार्क’ विद्युत रोहित्र निर्मिती कंपनी.**

ऑक्टोबर २०१७ रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीने अजिंक्यच्या प्रकल्पाविषयी माहिती जाणून घेतली व प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी बँकेला पत्र दिले. स्टेट बँकेने या कार्यक्रमांतर्गत कोणत्याही तारणशिवाय २५ लाख रुपयांचे कर्जस्वरूपातील अर्थसाहाय्य उपलब्ध करून दिले. यामध्ये ५ टक्के लाभार्थी हिस्सा व २५ टक्के अनुदानाचा समावेश होता. जानेवारी २०१७ मध्ये अजिंक्यची 'कोणार्क' ही विद्युत रोहित्र निर्मिती व दुरुस्ती करणारी कंपनी उभी राहिली.

### परवाना मिळाला

रोहित्र निर्मितीसाठी भारतीय मानक ब्युरो अर्थात बीआयएसचा परवाना आवश्यक असतो. हा परवाना मिळवण्यासाठी फेब्रुवारीमध्ये अजिंक्यने 'बीआयएस'कडे याबाबत पत्रव्यवहार केला. मार्च २०१७ मध्ये 'बीआयएस'च्या पथकाने कंपनीची पाहणी करून तपासणीकरिता नमुन्यादाखल एका विद्युत रोहित्राची निर्मिती करण्यास सांगितले. एप्रिलमध्ये 'कोणार्क'चे नमुना (सँपल) विद्युत रोहित्र तयार झाले. हे रोहित्र 'बीआयएस'च्या पथकाने कंपनीत येऊन मोहरबंद (सील) केले व पुढील तपासणीसाठी वडोदरा येथील इलेक्ट्रिकल रिसर्च डेव्हलपमेंट असोसिएशनच्या लॅबमध्ये पाठवण्याची सूचना केली. मे महिन्यात या तपासणीचा अहवाल आला. पहिल्याच प्रयत्नात 'कोणार्क'चे रोहित्र सर्व तपासण्यात उत्तीर्ण झाल्याचे लॅबने कळवले. अखेर जुलै २०१७ मध्ये 'बीआयएस'कडून विद्युत रोहित्र निर्मितीचा परवाना 'कोणार्क' कंपनीला मिळाला. तेथून कंपनीच्या खऱ्या वाटचालीस सुरुवात झाली.

### श्रीगणेशा झाला!

ऑगस्ट २०१७ मध्ये अजिंक्याच्या 'कोणार्क' कंपनीची निर्मिती असलेल्या सात विद्युत रोहीत्रांचा पुरवठा वाशिम जिल्ह्यातील विद्युत ठेकेदाराला करून व्यवसायाचा श्रीगणेशा केला. एका रोहित्र निर्मितीला एक ते सव्वा लाख रुपये खर्च येतो, तर १० ते १५ टक्के नफा मिळतो. मार्च २०१९ पर्यंत 'कोणार्क'ने ८४ विद्युत रोहित्रांची निर्मिती करून त्यांचा पुरवठा वाशिमसह इतर जिल्ह्यातही केला आहे. विदर्भात नागपूर जिल्हा वगळता इतर कोणत्याही जिल्ह्यात विद्युत रोहित्र निर्मिती करणारी कंपनी नाही. 'कोणार्क'च्या माध्यमातून रोहित्र दुरुस्तीची कामे मोठ्या प्रमाणात केली जात आहेत. वाशिम जिल्ह्यासह आजूबाजूच्या चार जिल्ह्यातील महावितरण विभागाकडून रोहित्र दुरुस्तीची कामे 'कोणार्क' कंपनीला मिळाली आहेत. आतापर्यंत ६०० रोहित्रांची दुरुस्ती करून देण्यात आली आहे.

कंपनीची पहिल्या आर्थिक वर्षातील वार्षिक उलाढाल ६७ लाख रुपये होती. अजिंक्यची जिद्द, चिकाटी व मेहनत यामुळे २०१८-१९ मध्ये कंपनीने सव्वाकोटी रुपये उलाढालीचा टप्पा पार केला आहे. अडीच-तीन वर्षांपूर्वी दुसऱ्याच्या कंपनीत काम करणाऱ्या अजिंक्यने आता स्वतःच्या कंपनीत १२ युवकांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. राज्य शासनाने सुरू केलेल्या आयसीडीएस योजनेसाठी आवश्यक छोटे रोहित्र निर्माण करण्याचे अजिंक्य नियोजन करीत आहे. तसेच भविष्यात कंपनीची क्षमता वाढवण्याचाही विचार आहे.

– **तानाजी घोलप,**
माहिती सहायक, जिल्हा
माहिती कार्यालय, वाशिम

## मी मालक

हातात कौशल्य असूनही नोकरी मिळत नाही म्हणून नाउमेद न होता कष्ट करण्याच्या जिद्दीवर मालक बनता येते हे दाखवून दिले आहे जळगाव येथील दर्शन गणेश वानखेडे याने. यासाठी त्याला साथ मिळाली अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची. दर्शनला व्यवसाय सुरू करण्यासाठी बँकेकडून १० लाख रुपयांचे कर्ज मिळाले. महामंडळाकडून दरमहा सरासरी ९ हजार रुपये वैयक्तिक कर्ज व्याज परतावा मिळाल्याने दर्शन एका व्यक्तीला रोजगार देऊन लघुउद्योगाचा मालक बनला आहे.

जळगाव शहरात राहणाऱ्या दर्शनच्या घरची परिस्थिती सर्वसाधारण आहे. अशा परिस्थितीमध्ये त्याने जळगाव येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून फिटरचा अभ्यासक्रम पूर्ण केला. अभ्यासक्रमानंतर रोजगाराचा प्रश्न समोर उभा राहिला. नोकरीसाठी त्याने अनेक प्रयत्नदेखील केले. एकीकडे नोकरी नाही आणि दुसरीकडे कुटुंबाची जबाबदारी अशा अडचणीत सापडला असताना त्याने झेरॉक्स दुकानात काम करण्यास सुरुवात केली.

अंगी कौशल्य असताना दुसऱ्या कामात त्याचे मन रमत नव्हते. प्राप्त केलेल्या कौशल्याचा उपयोग करून घेण्यासाठी त्याने वडिलांच्या मदतीने जाळी बनवण्याचा व्यवसाय सुरू केला. तेवढ्या व्यवसायावर कुटुंबाचे भागणार नव्हते. जाळ्या तयार करताना तो मोठ्या उद्योगाचे स्वप्न पहात असे. त्यासाठी भांडवलाची आवश्यकता होती. अशातच त्याला जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातून वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेसंबंधी माहिती



**दर्शन गणेश वानखेडे संरक्षक जाळीचे काम करताना**

मिळाली.

दर्शनने शासनाच्या या योजनेचा लाभ घेण्याच्या दिशेने पावले उचलली. त्याने जळगाव जनता सहकारी बँकेच्या अधिकाऱ्यांशी कर्जासाठी संपर्क साधला. बँकेने त्याला प्रकल्प अहवाल बनवण्यास सांगितले. प्रकल्प अहवाल व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर त्याला दहा लाखांचे कर्ज मंजूर झाले.

दर्शनकडे संरक्षक जाळी, कांदेचाळीसाठी लागणारी जाळी, शेततळ्यांसाठी लागणारी जाळी, गोट फार्मसाठी लागणारी जाळी, आणि पोल्ट्री फार्मसाठी लागणारी जाळी अशा पाच प्रकारच्या जाळ्यांची मागणी येऊ लागली. मोठ्या प्रमाणात जाळ्या बनवण्यासाठी भांडवलाची असलेली समस्या मिळालेल्या कर्जामुळे दूर झाली. उत्साह वाढल्याने दर्शनने उत्पादन वाढवण्यावर भर दिला.

त्याने महामंडळाच्या पोर्टलवर बँकेचे कर्ज मंजुरीचे पत्र अपलोड केल्यानंतर त्याला व्याज परतावाही मिळण्यास सुरवात झाली आहे. त्याचा व्यवसाय वाढल्याने जळगाव जनता सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जाचा दरमहा २२ हजार रुपयांचा हप्ता तो नियमित भरत आहे. महामंडळाकडून त्याला नियमित सरासरी ९ हजार रुपये व्याज परतावाही मिळत आहे. आज तो श्री गणेश इंजिनिअरिंग या लघुउद्योगाचा मालक आहे.

***''शासनाच्या अशा विविध योजना आहेत सुशिक्षित बेरोजगार युवकांनी नोकरीच्या पाठीमागे न लागता, या योजनांचा लाभ घेऊन स्वत:चा व्यवसाय सुरू करायला हवा.''***

***– दर्शन वानखेडे***

जळगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पशुविक्री बाजार संकुलात त्याने हा व्यवसाय सुरू केला आहे. जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर येथे पशुधन खरेदी–विक्रीसाठी येत असतात त्यांना आपल्या व्यवसायासाठी लोखंडी संरक्षक जाळीची गरज असते त्यामुळे ग्राहक आकर्षित होतात. व्यवसायाची जागा निवडण्यातही त्याने कल्पकता दाखवली आहे. उत्पादक ते थेट ग्राहक विक्री झाल्याने ग्राहकास योग्य दरात उत्पादन खरेदी करता येते. व्यवसायात दरमहा एक ते दीड लाख रुपयांची आर्थिक उलाढाल होत आहे. दर्शनच्या कुटुंबात पत्नी, वडील, दोन मुली असा परिवार आहे. शासनाच्या आर्थिक मदतीमुळे तो जीवनात स्थिरावला असून उद्योगाच्या प्रगतीचा चढता आलेख त्याला उत्साह देणारा ठरला आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, जळगाव**

# भरारी




**फनिश मेंढे यांचे कार दुरुस्ती व देखभाल सेंटर**

शिक्षणाची संधी बहुतेकांना उपलब्ध झाल्यामुळे सर्वत्र सुशिक्षित तरुणांचा मोठा वर्ग तयार झाला आहे. परंतु स्पर्धेचा युगात प्रत्येकालाच नोकरी मिळणे शक्य नाही. केवळ नोकरीच्या मागे न लागता अनेक होतकरू, हुशार तरुण यशस्वी उद्योजक होण्याचे स्वप्न पाहतात. यातून प्रवाहाच्या विरुद्ध जाऊन स्वप्न पाहणारे नवउद्योजक स्वप्रयत्नाने आपली नवीन वाट निर्माण करून इतरांसाठी आदर्श निर्माण करतात.

## बीजभांडवल योजना

बीज भांडवल योजना सुशिक्षित बेरोजगार युवकांना नवीन उद्योग व सेवा व्यापार उपक्रमात रोजगार उपलब्ध करून देणारी ही योजना आहे. ही योजना राज्यात जिल्हा उद्योग केंद्र व बँकामार्फत राबवली जाते. सुशिक्षित बेरोजगारांना उद्योगासाठी मार्जिन उभे करण्याकरिता बीजभांडवल दिले जाते. या कर्जाची परतफेड विहित कालावधीत केल्यास ३ टक्के सवलत देण्यात येते. या कर्जाची परतफेड सात वर्षापर्यंत करण्यात येते. त्यामध्ये ३ वर्षांचा विलंबावधी समाविष्ट आहे.

## कार दुरुस्ती व देखभाल सेंटर

बेरोजगारीवर मात करत उद्योग विभागाच्या सुधारित बीजभांडवल योजनेच्या साहाय्याने फनिश मेंढे याने कार दुरुस्ती व देखभाल सेंटर या सेवा उद्योगाची स्थापना केली. नागपूरमधील मानकापूर येथील फनिश प्रदीप मेंढे यांनी नोकरी न करता व्यवसाय करण्याचा ध्यास घेतला. आज घरासमोर चारचाकी असणे ही हौस नसून ती प्रत्येकाची गरज बनली आहे. या चारचाकी गाड्याची देखभाल हा एक महत्त्वाचा आणि जोखमीचा भाग आहे. कारदुरुस्ती आणि गाडी देखभालीला देण्यासाठी गाडी मेकॅनिकबद्दल विश्वासार्हता आणि नवीन तंत्रज्ञानाशी हातमिळवणी करण्याचे कसब ज्याच्याकडे असेल त्याला या उद्योगात उत्तम संधी असल्याचे फनिश मेंढे याला जाणवले. या जाणिवेतून त्यांनी कार दुरुस्ती व देखभाल केंद्र उभारले.

## उद्यमेन ही सिध्यन्ति कार्याणि न मनोरथै

'कोणतेही कार्य हे मनोरथाने नाही तर परिश्रमाने सिद्ध होते', हे फनिश मेंढे यांनी दाखवून दिले. सध्या त्याच्या कार दुरुस्ती व देखभाल केंद्राची वर्षनिहाय एकूण उलाढाल आणि उत्पन्न ९ लाख रुपयांच्या घरात आहे. शिवाय या उद्योगाच्या माध्यमातून इतर दोन जणांना रोजगार प्राप्त झाला आहे. या केंद्राच्या उभारणीसाठी पंजाब नॅशनल बँकेने १६

लाख ४९ हजार रुपयांची मंजुरी दिली. जिल्हा उद्योग केंद्राच्यावतीने बीजभांडवलाप्रति ३ लाख २९ हजार मिळाले. शिवाय या योजनेमुळे उद्योजक बनण्याचे स्वप्न पूर्ण झाल्याचा फनिश यांना मनस्वी अभिमान आहे.

## कर्ज योजना

जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजनेच्या लाभार्थ्याला शिक्षणाची व वयाची अट नाही. ज्यातून जनतेला सेवा पुरविता येते, अशा सर्व व्यवसायांचा जसे ब्युटीपार्लर, इंटरनेट कॅफे, ऑटोमोबाइल सेंटर, मोबाईल, घड्याळ दुरुस्ती केंद्र इत्यादींचा समावेश होतो.

जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजनेतून अमोल वानखेडे यांनी सेवा उद्योग पाटणसावंगी, (ता. सावनेर, जि. नागपूर) येथे सुरू केला. अमोल यांनी जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजनेतून ऑटोमोबाईल सर्व्हिस सेंटर सुरू केले. यासाठी त्यांना स्टेट बँकेच्यावतीने उद्योगासाठी कर्ज प्राप्त झाले. ऑटोमोबाइल सर्व्हिस सेंटरच्या उभारणीसाठी त्यांना १ लाख ५ हजार रुपये मिळाले. १५ हजार रुपयाची स्वत: गुंतवणूक केली. शिवाय जिल्हा उद्योग केंद्रामार्फत ३० हजार रुपये मिळाले. ऑटोमोबाइल सर्व्हिस सेंटर या सेवा उद्योगात दुचाकी, चारचाकीची दुरुस्ती देखभाल करण्यात येते. या व्यवसायातून त्यांना दरवर्षी १ लाख २० हजार रुपयांचा नफा होतो. तो नियमितपणे बँकेच्या कर्जाची दरमहा परतफेड करतो. 'सुशिक्षित बेरोजगार' हे बिरुद जाऊन या योजनेमुळे आपण 'यशस्वी नवउद्योजक' म्हणून ओळखले जात असल्याचा अमोल वानखेडे याला सार्थ अभिमान आहे.

## रोजगार निर्मिती

उद्योग विभागाच्यावतीने केंद्र शासनाची प्रधान रोजगार निर्मिती योजना राबवण्यात येते. या योजनेच्या साहाय्याने नागपूर जिल्ह्यातील हिंगणा येथे सुनीत खातकर याने उभारला 'वॉटर प्लाट'. वॉटर प्लॉटमधून लग्न, समारंभ लागणाऱ्या पाण्याच्या बॉटल्स, कॅन यांची 'सॅम ॲक्वा ॲण्ड ब्युरेजेस' या नावाने विक्री करण्यात येते. पाणी स्वच्छ व निर्जंतुक करण्यासाठी 'आरो ट्रिटमेंट प्लांट' बसवण्यात आला आहे. सद्य:स्थितीत त्यांच्या प्लांटमध्ये १३ कामगार काम करीत आहे.



सुनीत अशोक खातरकर यांचा वॉटर प्लांट



अमोल वानखेडे यांचे ऑटोमोबाइल सर्व्हिस सेंटर

सुनीत खातरकर केवळ 'सॅम ॲक्वा ॲण्ड ब्युरेजेस' हा वॉटर प्लांट टाकून थांबला नाही तर उद्योगाला मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद बघून त्याने 'ए.पी. केमिकल्स' नावाने फिनाईल, डिशवॉश, हॅन्ड वॉश, ग्लास, टॉयलेट क्लिनर यांचे उत्पादन सुरू केले. या योजनेंतर्गत सुनीत याला बँक ऑफ महाराष्ट्रच्या वतीने २४ लाख ९० हजार रुपयांचे कर्ज मिळाले. शासनाकडून उद्योग निर्मितीसाठी ३५ टक्के सबसिडी मिळाली, ज्याअंतर्गत ८ लाख ७२ हजार रुपये मिळाले. आज या उद्योगाच्या माध्यमातून सुनीतला सर्व खर्च जाता ६० ते ७० हजार रुपयांचा नफा होतो. या योजनेमुळे सुनीतच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला असून तो समाधानी जीवन जगत आहे. सुनीतपासून प्रेरणा घेऊन त्यांचा मित्र राजू बिसेन यांनी शेतकी रसायने आणि फार्मासिस्ट ट्रेडिंग हा व्यवसाय सुरू केला आहे. सुनीतच्या उद्योगातील प्रगतीमुळे इतरही युवक उद्योगाकडे वळत आहे.

**– अपर्णा यावलकर-डांगोरे,**
विभागीय माहिती कार्यालय, नागपूर

## चित्र पालटले

शहरी व ग्रामीण भागातील लघुउद्योग,

## जीवन बदलले

यवतमाळ शहरातील समर्थवाडी येथे राहणाऱ्या सागर यावलकरचे बोरले ले–आऊट येथे पोकलँड मशीन स्पेअर पार्टचे दुकान आहे. मेकॅनिकल शाखेत अभियंता असलेल्या सागरने तीन चार वर्षे नागपूर येथील ग्लोबल स्पेअर पार्ट कंपनीत काम केले. २०१४ पासून शिक्षणासोबतच त्याने कंपनीच्या कामाचा अनुभव घेतला. मुद्रा बँकेचे पहिले कर्ज (५० हजार रुपये) त्याला यवतमाळ येथील स्टेट बँकेच्या मुख्य शाखेकडून मंजूर झाले. सहा महिन्यातच त्याने कर्जाची परतफेड केली. त्याचा पारदर्शक व्यवहार बघून बँकेने त्याला पुन्हा दोन लक्ष कर्ज दिले. आता गोडाऊन घेण्यासाठी ५.४० लक्ष रुपये २०१८ मध्ये मंजूर केले. या कर्जाची इएमआय त्याला १५ ते १६ हजार रुपये असून महिन्याकाठी ३०–३५ हजार रुपये मिळकत होते. सुरवातीला बेंगळुरू येथून तो स्पेअर पार्ट आणत होता आता मात्र पोकलँड मशीनचे स्पेअर पार्ट कोलकत्यावरून आणतो. जिल्ह्यात व जिल्ह्याबाहेरील पोकलँड असणाऱ्या व्यक्तींकडे तो व्यक्तिश: संपर्क करतो. या कर्जामुळे व्यवसायाला भरारी मिळाली व जीवन बदलले, असे त्याने सांगितले.



सागर यावलकर

घरगुती व्यवसाय आदींना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी मुद्रा बँक योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून यवतमाळ जिल्ह्यात चार वर्षात आतापर्यंत ९८४ कोटी ३७ लक्ष रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले आहे. यात राष्ट्रीयकृत बँकेच्या विविध शाखांमधील एकूण ३ लक्ष ३९ हजार ८०६ खातेदारांचा समावेश आहे.

हे कर्ज वाटप बहुतांश ग्रामीण भागात झाले आहे. ग्रामीण भागातील शेतकरी वर्ग, त्यांच्या कुटुंबातील सदस्य तसेच बेरोजगार युवक–युवतींना या योजनेंतर्गत कर्ज वाटप करण्यात आले आहे. २०१७–१८ या आर्थिक वर्षात यवतमाळ जिल्ह्यातील बँकांना दिलेल्या उद्दिष्टानुसार २२० टक्के उद्दिष्टपूर्ती झाली आहे. तर २०१८–१९ मध्ये मुद्रा योजनेंतर्गत दिलेल्या उद्दिष्टापेक्षा १३४ टक्के उद्दिष्ट झाले आहे.

## भरभराट

पुसद तालुक्यातील पाळोदी येथील रवी रामराव राऊत यांना स्टेट बँक, पुसद येथील शाखेतून मुद्रा बँक योजनेंतर्गत चार लाखांचे कर्ज देण्यात आले. १६ वर्षे हार्डवेअरच्या दुकानात काम केल्यानंतर आपलेही दुकान असावे असे रवीला वाटत होते. स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये त्याचे बचत खाते होते. तेथे मुद्रा बँक योजनेचे बॅनर त्याने पाहिले आणि कर्जासाठी अर्ज सादर केला. प्रत्येक कागदपत्राची पूर्तता




रवी राऊत

त्याने केली. कर्ज मंजूर होण्यासाठी थोडा वेळ लागला पण रवीने हिंमत सोडली नाही. अखेर त्याला ४ लाखांचे कर्ज मंजूर झाले. या रकमेतून रविने पुसद येथे स्वत:चे हार्डवेअरचे दुकान थाटले आहे. सध्या त्याच्या दुकानात ८ लक्ष रुपयांचा माल असून पुसद एमआयडीसी, अमरावती, नागपूर आणि नांदेडच्या व्यापाऱ्यांकडून तो माल घेतो. यात पाण्याची टाकी, ग्रीननेट, बिल्डिंग मटेरिअल्स, इलेक्ट्रिक आणि नळ फिटिंगचे साहित्य आदींचा समावेश आहे. मुद्राच्या कर्जामुळे व्यवसायाची भरभराट झाली, असे रवी सांगतो.

## व्यवसायाला मजबुती

यवतमाळ शहरातील लोहारा परिसरात राहणारे राजू रामकृष्ण तांदळे यांचे सायकल स्टोअर्सचे दुकान आहे. मूळचे बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील तांदळेवाडी येथील रहिवासी असलेला राजू तांदळे १९७२ च्या दुष्काळानंतर १९७५ साली यवतमाळमध्ये वडिलांसोबत स्थायिक झाला. १२ वी उत्तीर्ण व मोटार मेकॅनिकमध्ये आयटीआय असलेल्या राजू तांदळे याला २०१५ मध्ये सेंट्रल बँकेकडून ५० हजार रुपयांचे मुद्रा कर्ज



राजू तांदळे

मिळाले. यातून त्याने सायकल दुरुस्तीचा व्यवसाय सुरू केला. २०१८ मध्ये कर्जाची परतफेड केल्यानंतर व त्यांचा व्यवहार पाहून बँकेने पुन्हा त्याला २ लक्ष रुपये कर्ज दिले. यातून त्यांनी सायकल स्टोअर्स टाकले. दुकानात सायकलचे साहित्य आदींचा भरणा केला. सद्य:स्थितीत त्याच्या दुकानात १ लाखांचा माल असून महिन्याकाठी त्यांना २५ ते ३० हजार रुपये मिळकत होते. दर महिन्याला तो सात हजार रुपये बँकेचा हप्ता भरतो. दुचाकी दुरुस्ती आणि सर्व्हिसिंग सेंटर टाकण्याचा त्याचा मानस आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, यवतमाळ**

# सोलर चरख्याने दिले बळ

***''सुरुवातीला मला फारशी जगरहाटी कळत नव्हती. मेळघाटच्या बाहेरही मी तशी क्वचितच गेले. मात्र, सोलर चरख्याने मला स्वयंरोजगार तर दिलाच, पण सोबत आत्मविश्वासाचेही बळही दिले. त्यामुळे मी आत्मनिर्भर झाले.''***

***– मुन्नीताई कासदेकर***

या मुन्नीताई जावरकर मेळघाटातील घुटी या गावाची रहिवाशी. अमरावती जिल्ह्यात सातपुडा डोंगररांगेत मेळघाटातील धारणी तालुक्यात हे गाव वसले आहे. राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळातर्फे कस्तुरबा सोलर खादी महिला समितीमार्फत धारणी तालुक्यातील सहा गावात एकूण १०० सोलर चरखे स्थानिक आदिवासी महिलांना वितरित करण्यात आले आहेत. या सर्व महिलांना त्यामुळे रोजगार प्राप्त झाला असून, तिने तयार केलेल्या सूतापासून सौर खादी कापड व बेडशीटस् तयार होऊ लागल्या आहेत. स्वयंरोजगाराबरोबरच आत्मविश्वासाचे बळही या भगिनींना सोलर चरख्याच्या माध्यमातून मिळाले आहे.

घुटी गावात खादी व ग्रामोद्योग मंडळातर्फे सामूहिक सुविधा केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. त्या ठिकाणी एकूण बारा पॅडल लुम सुरू करण्यात आले. घरोघरी वितरित केलेल्या सौर चरख्यामुळे महिलांनी तयार केलेले सूत कस्तुरबा सोलर खादी महिला समितीमार्फत खरेदी केले जाते. या सुतापासून सौर खादी कापड व बेडशिट्स तयार केल्या जातात. मेळघाटातील महिलांनी तयार केलेल्या या कापडाला शहरे–महानगरांतून मागणी वाढली आहे.



**नीता सावलकर**

घुटीतील बारा पॅडल लूममुळे २५ युवकांना रोजगार प्राप्त झाला आहे. आयसीआयसीआय बँकेच्या टेक्नॉलॉजी फायनान्स ग्रुपने त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला.

राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत अमरावती जिल्ह्यात राबवण्यात येत असलेल्या सोलर चरखा प्रकल्पाच्या माध्यमातून गेल्या चार वर्षात जिल्ह्यात कॉटन टू फॅशन' अशी उत्पादन साखळी तयार झाली असून यामध्ये एकूण तीनशे महिलांना रोजगार प्राप्त झाला आहे.

***''सोलर चरखा व सामूहिक सुविधा या केंद्रामुळे महिला आत्मनिर्भर बनल्या असून, कस्तुरबा समितीकडून प्रशिक्षण मिळाले आहे. त्यामुळे स्वत:च्या पायावर उभे राहू शकतो, असा आत्मविश्वास मिळाला आहे.''***

***– नीता सावलकर***

अमरावतीत वस्त्रोद्योग पार्कमध्ये अनेक नामांकित कंपन्यांकडून गुंतवणूक झाली आहे. याच पार्श्वभूमीवर बचत गटांच्या माध्यमातून कापड निर्मिती व रोजगार निर्मितीचा प्रयत्न सुरू झाले आहेत. सोलर चरखा प्रकल्पाच्या सुरुवातीच्या टप्प्यात जिल्ह्यातील १३ गावातील १३० महिलांना सोलर चरखे वितरित करण्यात आले. दोन वर्षात प्रकल्पाची व्याप्ती वाढल्याने या बचत गटाचे रुपांतर 'कस्तुरबा सोलर खादी महिला समिती'नावाने धर्मादाय संस्थेमध्ये करण्यात आले. या समितीमध्ये सध्या ग्रामीण व शहरी भागातील एकूण ३०० महिला सभासद आहेत. या समितीमार्फत अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून लागणारा पेळू तयार करून तो जिल्ह्यातील सोलर चरखा केंद्रांना पुरवठा केला जातो. चरख्यावर तयार होणारे सूत खरेदी करून त्यापासून सौर खादी कापड आणि जवळपास २५ प्रकारची सौर खादी उत्पादने तयार करून त्यांची महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर विक्री केली आहे.

अमरावती सोलर चरखा प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य आद्योगिक समूह विकास योजनेंतर्गत सामूहिक सुविधा केंद्र मंजूर झाले असून त्यासाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने त्याच्या अमरावती एम.आय.डी.सी. कार्यक्षेत्रातील भूखंड उपलब्ध करून दिला आहे. यासाठी सोलर चरखा प्रकल्पाचा पेळू प्रकल्प उभारण्यात येत आहे. हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर सोलर चरख्यासाठी लागणारा कच्चा माल योग्य दरात येथील महिलांना उपलब्ध होईल. आणखी इतर महिलांसाठी सोलर चरखे उपलब्ध करून देता येणार आहेत. याठिकाणी अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून कापूस खरेदी करून त्यातून चरख्यासाठी लागणारा पेळू तयार करण्यात येणार आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, अमरावती**

# सुरक्षित आरोग्य

## आहाराचे अमृत

राज्य शासनाच्यावतीने आदिवासी भागात डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम अमृत आहार योजना राबवण्यात येते. अहमदनगर जिल्ह्यात अकोले तालुक्यातील अकोले व राजूर भागात ही योजना चांगल्या पद्धतीने राबवण्यात येत आहे. पेसा क्षेत्रात येणाऱ्या अंगणवाडी केंद्रांतील नोंदणी झालेल्या गरोदर माता व स्तनदा माता यांच्यासाठी एकवेळचा चौरस आहार अंगणवाडी केंद्रातच उपलब्ध करून दिला जातो.

***''अमृत आहार योजनेच्या माध्यमातून मिळणाऱ्या आहारामुळे माझे आणि बाळाचे आरोग्य सुरक्षित झाले.''***

***– रेखा विजय उघडे***

अकोले तालुक्यातील म्हाळादेवी येथील आठवी पास असलेल्या रेखा विजय उघडे यांच्या घरी पती, सासू व सासरे असे सदस्य आहेत. बाळाची चाहूल लागल्यावर स्वत:च्या आरोग्याच्या काळजीत असतानाच त्यांना स्थानिक अंगणवाडी सेविका मनीषा मुंडे यांच्याकडून अमृत आहार योजनेची माहिती मिळाली. त्यांनी पुढाकार घेऊन त्यांचे नाव या योजनेसाठी नोंदवले. अंगणवाडी पर्यवेक्षिका वृषाली वाकचौरे यांनी आहार कसा असावा, काय काळजी घ्यावी, याबद्दल मार्गदर्शन केले. या योजनेत त्यांना १०० ग्रॅम पोळी, ६० ग्रॅम भात, १ केळे अथवा अंडे, ३० ग्रॅम डाळी–कडधान्य, हिरव्या पालेभाज्या ७० ग्रॅम असा आहार देण्यात येतो. या नियमित आहारामुळे त्यांचे वजन व्यवस्थित राहते. यामुळे रेखाताईंसह घरातील अन्य सदस्यसुद्धा आनंदी असल्याचे त्यांच्या बोलण्यातून दिसून आले. आरोग्य केंद्रामार्फत बाळाच्या वाढीचा चार्ट तयार करण्यात आला आहे. त्यानुसार डॉक्टरांकडून लक्ष ठेवण्यात येत असल्याने बाळाच्या वाढीची काळजी राहत नाही. बाळाच्या जन्मानंतरही मातेला सहा महिने हा आहार दिला जातो. आदिवासी क्षेत्रातील महिलांसाठी ही योजना महत्त्वाची ठरली आहे.

– **जयंत कर्पे,** माहिती सहायक, शिर्डी

**डॉ. ए.पी.जे.अब्दूल कलाम अमृत आहार योजनेच्या माध्यमातून मिळणाऱ्या आहारामुळे स्तनदा माता आणि बाळाचे आरोग्य सुरक्षित झाले आहे. महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेमुळे अनेक रुग्णांना मोफत औषधोपचाराचा लाभ मिळत आहे.**



**डॉ. ए.पी.जे.अब्दूल कलाम अमृत आहार योजनेची माहिती देताना अंगणवाडी सेविका मनीषा मुंडे.**



अमृत आहार योजनेचा लाभ घेताना महिला

## सुदृढतेची किल्ली

नंदुरबार जिल्ह्यातील वाटवी गावच्या वैशाली कोकणी या गर्भवती महिलेला अमृत आहार योजनेमुळे चांगला आहार मिळत आहे.

वैशाली यांचा चार वर्षापूर्वी विवाह झाला. पती खांडबारा येथे कामाला जातात. दररोज मिळणाऱ्या अडीचशे रुपयाच्या कमाईवर घर चालवणे कठीण होते. सोबत सासू सासऱ्यांची जबाबदारी होती. चांगला आहार मिळत नव्हता. पोटातल्या बाळाची चिंता त्यांना सतावत असे अशा परिस्थितीत अमृत आहार योजनेविषयी त्यांना अंगणवाडी ताईंकडून कळले. अंगणवाडीत त्यांना नियमित आणि सात्त्विक आहार मिळू लागला. बाळाच्या पोषणाची चिंता दूर झाली. त्यांना गोंडस मुलगी झाली. आता त्या दुसऱ्यांदा गरोदर आहेत. गेल्या सहा महिन्यापासून नियमितपणे अंगणवाडीत त्यांना वरण, भात, भाजी, पोळी, अंडे किंवा फळ असा पौष्टिक आहार मिळतो. त्यांच्यासारख्या इतरही महिला या योजनेचा लाभ घेत आहेत. अंगणवाडीत दर महिन्याच्या सात तारखेला लसीकरण केले जाते.


**जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार**

## नवजीवन

महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेमुळे प्रकल्पग्रस्त ७० वर्षीय गोविंद सदू कोंडे यांच्यावर कोल्हापुरातील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयात यशस्वी तीही मोफत शस्त्रक्रिया झाल्याने त्यांना नवजीवन लाभले आहे.

शासनाची ही योजना म्हणजे समाजातील गोरगरीब, वंचित घटकासाठी नवसंजीवनी ठरत आहे. १०० टक्के मोफत उपचाराची सुविधा असलेल्या या योजनेचा लाभ कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक व्यक्तींना झाला आहे. त्यामुळेच महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना ही गोरगरिबांसाठी नवसंजीवनी ठरली आहे.

मुळचे राधानगरी तालुक्यातील केळोशी खुर्द या गावचे रहिवाशी असलेले गोविंद सदू कोंडे यांचे १९७८ साली करवीर तालुक्यातील वाशी येथे पुनर्वसन करण्यात आले. नव्या ठिकाणी नव्या माणसांसोबत आणि नव्या मातीशी त्यांनी घट्ट नाते जोडले आणि गेली ४० वर्षे सुखाचा संसार चालवला.



**गोविंद सदू कोंडे**

गेल्या महिन्यापूर्वी घरीच फर्शीवरून घसरून ते पडले. खुब्याला जबर मार लागल्याने दुसऱ्या दिवशी त्यांना वेदना असहय झाल्या. खासगी दवाखान्यात उपचार घेण्यासाठी गेल्यावर शस्त्रक्रिया करावी लागेल आणि यासाठी ४० ते ५० हजार रुपये खर्च येईल असे सांगण्यात आले. तो त्यांना परवडणारा नव्हता. त्यामुळे खचून गेलेल्या श्री. कोंडे यांना काही सुचेनासे झाले. नेमक्या याच वेळी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या कोल्हापुरातील वैद्यकीय साहाय्यता कक्षातील कर्मचारी श्री. कोंडे यांच्या मदतीला धावून आले.

श्री. कोंडे यांच्यावर महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेतून कोल्हापुरातील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालयात खुब्याची शस्त्रक्रिया मोफत करण्यात आली. या योजनेमुळे मला खऱ्या अर्थाने नवजीवन लाभल्याची प्रतिक्रिया श्री. कोंडे यांनी व्यक्त केली.

**जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर**

# लक्ष्मी आली दारी...

## त्यांच्या येण्याचे सुख

रामटेक तालुक्यातील किरणापूर येथील रविंद्र थोटे यांच्या पत्नीने दोन मुलींनंतर कुटुंबनियोजनाची शस्त्रक्रिया केली. यासाठी त्यांना आरोही (दोन वर्षे) च्या जन्मानंतर २५,००० रुपयाचा धनादेश बाल विकास प्रकल्प कार्यालयातर्फे सुपुर्द करण्यात आला. त्यांची मोठी मुलगी सृष्टी आज चार वर्षांची आहे. सृष्टी आणि आरोहीचे वडील रवींद्र थोटे आणि परिवार दोन्ही मुलींच्या आगमनाने सुखावलेले आहेत. व्यवसायाने रवींद्र थोटे हे ड्रायव्हर असून, पत्नी घरकाम करते. हलाखीच्या परिस्थितीमुळे मुलींच्या शिक्षणाची, त्यांच्या भवितव्याची चिंता दोघांना वाटत होती. त्यांची ही काळजी 'माझी कन्या भाग्यश्री' या योजनेने मिटवली आहे.



रविद्रं थोटे सोबत पत्नी आणि मुली सृष्टी व आरोही

**विभागीय माहिती कार्यालय, नागपूर**



**महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने १ ऑगस्ट २०१७ पासून माझी कन्या भाग्यश्री योजना राबवण्यात येत आहे. या योजनेत पालकांचे वार्षिक उत्पन्न ७.५० लाखापर्यंत असायला हवे. योजनेंतर्गत पहिल्या मुलीच्या जन्मापासून २ वर्षाच्या आत कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे आवश्यक आहे. तसेच दुसऱ्या मुलीनंतर मुलीच्या जन्मापासून १ वर्षाच्या आत कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे आवश्यक आहे.**

## प्रगतीचे पंख



राजेश दगडू बारी

राजेश दगडू बारी यांचा शेती हा वडिलोपार्जित व्यवसाय. मात्र सततचा दुष्काळ आणि शेतमालाचे घसरणारे दर यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. वाढती महागाई आणि मुलांचे शिक्षण व पालनपोषणाचा खर्च वाढत चालला आहे. राजेश यांच्या संसारवेलीवर एक फूल येणार म्हटल्यावर आनंदासोबत मनात चिंतादेखील होती. मुलाचे पालनपोषण, शिक्षण चांगले करता येईल ना, असा प्रश्न सतत समोर यायचा.

घरात बाळाचे आगमन झाले. लक्ष्मीरूपात आलेल्या मुलीमुळे (काव्या) कुटुंबाला आनंद झाला. काव्याचे पालनपोषण चांगले व्हावे यासाठी राजेश यांनी घरच्यांचा विरोध डावलून कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाकडून 'माझी कन्या भाग्यश्री' या योजनेची माहिती राजेश यांना मिळाली.

आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रस्ताव तयार करून महिला व बाल कल्याण विभागाने प्रस्ताव सादर केल्यानंतर त्याला मंजुरी मिळाली. त्यानंतर काव्याच्या नावे ५० हजार रुपये बँकेत ठेवण्यात आले आहेत. या रक्कमेवरील व्याज मुलीच्या वयाच्या ६ व्या व १२ व्या वर्षी काढता येते. प्रधानमंत्री जनधन योजनेंतर्गत १ लाख रुपयांचा अपघात विमा व ५ हजार रुपयांचा ओव्हरड्रॉफ्ट व इतर अनुज्ञेय लाभ मिळणार असल्यामुळे मुलीचे शिक्षण, आरोग्य व लग्नाची चिंता मिटणार आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, जळगाव**

### एका मुलीवर लाभ

■ मुलीच्या नावे ५० हजार रुपयांचे १८ वर्षाकरिता बचत ठेव प्रमाणपत्र ■ पालकांना जनधन योजनेचा लाभ. ■ मुलीच्या शिक्षणाकरिता प्रत्येक ६ वर्षांनी व्याजाची रक्कम.

### दोन मुलींवर लाभ

■ दोन्ही मुलीच्या नावे प्रत्येकी २५ हजार रुपयांचे १८ वर्षाकरिता बचत ठेव प्रमाणपत्र ■ पालकांना जनधन योजनेचा लाभ ■ मुलीच्या शिक्षणाकरिता प्रत्येक ६ वर्षांनी व्याजाची रक्कम ■ मुलीचे वय १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर व १० वी इयत्ता पास/ नापास झाल्यानंतर बचत प्रमाणपत्राची रक्कम मिळवता येते.

## होणार मी लखपती

अकोला शहरातील जुने शहर विभागात हरिहर पेठ येथे राहणाऱ्या दिनेश लोहिया यांना दोन मुली आहेत. किराणा दुकानात काम करणाऱ्या लोहिया कुटुंबाचे उत्पन्न मर्यादित आहे. त्यामुळे त्यांना दोन मुलींच्या भविष्याविषयी चिंता वाटत होती. माझी ही चिंता कन्या भाग्यश्री योजनेने मिटवली आहे.



**पूर्वा लोहिया**

### लाभार्थी

स्वरांजली विठ्ठल हांडे, रा. पिंपळगाव हांडे, ता. बार्शिटाकळी, मानसी दिनेश लोहीया, रा. हरीहर पेठ अकोला, तनवी विशाल बहोरीया, अकोट फैल, अकोला, नाज सै. सलीम, रा. अकोट फैल, अकोला, शिवन्या विलास सहारे, रा. हरीहर पेठ, अकोला, आरोही मंगेश केतकर, रा. कौलखेड, अकोला, आरोही संतोष बुले, रा. बाळापूर नाका, भिरडवाडी, अकोला, इरा प्रमोद राहाटे, रा. बहिनाबाई खोटरे विद्यालय, बाळापूर, अकोला.

**जिल्हा माहिती कार्यालय, अकोला**

## मुलीचे स्वागत

श्रेया ही लातूर जिल्ह्याच्या रेणापूर तालुक्यातील मोरवड येथील रहिवाशी लक्ष्मण घोडके यांचे किराणा मालाचे दुकान आहे. या घोडके दाम्पत्याला दोन मुली आहेत. पहिली मुलगी १६ वर्षांची तर दुसरी १६ महिन्यांची. या दाम्पत्याने मुलगा व मुलगी असा भेद न करता मुलींच्या जन्माचे स्वागत केले.

मोरवाडी येथील अंगणवाडी सेविका श्रीमती बनासोडे यांच्याकडून त्यांना 'माझी कन्या भाग्यश्री' योजनेची माहिती मिळाली. घोडके दाम्पत्याने दुसऱ्या मुलीच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली होती. या योजनेसाठी त्यांनी अर्ज केल्यानंतर श्रेयाला 'माझी कन्या भाग्यश्री' योजनेचा लाभ मंजूर झाला. त्यानंतर प्रधानमंत्री जनधन योजनेंतर्गत मुलगी व तिची आई यांच्या नावाने संयुक्त बचत खाते उघडण्यात आले. त्यामुळे एक लाख रुपये अपघात विमा व रुपये पाच हजारपर्यंत ओव्हर ड्राफ्टचा लाभ घेता येणार आहे. मुलगी ५ वर्षाची झाल्यानंतर प्राथमिक शाळा प्रवेश, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळा प्रवेश या कालावधीत अनुक्रमे प्रतिवर्षी २ हजार व ३ हजार लाभ मिळणार आहे. वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर म्हणजेच विम्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर १ लाख रुपये मुलीला मिळेल. यातील १० टक्के रक्कम मुलीच्या कौशल्य विकासावर खर्च केले जाईल. या योजनेच्या लाभामुळे समाधानी असून आपले गाव व परिसरातील जास्तीत जास्त लोकांना याबाबत जागृत करणार असल्याचा संकल्प श्री. घोडके यांनी केला आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, लातूर**




## शिक्षणाची चिंता मिटली

हातमजुरीवर संसार चालवणाऱ्या दिनेश वाघधरे यांचे शिक्षण जेमतेम ४ था वर्ग. त्यामुळे मजुरीशिवाय पर्याय नाही. एका मुलीनंतर दुसरे अपत्य येण्याची चाहूल लागताच दिनेशने आपल्या पत्नीला सांगितले की, दुसरा मुलगा होवो अथवा मुलगी पण दोनपेक्षा जास्त अपत्य नको. मात्र त्याला दुसरीही मुलगीच झाली. त्याने लगेच महिनाभरानंतर कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केली.

राजेशने घेतलेला निर्णय कौतुकास्पद होता. त्याचवेळी त्याला 'माझी कन्या भाग्यश्री' योजनेची माहिती मिळाली. त्यासाठी त्यांनी अर्ज केला. त्याला या योजनेचा लाभ मिळाला. दुसऱ्या मुलीच्या नावे २५ हजार रुपयांची फिक्स डिपॉझिट करण्यात आले. या योजनेमुळे दुसऱ्या मुलीच्या शिक्षणाचा भार आपल्यावर पडणार नसल्याने मोठा दिलासा मिळाल्याचे राजेशने सांगितले.

**जिल्हा माहिती कार्यालय, वर्धा**


# कामगार कल्याण



महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्फे कामगारांची नोंदणी करून घेण्यात येते. कामगारांना त्यांच्या व्यवसायासंबंधित साहित्य व साधने घेण्यासाठी अनुदान देण्यात येते. त्यांच्या मुलांना शिष्यवृत्तीसुद्धा देण्यात येते.

## मदतीचा हात

धुळे शहरातील चितोड रोड परिसरात आई-वडिल आणि कुटुंबासह राहणारे राकेश प्रल्हाद वडनेरे प्लंबिगचे काम करतात. त्यांनी दहावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर बांधकाम मजूर म्हणून कामाला सुरुवात केली. प्लंबिंगच्या कामात ते पारंगत झाले. त्यांनी पुढे हेच काम सुरू ठेवले. त्यांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्फे प्लंबिगचे पाच हजार रुपये किमतीचे साहित्य आणि पत्नीच्या शस्त्रक्रियेद्वारे झालेल्या प्रसुतीसाठी २० हजार रुपयांची मदत झाली आहे. राकेश यांचे वडील पेंटर. वयोमानामुळे त्यांनी काम करणे बंद केले. त्यामुळे कुटुंबांची जबाबदारी राकेश यांच्यावर आहे. बांधकाम कामगार म्हणून कार्यरत असताना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे त्यांनी कामगार म्हणून नोंदणी केली. त्यांना मंडळाच्या विविध योजनांची माहिती मिळाली. बांधकाम कामगार म्हणून नोंदणी झाल्यावर त्यांना साहित्य खरेदीसाठी पाच हजार रुपयांची मदत मंडळाच्या माध्यमातून मिळाली आहे.



राकेश प्रल्हाद वडनेरे

***''अलीकडेच राकेश यांना हेल्मेट, ग्लोव्हज, सुरक्षा बूट, सुरक्षा बेल्ट, सुरक्षा जॅकेटचे कीट मिळाले. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने वेळोवेळी केलेल्या मदतीमुळे राकेश समाधान व्यक्त करतात. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या विविध योजना बांधकाम कामगारांसाठी अत्यंत उपयुक्त आहेत. या योजनेच्या माध्यमातून मला आतापर्यंत २५ हजार रुपयांचा लाभ मिळाला आहे. अन्य बांधकाम कामगारांनी मंडळाकडे नोंदणी करून या योजनांचा लाभ घ्यावा.''***

***- राकेश प्रल्हाद वडनेरे, धुळे***

बांधकाम कामगार मंडळाकडे नोंदीत पुरुष लाभार्थी बांधकाम कामगाराच्या पत्नीस दोन जीवित अपत्यापर्यंत नैसर्गिक प्रसुतीसाठी १५ हजार रुपये, तर शस्त्रक्रियेद्वारे होणाऱ्या प्रसूतीसाठी २० हजार रुपयांचे आर्थिक साहाय्य देण्यात येते. राकेश यांच्या पत्नी अश्विनी यांची प्रसूती शस्त्रक्रियेद्वारे झाली. त्यांनी मंडळाकडे विहित नमुन्यातील अर्ज व त्यासमवेत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली. त्यांच्या बँक खात्यात 'डीबीटी'ने २० हजार रुपयांची मदत जमा झाली.

**जिल्हा माहिती कार्यालय, धुळे**

## जगणे सुसह्य

चंद्रपूर जिल्ह्यातील संजयनगर येथील गोवर्धन पाटील व त्यांच्या पत्नीचे कामगार कल्याण मंडळ, चंद्रपूर येथे इमारत व बांधकाम कामगार म्हणून नोंद आहे. त्यांच्या पत्नीचे दीर्घ आजाराने निधन झाले. आजार दीर्घकाळ असल्यामुळे कमाईचे संपूर्ण पैसे पत्नीच्या उपचारावर खर्च झाले होते.



गोवर्धन पाटील

त्यामुळे घरची स्थिती डबघाईला आली होती. पत्नीच्या उपचारासाठी बहुतेक नातेवाइकांकडून कर्ज घेतले होते. पत्नीच्या निधनानंतर त्यांना महाराष्ट्र इमारत व बांधकाम कामगारांसाठी कल्याणकारी योजनेतून २ लाख ३४ हजार रुपयाचे अर्थसाहाय्य मिळाले. त्यामुळे कुटुंबाची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत झाली आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, चंद्रपूर**

## सुरक्षा आणि सुविधा

राज्यात अनेक कामगार असंघटित क्षेत्रात कार्यरत आहेत. या क्षेत्रात काम करणाऱ्या बांधकाम कामगारांची संख्याही मोठी आहे. बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांमध्ये फर्निचर, इलेक्ट्रिक, नळ फिटिंग व बांधकाम करणाऱ्या मजुरांचा समावेश होतो. अशा मोठ्या संख्येने असलेल्या कामगारांच्या हितासाठी महाराष्ट्र बांधकाम व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या मंडळातंर्गत कामगारांची नोंदणी करून नोंदणीकृत पात्र कामगारांना विविध योजनांचा लाभ देण्यात येतो. कामगारांची नोंदणी करण्यासाठी राज्य शासनानेअटल विश्वकर्मा सन्मान योजनाही अमलात आणली आहे.

बांधकाम कामगारांना शैक्षणिक, आरोग्य, आर्थिक साहाय्य, सामाजिक सुरक्षा आणि अन्न योजनांचा लाभ देण्यात येतो. त्यामुळे बांधकाम क्षेत्रातील कामगारांचे आयुष्य सुसह्य होत आहे. अटल विश्वकर्मा सन्मान योजनेंतर्गत बांधकाम क्षेत्रातील कामगारांचे विशेष नोंदणी अभियान राबवण्यात आले. नोंदणी केलेल्या बांधकाम कामगारांना पाच हजार रुपये साहित्य खरेदीसाठी अर्थसाहाय्य व पाल्याच्या शिक्षणाकरीता शिष्यवृत्ती देण्यात येते. या योजनेचा लाभ बुलडाणा येथील राजेश्वर नगरमध्ये राहणारे प्रल्हाद नामदेव मोरे यांना मिळाला आहे. श्री.मोरे यांना बांधकाम साहित्य खरेदीसाठी ५ हजार रूपये व त्यांच्या राजेश मोरे या मुलाला एम.सी.ए या अभ्यासक्रमाकरिता २५ हजार रुपये शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला. त्यामुळे राजेशने एम.सी.एचे शिक्षण पूर्ण केले. शिष्यवृत्तीचे पैसे मिळाले नसते, तर राजेशला शिक्षण शुल्क भरणे शक्य नव्हते. शिष्यवृत्तीमुळेच एमसीएचा अभ्यासक्रम पूर्ण झाला.



प्रल्हाद नामदेव मोरे

श्री. मोरे यांचे मूळ गाव मोताळा तालुक्यातील चिंचपूर आहे. घरच्या बेताच्या परिस्थितीमुळे त्यांचे ९ वी पर्यंतचे शिक्षण झाले. पुढे शिक्षण करायचे, तर पैसे नाही. अशा परिस्थितीत शिक्षण सोडून श्री. मोरे बुलडाणा शहरात काम शोधण्यासाठी आले. मिळेल ते काम करीत त्यांनी आपला उदरनिर्वाह चालवला. काही दिवस चिंचपूर येथून ये-जा करीत काम करू लागले. मात्र, नंतर बुलडाणा शहरातच वास्तव्य करीत बांधकाम क्षेत्रात त्यांना चांगली कामे मिळायला लागली. पुढे आयुष्याच्या वळणावर लग्न झाले. लग्नानंतर वाढत्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी त्यांनी बांधकाम क्षेत्रात काम सुरू केले. दुसऱ्याच्या कामांच्या ठेक्यावर काम करणारे श्री. मोरे आता स्वत: ठेकेदार झाले आहेत. बांधकामाच्या कामांचा ठेका स्वत: घेतात. सध्या बांधकामासाठी खड्डे खोदण्यापासून ओटा बांधकाम, स्लॅब टाकणे, सेंट्रींग लावणे, टाईल्स बसवणे, इमारतीला अलायमेंट करून सुंदर बनवणे आदी कामे ते करीत आहेत.

योजनेमधून मोठ्या मुलाला शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला आहे. त्यानंतर दुसऱ्या मुलाच्या शिक्षणासाठीसुद्धा शिष्यवृत्ती मिळण्याकरिता अर्ज सादर केला आहे. मुलगा बुलडाणा येथे अभियांत्रिकीच्या द्वितीय वर्षाला आहे. बांधकाम कामगारांच्या दोन पाल्यांना पदविका, पदवी, पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी यातील विविध अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्तीही देण्यात आली आहे. दुर्धर आजारांमध्ये बांधकाम कामगार, पत्नी यांना आर्थिक मदत करण्यात येते. घर बांधणी व घर खरेदीसाठी अनुदानही देण्यात येते.

**जिल्हा माहिती कार्यालय, बुलडाणा**



# विठुरायाच्या दर्शनासाठी, एसटीची सुविधा

यंदा श्रीक्षेत्र पंढरपूर येथे होणाऱ्या आषाढी यात्रेसाठी एसटी महामंडळातर्फे नियोजित बसफेऱ्याव्यतिरिक्त सुमारे ३ हजार ७२४ जादाबसेस सोडण्यात येणार आहेत. महाराष्ट्रातून आलेल्या लाखो भाविक प्रवाशांना सुरक्षित सेवा देण्यासाठी एसटीचे सुमारे पाच हजार चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी व अधिकारी पंढरपूर येथे १० ते १६ जुलैपर्यंत अहोरात्र कार्यरत राहतील.



**दिवाकर रावते**
परिवहन मंत्री

## जिव्हाळ्याचा विषय

'पंढरपूरची आषाढी यात्रा हा महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेचा जिव्हाळ्याचा विषय आहे, यामध्ये एसटीच्या प्रवाशी वाहतुकीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भाविक-प्रवाशांना त्यांच्या गावापासून थेट पंढरपूरपर्यंत घेऊन जाणे, विठ्ठलाचे दर्शन घडवून सुखरूपपणे घरी आणून सोडण्याची जबाबदारी एसटी काळजीपूर्वक पार पाडते. जादा वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या बसेस या यांत्रिकदृष्ट्या तंदुरुस्त असल्या पाहिजे तसेच त्या स्वच्छ व आकर्षक असल्या पाहिजेत, याबाबत संबंधित विभागांनी दक्ष राहावे', अशा सूचना परिवहन मंत्री व खारभूमी विकासमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष दिवाकर रावते यांनी एसटी प्रशासनाला दिल्या आहेत.

## आकर्षक बसेस

आषाढीयात्रेच्या दृष्टीने ३,७२४ बसेसपैकी, नव्याने बांधणी केलेल्या माईल्ड स्टीलच्या सुमारे १२०० आकर्षक बसेस भाविक-प्रवाशांच्या सेवेसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पंढरपूरकडे येणाऱ्या विविध प्रमुख मार्गांवर एसटीची दुरुस्तीपथके तैनात करण्यात येणार आहेत.

## तात्पुरती बसस्थानके

यात्रा कालावधीमध्ये महाराष्ट्रातून येणाऱ्या लाखो प्रवाशांच्या सोयीसाठी विभागनिहाय तात्पुरत्या बसस्थानकांची निर्मिती करण्यात येत आहे.

## प्रदेशनिहाय जादा बसेस

औरंगाबाद १०९७, पुणे १०८०, नाशिक ६९२, अमरावती ५३३, मुंबई २१२, नागपूर ११०.

यात्रा काळात बसस्थानकावर उपहारगृहे, स्वच्छतागृहे, रुग्णवाहिका, आरोग्य केंद्र, शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय इ. मूलभूत सुविधा एसटी प्रशासनाकडून पुरवण्यात येणार आहेत.

# आपले नवे मंत्री



राजभवन येथे राज्याच्या मंत्रिमंडळातील नवीन सदस्यांना शपथ देताना राज्यपाल सी. विद्यासागर राव सोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**राधाकृष्ण विखे पाटील**

मंत्री, गृहनिर्माण



**जयदत्त क्षीरसागर**

मंत्री, रोजगार हमी आणि फलोत्पादन



**ॲड. आशिष शेलार**

मंत्री, शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण



**डॉ. संजय कुटे**

मंत्री, कामगार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण



**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे**

मंत्री, सामाजिक न्याय



**डॉ. अनिल बोंडे**

मंत्री, कृषी



**प्रा. डॉ. अशोक उईके**

मंत्री, आदिवासी विकास




**डॉ. तानाजीराव सावंत**

मंत्री, जलसंधारण



**योगेश सागर**

राज्यमंत्री, नगरविकास



**अविनाश महातेकर**

राज्यमंत्री, सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य



**संजय (बाळा) भेगडे**

राज्यमंत्री, कामगार, पर्यावरण, मदत व पुनर्वसन, भूकंप पुनर्वसन



**डॉ. परिणय फुके**

राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), वने, आदिवासी विकास



**अतुल सावे**

राज्यमंत्री, उद्योग व खनिकर्म, अल्पसंख्याक विकास व वक्फ

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / **TO**

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी डिलिजंट मीडिया कॉर्पोरेशन लि., प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई – ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह